REGISTERED N. No. [illegible]

आकोल्यातील लोकांस.................१ रु.
बाहेरगांवी टपालहाशिलांसह........ २ रु.
वर्गणी आगाऊच दिली पाहिजे.
किरकोळ अंका.........................।२
नोटिशी बद्दल
१० ओळीचे आंत रु० १
दर ओळीस..........।१ ।१
दुसरे खेपेस.... ..........।१

# वऱ्हाडसमाचार.

# THE BERAR SAMACHAR

Town ... ... ... ... 1 Rs.
Mofussil ... ... ... 2 ( with postage
All Subscriptions to be paid in advance,
Single copy .......................... 2 as
Advertisement
below 10 lines ...... 2 Rs
Per line over 10 ......2 as
Repetition Per line ...2 as

VOL XXXVII AKOLA MONDAY 1 JUNE 1903 NO 21

वर्ष ३७ आकोला सोमवार तारीख १ माहे जून सन १९०३ इ० अंक २१

## नोटीस

बेशमी रा. रा. बुधसिंग वल्द गुमानसिंग देशमुख मौजे हिंगणे कारेगांव परगणे बाळापूर तालुका खामगांव जिल्हा आकोला यांस

खालीं सही करणार महिपतराव वल्द गोविंदराव देशमुख राहणार मौजे हिंगणे कारेगांव परगणे बाळापूर तालुका खामगांव यांजकडून जाहिर नोटीस देण्यांत येते कीं. मौजे मजकूर येथील स्थावर माल दोन शेतांतील दोन पथ्या वाटलेल्या तुह्मी माझे चुलत बंधु ह्मणून खरेदी लिहून दिल्या. हजार रुपयांची शेती १०० रुपयांस खरेदी लिहून तुह्माजवळ गहाणांदाखलीं ठेविली. शेती माझ्या ताब्यांतच पूर्वी पासून आज पर्यंत आहे. खरेदी लिहिली तेव्हांच तुह्मी करार केला कीं दुहोत्रा व्याजा सुद्धा रुपये आणून द्यावें ह्मणजे खरेदीखताचा हक सोडून देईन या करारा प्रमाणें मीं तुह्माला मुद्दल २०० रुपये घेऊन व्याजाच्या शेंकर १०० रुपयाबद्दल निराळा पुर्जा करून दिला; आणि त्या खरेदी खतामागें तुह्मी असा शेरा लिहिला कीं खरेदीचे कर्जाचे रुपये भरून पावलों. व खरेदीचा हक्क राहिला नाहीं. या खरेदी खताच्या पाठीमागे लिहिलेल्या लेखावर तुह्मी सही केली व त्यावर साक्षीही टाकल्या आहेत.

हें रद्द केलेलें खरेदीखत तुह्मी उलट खरेदीच्या कागदा सुद्धां मला वापस देणार होता. परंतु आळसा मुळें व बंधुपणाच्या विश्वासामुळें ती गोष्ट तशीच राहिली. तुह्मी खरेदीची नक्कल घेतली ह्मणून संशयाला कारण झालें आहे. ही जिन्नगीची गोष्ट आहे तेव्हां तुह्मी कागद पत्र नीट करून द्यावे ह्मणजे पुढें मुलाबाळांस उभयपक्षीं तसदीफ होणार नाहीं. ही नोटीस पोचल्या पासून एक महिन्याच्या आंत रद्द केलेला खरेदीचा कागद वापस करावा आणि उलट खरेदीचा कागद लिहून नोंदून द्यावा ह्मणजे माझ्यावर मोठी मेहरबानी होईल. व संशयाला कारण राहणार नाहीं. कळावें. २९ मे १९०३ इ०

सही
महिपती गोविंदराव व देशमुख
दस्तुर खुद.

## नोटीस

रा. रा. बापू वल्द नारायण भोपळे मुक्काम मलकापूर यांस:- पुंजी मर्द बापू भोपळे वस्ती कसेंब वडोदे इजकडून नोटीस देण्यांत येते कीं मी तुमची लग्नाची बायको असून तुह्मी मजला सात आठ वर्षांपासून टाकून दिले. मी माझे आईच्या घरीं किती दिवस राहावें! आज्ञान होती तो पावेतों आईनें पोसलें. हल्लीं आठ वर्षांपासून मी मजुरी करून पोट भरते. मजुरी पुरत नसल्यामुळें मजला दरमहा रुपये २ प्रमाणें आठ वर्षांचें रुपये १९२ कर्ज झालें आता पुढें मजला रुपये कोणी कर्ज देईल असें दिसत नाहीं ह्मणून कळवितें कीं नोटीस पावल्या दिवसा पासून आठ दिवसांचे आंत येऊन १९२ रुपये देऊन मजला घेऊन जावें तसें तुह्मी न केल्यास हीच तुमची फारकती समजून गंधर्वांचा जाती रिवाजा प्रमाणें नवरा करीन. मग तुमचा लग्नपणाचा कांहीं हक्क राहणार नाहीं. हक दाखविल्यास या नोटिशीवरून रद्द असे. शिवाय आज पावेतों तुमचेवर अवलंबून राहिल्या बद्दल मजला जे १९२ रुपये कर्ज झालें ते तुमचे पासून दिवाणी कोर्टांत दावा करून भरून घेतले जाईल हे खास समजावें. नोटीस पावल्या पासून आठ दिवसांचें आत येऊन १९२ रुपये देऊन मजला घेऊन जावें तसें न केले तर हीच फारकती समजून मी दुसरा नवरा करीन मग तुमचा लग्न संबंधाचा हक्क राहणार नाहीं. खर्च मागितल्यास तो रद्द असे शिवाय तुह्मास नोटिशीचा खर्च व पोटाचा खर्च १९२ रुपये द्यावे लागतील. कळावें. तारीख २४ माहे मे सन १९०३ इसवी.

( सही )
पुंजी मर्द बापू भोपळे वस्ती
कसेंब वडोदें पेटा येदलाबाद
निशाणी हातची
बांगडी असे.

## नोटीस.

बेशमी ( १ ) रामराव व्यंकटेश मुनशी व ( २ ) भिकाजी वल्द कोंडाजी उभयतां राहणार आकोला, यांस:-

खाली सही करणार यांजकडून नोटीस देण्यांत येते कीं मौजे उमरखेड तालुका आकोला येथील शेत सर्वे नंबर १३ एकर ३१ गुंठे १७ आकार रुपये ५७ हें शेत माझ्या मालकीचे व स्वसंपादित आहे. त्या शेतावर कोणाचा हक्क संबंध नाहीं असें असून तुह्मा दोघां पैकीं पहिल्यानें दुसऱ्याकडून त्या शेतातील ½ हिस्सा विकत घेतला आहे. भिकाजीला हा हिस्सा खरेदी देण्याचा कोणताच अधिकार नाहीं, तो दारूबाज निघाला आहे ह्मणून त्याला फसवून रामरावानें खरेदी खत लिहून घेतले असें दिसतें. खरेदीची गुण गुण ऐकल्यावरून मी खरेदीची नक्कल काढविली आणि त्यावरून असेंही कळलें कीं तुह्मी दोघा लबाडांनीं माझी त्या कागदावर खोटी साक्ष टाकली आहे. तुह्मी मुकाट्यानें तो कागद परत आणून मजकडून फाडवून द्यावा. असा बनावटी खोटा कागद केल्या बद्दल मी तुह्मावर फौजदारींत फिर्याद करणार आहे. तुह्मी शेतांत पाय टाकाल तर तुमचा भागलीकी बद्दल फौजदारी कोर्टांत जबाब घेतला जाईल. आणि योग्य प्रकारें तुह्मास शेतांतून हाकलून दिलें जाईल. माझ्या शेता संबंधानें सदरहू खोटें खरेदीखत रद्द व बातल आहे. कळावें तारीख २६ मे सन १९०३ इसवी.

सही.
कोंडजी वल्द मटवाजी
दस्तुर खुद्द.

## नोटीस

नोटीस बेशमी रावजी वा भीवजी गिन्हे राहणार मौजे केळीवेळी तालुके अकोट यास:—

खालीं सही करणार यांजकडून नोटीस देण्यांत येतें कीं माझी मुलगी नामें सारजी मर्द रावजी ही तुमची लग्नाची बायको असोन तुह्मी तिजला लग्न झाल्या पासून चार पांच वर्षे तिची जेआण करून चांगले रितीनें वागविले, हल्लीं तुह्मी आठ वर्षां पासून रोगांनीं ग्रस्त झाले असोन जन रिती प्रमाणें माझे मुलीचा संसार करण्यास असमर्थ झाले आहा करितां या नोटिसीनें कळविण्यांत येतें कीं ज्या अर्थी तुह्मी मुलीचा संसार करण्यास नालायक अहांत त्या अर्थी ही नोटीस पावल्या पासून आठ दिवसाचे आंत माझे मुलीचा दुसरा घरठाव करण्या करितां फारकती द्यावी. जर तुह्मी फारकती देणार नाहीं तर माझे घरी मुलगी आठ वर्षां पासून असोन तिचे खावटी खर्चा बद्दल दर साल रु. ५० प्रमाणें मी लोकांचे कर्ज काढून तिला पोसिलें आहे ते रुपये एकंदर ४०० व या नोटिसीचा खर्च तुह्मास द्यावा लागेल तुह्मी आपसांत वरील प्रमाणें निकाल न केल्यास खावटी खर्चा बद्दल व या नोटिसीच्या खर्चां बद्दल रिती प्रमाणें दिवाणींत दावा करून कोर्ट खर्चा सुद्धा सर्व पैसे भरून घेऊं. शिवाय फारकती न दिल्याबद्दल हीच नोटीस फारकती समजून माझे मुलीचा दुसरा गंधर्वांचा नवरा करून देईन मग तुमचा नोवरेपणाचा हक्क राहणार नाहीं. ही नोटीस दिली ता. २९।५।१९०३ इ.

सही
सखाराम वा मानाजी सरोदे राहणार
पाळोदी ता० अकोले नि. खु.

## नोटीस

नोटीस बेशमी हरमान, गंभीर व किसन वा योगाजी लोदम जात कुणबी धंदा शेतीचा राहणार कानडी परगणें बिमर तालुके आकोला यासी नोटीस देणार भगवान वा योगाजी लोदम जात कुणबी राहणार कानडी नोटीस देण्यात येतें कीं, कानडी, बोंग व इराहित वगैरे गांवची शेती माझ्या मालकीची व माझ्या नावानें आहे. पूर्वी आपण सर्व एकेठिकाणीं होतों एकेठिकाणी असतांना व दुष्काळामुळें व दुष्काळाच्या पूर्वीचें एकंदर कर्ज देणें आहे. कर्जांच्या धाकानें व सर्व कर्जांचा बोजा माझ्या एकट्यावर पडावा या इराद्यानें वेगळे झाले व वेगळे होण्यापूर्वीं मजला सांगितलें आह्मास शेती वाटून द्यावी आह्मी हिश्या प्रमाणे कर्ज ही देतों परंतु तसें कांहींच केलें नाहीं. सावकार लोकांचा माझ्यावर फार तगादा आहे. याजकरितां तुह्मास नोटिसीनें कळवितों कीं तुह्मी सर्व माझ्याकडे येऊन एक विचारानें सावकाराचे कर्जाचा बंदोबस्त करावा तसें न केल्यानें सर्व शेती माझ्या नावानें असून माझ्याच कमाईची आहे. कर्ज न देता विनाकारण हिस्से तुह्मी मागतां याजकरितां नोटीस पावल्या पासून आठ दिवसांचें आंत कर्जांचा बंदोबस्त करण्यास माझ्याकडे येऊन बंदोबस्त करावा. तसें न केल्यास सिवनारायण चुनीलाल राहणार ईराहित यांचे पाशी शेती गहाण आहे तो ह्मणतो कीं मी सर्व कर्ज देतों परंतु खरेदी मागतो. तुह्मी आठ दिवसांचें आंत तजवीज न केल्यास मी त्यास सर्व शेती खरेदी करून देईन मग तुमची तक्रार राहणार नाहीं. कळावें ता. २५।५।०३ इ०

सही
सहीची निशाणी भगवान वा
योगाजी यांचे हातची.

## नोटीस

बेशमी रा. रा. इंद्रसिंग वल्द पर्वतसिंग देशमुख राहणार मौजे हिंगणें कारेगांव परगणे बाळापूर तालुका खामगांव जिल्हा आकोला. यांस.

खाली सही करणार हरी वल्द यादो रोहणकार राहणार हिंगणे कारेगांव तालुका खामगांव यांजकडून नोटिशीनें कळविण्यांत येतें कीं गेल्या दुष्काळांत ह्मणजे सन १८९९ सालीं मौजे मजकूर येथील माझी शेतें चार व घरें एक मिळून स्थावर मालाचें तुह्माला खरेदीखत लिहून नोंदून दिलें. ही खरेदी दुष्काळांतील इतर खरेद्यां प्रमाणें गहाणाच्या स्वरूपाची होती आणि उदर निर्वाहाच्या अडचणीसाठीं ही खरेदी लिहिली आणि ह्मणूनच तीन हजार रुपयांचा माल दोनशे रुपयांस खरेदी दिला व त्या दुष्काळाच्या सालाबद्दल तीन वर्षांचें पोकळ पट्टेखतही लिहून दिलें खरेदी लिहिली तेव्हांच आपण कबूल केलें कीं व्याजा सुद्धां दोनशे रुपये आणून चुकते द्यावे. ह्मणजे मी उलट खरेदी सदरहू स्थावरची करून देईन. असें बोलणें झालें आणि नंतर मी तुह्मास १९ फेब्रुवारी १९०१ रोजीं खरेदीच्या कर्जाबद्दल रुपये २०० व त्यांचें व्याज रुपये १७५ असे ३७५ रुपये गांवांत साक्षीदारा समक्ष दिले व तुह्मी व माझा सख्खा भाऊ दाजाजी वल्द यादव रोहणकार असे उभयतां खामगांवी जाऊन वरील स्थावर मालाची उलट खरेदी द्यावी

जिल्ह्या नोंद राजश्री देवराव अर्जनवीस यांच्या हातून तुह्मी लिहिण्याला लाविली. अर्धवट खरेदी लिहिली तितक्यांत तुमचा पुतण्या गांवाकडून आला आणि त्यानें तुह्मास थोडेसें बाजूला नेले. तुह्मी लागलींच विचारांत पडला आणि दानाजी खरेदी पुरी करण्यास हाक मारूं लागला तेव्हां तुह्मी मुकाट्यानें चालते झाला.

तुह्मी थोर कुलीन आहां तेव्हां कांहीं लबाडी होईल असें वाटत नाहीं. रुपये तुमच्या घरीं पोचलेच आहेत. आणि गहाणाच्या स्वरूपाची खरेदी असल्यामुळें सदहूं स्थावर माल माझ्या ताब्यांतच आहे. तुह्मा जवळील दोनशे रुपयाची खरिदी रद्द आहे. तुह्मी लिहूं घातलेले खरिदीखत पुरें करावें ह्मणून पुष्कळ वेळां ह्मटलें पण तुह्मी आज उद्यांची सबब पुढें करून मला चाळवीत आहां ही नोटीस पोचल्या तारखे पासून ८ दिवसाचे आंत उलट खरेदीखत पुरें करून नोंदून आणून द्यावें. असें करण्यास चुकाल तर तुह्मावर कोर्टांत फिर्याद करून योग्य ती दाद मिळविली जाईल आणि नोटिशीच्या खर्चा सुद्धां सर्व नुकसानी तुमच्या शिरावर राहील. कळावें. तारीख २९ मे १९०३ इ०

सही,

हरी यादोजी रोहणकार वस्ती
मौजे हिंगणे कारेगांव
दस्तुर खुद.

वऱ्हाडसमाचार

मिति ज्येष्ठ शुद्ध ६ शके १८२५

## व्यक्तिस्वातंत्र्य.

हल्लींचा काळ व्यक्तिस्वातंत्र्याचा आहे. ज्याचा तो मुखत्यार आहे, आणि आपण करूं तें आपण होऊं असा प्रयत्नवाद आपणांस पदोपदीं पुढें ढकलीत आहे. ही गती सांप्रतच्या उत्क्रांतीची आहे आणि काल चक्रांतून जो बलवान असेल तोच विद्यमान राहील. इत्यादि विचार आजकालच्या प्रगतीचीं मुख्य आधारभूत तत्वें आहेत. पण या विचारांनीं आपणामधील एकोपा मोडला आहे. पूर्वींची भूतदया नष्ट झाली आहे. जो तो ऐश्वर्याचा पाठलाग करीत धांवत चालला आहे. पण धनदौलत ही सुखें नसून सुखाचीं साधनें आहेत हें आपण विसरत चाललों आहों. साधनांचें महत्व फार वाढलें आणि साध्य वस्तु जी सुख तिला पराङ्मुख होऊन आपण सुखसाधनें संपादतांना अवघा जन्माचा जन्म दुःखांत व कष्टांत घालवितो. श्रीमंती सुखासाठीं पाहिजे खरी पण श्रीमंतीसाठीं आपण सर्व सुखाला तिलांजली दिली आहे. ऐहिक संपदा आपल्या कार्याची मुख्य गुरुकिल्ली होऊन बसली आहे. अशी स्थिती होण्याला मुख्य कारण सांप्रतचा विचारक्रम होय. विचार हा आपल्या उद्योगाची प्रवर्तक शक्ति होय आणि तो चुकला असल्यामुळें आपली उद्योगमाळा देखील चुकली आहे. प्रस्तुतची बलवत्तर धनतृष्णा, जीवन कलहांतील आणि त्या तत्संबंधीं निराशा आणि निराशेपुढें कुंठित गती हीं आमची पारध करीत आहेत.

व्यक्तिस्वातंत्र्यामुळें आपणांस वाटतें कीं आपली आपण आयुष्याची इमारत बांधली पाहिजे. प्रयत्नवादी सांगतात कीं तूं जें करशील तें होईल. अर्थशास्त्र पदोपदीं सांगतें कीं संपदा ही जगाची अजब शक्ती आहे आणि या सर्वंकष शक्तीमुळें सर्व पृथ्वी आपलीशी होईल. हे विचार मनांत प्रचलित झाले ह्मणजे जी स्फूर्ती येते ती मीपणाला प्रसवते. हल्लींचा उद्योग असा आहे कीं, मीच पुढें पाहिजे, मलाच प्रथम आवाहन पाहिजे व माझीच सर्वत्र पूजा पाहिजे. या तत्वाचा परिणाम असा झाला आहे कीं सर्व जग ह्मणजे माझी ऐश्वर्यभूमी होय. स्वार्थ साधत नाहीं तर सर्व जग व्यर्थ होय. किंबहुना, मला सर्व जगाची फिकीर ह्मणजे माझ्या स्वार्थासाठीं होय. सारांश, आपण बुडलों तर दुनिया बुडली आणि आपण तरलों तरच दुनिया धन्य होय. अशा सारख्या कल्पना व्यक्तिस्वातंत्र्याच्या बुडाशीं असतात. आणि त्यामुळें सर्व मी मी ह्मणणारे प्राणी जगाला स्वसुखासाठीं कवटाळीत असतात.

व्यक्तिस्वातंत्र्य खरोखर फार उत्कृष्ट आहे; पण त्याचा उत्कृष्टपणा खऱ्या मीपणाला न ओळखल्यामुळें नष्ट झाला आहे. आपला मीपणा ऐहिक सुखापलिकडे जात नाहीं. ह्मणजे त्यांचा परिघ आपल्या इंद्रियांच्या भोगविषयापुढें नाहीं. मला घोडा पाहिजे, गाडी पाहिजे, सुग्रास भोजन पाहिजे. शरीराला सुंदरता आणणारे हेमादि अलंकार पाहिजेत, सौख्य देण्याला मला माता पितर पाहिजेत, माझ्या आरामासाठीं दारासुत पाहिजेत, माझ्या सुखासाठीं मला बंधु वर्गाचे, इष्टमित्रांचें, व सेवकगणाचे साहचर्य पाहिजे. या ऐहिक सुखाच्या वस्तुसमुच्चया पलिकडे आपली दृष्टी वळत नाहीं, आणि ह्मणूनच आपला मीपणा आपणास आडमार्गांत नेत आहे.

आधिभौतिक संपदा आपला योगक्षेम सुखानें जाण्यासाठीं पाहिजे आहे पण ही संपदा ह्मणजे आपल्या आयुष्याचें इतिसर्वस्व मात्र नाहीं आहे हें आपण विसरतों, किंबहुना आपणास इतर संपदा मुळींच नकोशा झाल्या आहेत. ऐहिक संपदा उपभोगानें नष्ट होते. ही संपदा एका जवळ आहे ती दुसऱ्या जवळ असूं शकत नाहीं. भोगानें क्षय पावणारी व परिच्छेदानें एकगत असणारी अशी ही संपदा स्वकीय उन्नती स्वार्थपरायणतेपलिकडे जाऊं देणार नाहीं हें स्पष्ट आहे.

पण ऐहिक संपदे विषयीं आह्मी तिरस्कार दाखवितों असें मात्र कोणी समजूं नये. ऐहिक संपदा या उच्चतर व श्रेष्ठतर संपदा मिळविण्याचा सोपान मार्ग आहे. पण तिचा उपयोग सोपानाहून अधीक होतां कामा नये. आपण उंच मजल्यावर जाणार आहों पण शिडीच्या पायरीवरच जर आपण रममाण झालों, व सभोंवतालच्या रम्य देखाव्यानें भुलून तेथेंच उभे राहिलों तर आपण उच्च शैलशिखरावर जाणार नाहीं इतकेंच नाहीं तर सोपानावर स्वस्थ उभें राहून आपण धाडकन खालीं पडण्याची मोठी भिती आहे. ऐहिक संपदा अशासाठीं पाहिजेत कीं आपला योगक्षेम सुखानें चालावा ह्मणजे आधिभौतिक काळजी दूर होतील; आपणांला चैनी नकोत पण पुरेशी सुखसाधनें पाहिजेत; सौंदर्य व रमणीयता आपणांस पाहिजे पण व्यर्थ डामडौल व बडेजाव नको; संपदा असली ह्मणजे आह्मास इतर मौल्यवान संपदा मिळविण्याला फुरसत मिळेल आणि विनाकारण देहास झिजविणारें द्रव्यार्जन करावें लागणार नाहीं. आह्मा मधील परम शांतिमय ब्रह्माची ओळख करून घेण्याला आह्मांला विपुल धनदौलतीमुळें वेळ मिळावा आणि आमच्या पशुवृत्तींला सैरावैरा फिरण्यास सांपडूं नये.

ऐहिक संपदेहून उत्तम अशा अन्यसंपदा पुष्कळ आहेत. विद्याधन दिल्यानें वृद्धिंगत होतें आणि उपभोगाच्या अभ्यासानें क्षय न पावतां त्याची अभिवृद्धीच होते. विद्याधनाची वाटणी मागण्यासाठीं सर्व जग आपणापुढें उभें राहिलें तरी आची वाटणी करितां करितां आपला मूळचा विद्येचा झरा मोठाच वाढेल, आपलें विद्याजल जोरानें वहूं लागेल आणि अनंत अशा विद्येच्या प्रवाहांत आपण आनंदानें पोहूं लागूं. ब्रह्मसुख विद्याधनाचा अंतिम भाग आहे. या ब्रह्माच्या खाणाखुणा पटल्या ह्मणजे आपल्या मीपणाची कक्षा मोठी विस्तृत होते. जो आपमतलबी व संकुचित दृष्टीचा असतो त्याचा मी ह्मणजे तो स्वतां व त्याचें अगदीं नजिकचे आप्त या पलिकडे जात नाहीं. भूतदया अंगांत अधीक असली ह्मणजे तोच मी आपली सामान्य कक्षा सोडून आप्तमित्रादि विस्तृत पाव्हण्यांच्या वर्गाला आळें घालतो, ज्याची दृष्टी ब्रह्मज्ञानानें विस्फारित होते त्याच्या मीमध्यें सर्व सृष्टीचा समष्टी न्यायानें समावेश होऊं लागतो. ज्याचा मी सर्व सृष्टीला संकलित करितो तो जवळ जवळ परमेश्वरा पत पोंचतो. सारांश, आह्मास असलें खरें व विस्तृत व्यक्तिस्वातंत्र्य पाहिजे आहे.

## उतारूंची नोंद

आकोल्यास जे उतारू रेल्वेमार्गानें येतात त्यांच्या नांववारीची यादी दररोज होत असते. उतारू गाडीच्या खालीं उतरला कीं स्टेशनाच्या बाहेर जातांना टिकिट कलेक्टर उतारू जवळचें टिकिट गोळा करितो. आणि त्या बरोबर लागलींच तेथें उभा असलेला डाक्टर उतारूंच्या नाडीला हस्तस्पर्श करितो. पुढें लागलींच पोलिसचा जवान जिन्यापाशीं उभा असतो तो प्रत्येक उतारूला मागील दरवाज्याच्या खोलींत आपलें नांव उतरून देण्याला सांगतो. तेथें लागलींच खोलींतील पोलीस कारकुना सभोंवतीं उतारूंची गर्दी होते. जो तो आपली सुटका व्हावी ह्मणून दादा बाबा करून आपलें नांव अगोदर उतरावयाला लावण्याचा प्रयत्न करितो. कोणतीही गाडी आली कीं दीड दोन तास पर्यंत नांवें उतरण्याची गर्दी चालली असते. तो पोलिसचा कारकून पडला एक आणि तो आपल्या दोन हातांनीं जलदीं लिहिण्याची पराकाष्ठा करितो, परंतु उतारूंची गर्दी मोठी असल्या मुळें उतारूंचा पुष्कळ वेळ या भानगडींत व्यर्थ जातो आणि त्यांस बराचसा त्रासही सोसावा लागतो.

याप्रमाणें उतारूंची नोंद दररोज आकोल्याच्या स्टेशनावर होत असते. या नोंदीचा हेतु काय आहे हें आह्मांस बरोबर कळत नाहीं. पूर्वीं जेव्हां आकोल्यास प्लेगाचा रोग नव्हता तेव्हां प्लेगानें दूषित झालेल्या भागांतून येणाऱ्या उतारूंची नोंद मुद्दाम ठेवीत असत; आणि या नोंदीप्रमाणें दहा दिवस पर्यंत त्या उतारूंच्या हालचालीवर देखरेख रहात असे. असें करण्याचा उद्देश असा कीं या दहा दिवसांच्या तपासणींत जर कोणी प्लेगाच्या दोषिक ज्वरानें ज्वरित झाला तर लागलींच त्याला वेगळा काढण्यांत यावा आणि त्याचा इतर लोकांशीं संसर्ग होऊं देऊं नये. प्लेगाला प्रतिबंधक ह्मणून अशी योजना केली होती आणि आमच्या मतें अशा व्यवस्थेनें प्लेगाचा नवीन रोगी किंवा बाहेरून आलेला रोगी याचा दुसऱ्यास संसर्ग होत नसे. या व्यवस्थेच्या दृष्टीनेंच प्रथम रेल्वे स्टेशनावर उतारूंच्या नोंदीची तजवीज करण्यांत आली.

पण हल्लीं या नोंदीचा कांहीं उपयोग होत नाहीं असें आह्मांस वाटतें. प्लेगाचा रोग अगोदर आकोल्यांत शिरलाच आहे तेव्हां प्रतिबंधाचा उपाय ह्मणून ही नोंद कांहीं उपयोगी पडत नाहीं, त्या शिवाय या नोंदी प्रमाणें पुढें दहा दिवस उतारूंचा तपास होत नाहीं. तर या नोंदीचा कांहींच उपयोग नाहीं. १० दिवसांच्या तपासणीच्या सोयीसाठीं ह्मणून ही नोंद ठेवण्यांत येत असे. जर ही तपासणी बंद करण्यांत आली आहे तर उतारूंची नोंदही बंद करण्यांत यावयाला पाहिजे होती. ती नोंद अद्याप का चालू आहे याचें आह्मास कारणच समजत नाहीं. ही नोंदीची व्यवस्था डाक्टर रेली साहेब यापुढें बंद करितील तर त्याचे उतारूंवर उपकार होतील. नांवें लिहून देण्याचा सव्यापसव्य विनाकारण नको आहे असें आह्मांस वाटतें दर गाडीला स्टेशनावर या गोष्टीमुळें उतारूंची मोठी खोटी होते आणि फार त्रास होतो. तो बंद करण्याची वेळ पूर्वींच येऊन चुकली आहे. हें नोंदणीचें काम बंद ठेवण्यांत येईल तर स्टेशनावर ठेविलेला हा पोलिसाचा आमलाही लागणार नाहीं. खर्चाच्या दृष्टीनें व उतारूंच्या सोयीच्या दृष्टीनें आह्माला वाटतें कीं उतारूंची नोंद जितकी लवकर बंद होईल तितकें बरें होईल.

The Berar Samachar

MONDAY JUNE
1 1903

### CIVIL HOSPITALS & CHARITABLE DISPENSARIES IN BERAR

The annual Returns on the Civil Hospitals and Charitable Dispensaries

in Berar for the year 1902 with an explanatory note thereon by Lieutenant Colonel Swaine have been just out. The explanatory note is very brief and one has to wade patiently through the several statements accompanying the note, to make oneself fairly acquainted with the state of the Dispensaries and Hospitals during the past year. The number of Charitable Dispensaries and Hospitals in the Province during the year was the same as that in the previous year viz 47. The total number of patients treated in the Dispensaries and Hospitals during the year, was 354142 out of whom 2,10,029 were Hindus and 1,31,903 were Mahomedans. Comparing these figures with the total population in the Province one cannot fail to notice that the Hindus have not yet got over their scruples about English Medicines. There was a pretty large decrease in the number of out—patients viz 10815, which is chiefly attributed by Lieutenant Colonel Swaine to the scare in the native population in the districts of Akola, Buldana and Basim, caused by the undertaking of plague measures in these districts. The chief medical authority in this province has thus indirectly sounded a condemnatory note on the plague measures of the Government, on this *one* ground—that they are not liked by the Public!

The Pentecostal Mission at Buldana has been doing good work in that district as 5190 patients in all were treated in the year under report, by that institution. It is said that people living within a radius of 30 miles resorted to this institution for medical treatment. We are glad to find that the philanthrophy of the mission is being so well appreciated by the native population in the District. Let us hope that the noble example of this institution in helping the poor and the afflicted will be followed by persons who have the means and ability to do so.

On looking at the work of the individual Dispensaries and Hospitals, in the province, one cannot help being struck with the contrast afforded by the Civil Hospitals of Akola and Amraoti. The figures of the respective Hospitals are given below:—

*Civil Hospital*

| | Akola | Amraoti |
|---|---|---|
| Total No. of persons treated | 3490 | 10273 |
| Average daily attendance | 26 | 84 |
| No. of operations performed | 99 | 355 |
| Amount spent on European Medicines | 637/15/3 | 699/5/0 |

The low average number of daily attendance at the Akola Civil Hospital is surpassed by only four dispensaries in the province—those at Chikalda, Dharni, Ralegaon and Ner. All other Dispensaries and Hospitals in the province have better figures to show. We fail to understand why the Akola Civil Hospital should cut such a poor figure, when it is manned by a staff with an experienced officer like Lieutenant Colonel Railly at the head, which is in no way inferior to that at the Amraoti Civil Hospital. The difference in the populations of the two places cannot well account for this; or is it because the climate of Amraoti is more favourable to illnesses & accidents than that of Akola! The figures quoted above reveal the fact; and we leave it to the proper authorities to find out the proper cause of this difference and to remedy the same in the best way possible. Similarly we were surprised to see that Rs. 637—15—3 were spent for the purchase of European medicines for the Akola Civil Hospital, while Rs. 699—5—0 only were spent at Amraoti when the number of patients treated at Amraoti was nearly three times that at Akola. Can it be that the climate of Akola requires pretty large dozes of medicines for its unfortunate patients to get cured. But this theory falls to the ground when one casts a glance at the amount spent on medicines for the Akola Charitable Dispensary (Rs 348—15—2) with 14685 as its number of patients treated during the year.

The amount contributed by the District Boards and Municipalities for the maintenance of the Dispensaries in the province, is also an interesting feature of the Report. The District Boards and the Municipalities have in all contributed Rs. 18716—15—9 for maintaining the dispensaries, out of the total sum of Rs. 87365—14—6 spent for Hospitals and Dispensaries—which means that the Govt. has spent only 73.3 p. c. of the total expenditure. In order to arrive at a clear idea as to how much amount is contributed [illegible] the respective Municipalities [illegible] boards for the purpose, we quote[illegible]elow the necessary figurus:—

*MUNICIPALITIES*

| *Akola District* | *Amount* Rs. | as. | p. |
|---|---|---|---|
| Akola | 1320 | 4 | 9 |
| Khamgaon | 1308 | 1 | 2 |
| Akot | 608 | 8 | 3 |
| Shegaon | 546 | 2 | 2 |
| Total... | 3783 | 0 | 4 |

| *Amraoti District* | Rs. | as | p. |
|---|---|---|---|
| Amraoti | 1283 | 5 | 11 |
| Morsi | 214 | 12 | 0 |
| | 1498 | 1 | 11 |

| *Ellichpur District* | Rs. | as. | p. |
|---|---|---|---|
| Ellichpur Civil Hospital | 100 | 0 | 0 |
| Ellichpur city | 516 | 2 | 8 |
| | 616 | 2 | 8 |
| Total... | 5897 | 4 | 11 |

DISTRICT BOARDS

| | | | |
|---|---|---|---|
| Akola | 2840 | 0 | 10 |
| Basim | 782 | 5 | 5 |
| Buldana | 4933 | 14 | 5 |
| Amraoai | 1212 | 1 | 6 |
| Ellichpur | 1529 | 10 | 8 |
| Wun | 1521 | 10 | 0 |
| Total Rs... | 12819 | 10 | 10 |
| Grand Total Rs. | 18716 | 15 | 9 |

The Charitable Dispensary at Khamgaon has received contribution both from the Khamgaon Municipality as well as the District Board Akola, which is Rs. 1308—1—2 and Rs. 479—10—8 respectively. Among the Municipalities Akola and Khamgaon have contributed most of all while among the District Boards, the Buldana District Board heads the list. The relief of the afflicted by giving timely help in the form of medicines &c, is as much the work of the government as of the Local Bodies. It should not also be forgotten that the present Dispensaries in Berar have been of great help to the Government in the detection of murder and poison case But it has been the tendency of late to saddle a larger portion of the expenditure on the Local Bodies every year and it is therefore high time that all the Local Bodies in the province including those which have fortunately escaped the burden upto this time, should be up and determine in consultation with the Government as to what share of the expenditure on this count should fairly fall on the Provincial revenue.

Malkapur 29/5/03

A large and crowded meeting was held on Sunday the 24th. May under the auspices of Shri Kumar Harbhamji Raoji, the Deputy Commissioner Buldana District, to explain to the public the plague rules and to make them acquainted with the precautionary measures to be adopted before plague makes it appearance in the town and its surrounding villages. The assembly consisted of about five hundred men, townsmen as well as villagers. The arrangements made by the Tahsildar were excellent. The audience heard the eloquent, impressive and enthusiastic speech with eager attention and was much struck with wonder at the tone in which it was delivered. Shri Kumar Harbhamji Raoji asked the people to thoroughly disinfect their houses with "Oopalies" before plague breaks out and to evacuate them after its appearance. He said that persons coming from infected area should be segregated. He admitted the difficulties that came in the way of segregation but told the means to surmount them by building good huts for incoming relatives and by putting a few in trouble in stead of many. He advocated inoculation and lastly, he impressed upon the people the efficacy of desiccation and advised the people to provide themselves with desiccants wherever it was possible. During the time the speech was delivered, enthusiasm prevailed and the assembly appeared to be much impressed with the kind tone. The speech was delivered in Marathi, a language understood by all the assembled. After the close of the speech Khan Bahadur Kali Badiuddin thanked the eloquent speaker for the interest taken by him in the welfare of the people. And after the distribution of the Pan—Supari the meeting was dissolved.

## वऱ्हाडवृत्त.

हवामान—– या सप्तकाच्या प्रारंभीं मोठा च पाऊस पडला. एकंदर पाणी ३ इंचावर पडलें. हा पर्जन्यकाळचा पाऊस नसून आगंतुक होता व ह्मणूनच पुनः ऊन कडक पडूं लागलें आहे. वारा सोसाट्याचा सुटतो. रोगराई ह्मणण्या सारखी कोणतीच नाहीं. आणि सार्वजनिक आरोग्य चांगलें समाधानकारक आहे.

मि. आर. ए. सिम्पसन साहेब डिपुटी कमिशनर, उमरावती हे प्रकृती नादुरुस्त असल्या कारणानें सहा महिन्यांची रजा घेऊन विलायतेला रवाना झाले. त्यांच्या रजेंत मेजर मॉडवी साहेब असि. कमिशनर हे उमरावतीच्या डिपुटी कमिशनराचें काम पाहतील.

मि. सैफुद्दीन खान तहशिलदार इलिचपूर यांस एक्स्ट्रा असि. कमिशनर नेमून उमरावतीला बदलण्यांत आलें.

मि. शेख इस्मायल एक्स्ट्रा असि. कमिशनर हे मोठी रजा घेऊन मक्केस गेले होते. तिकडून ते सुरक्षितपणें परत आले असून त्यांची नेमणूक मोर्शी कोर्टावर झाली आहे.

मोर्शीहून रा. रा. बाळकृष्ण बळवंत मुळे एक्स्ट्रा असि. कमिशनर हे बडनेऱ्याच्य कोर्टावर परत येतील.

बडनेऱ्याहून मि. ओग्रेडी साहेब एक्स्ट्रा असि. कमि. यांची बदली आकोल्याच्या सिव्हिल जज्जाच्या जागीं होऊन रा० रा० विश्वनाथ नारायण दांडेकर एक्स्ट्रा असि० कमिशनर यांस मलकापूर कोर्टावर बदलण्यांत आलें वरील चार नेमणुका झाल्या विषयीं गांवांत आफवा आहे.

श्रीमती कुमारी नागुबाई जोशी या कलकत्ता युनिव्हरसिटीच्या प्रवेश परीक्षेंत पास झाल्या हें कळविण्यास मोठा आल्हाद वाटतो. राजश्री मोरो विश्वनाथ जोशी यांनीं या आपल्या ज्येष्ठ कन्येला अविवाहित ठेवून चांगली विदुषी केली ही गोष्ट त्यांच्या मानसिक धैर्याची व सुधारणेच्या कळकळीची साक्ष देते. श्रीमती नागुबाई यांचें आह्मी पुनः अभिनंदन करितों. अशा या सद्गुणी कुमारीला ही विजयश्री ह्मणजे तिची मंगल सौख्यराशींचें प्रसादचिन्हच होय.

आकोल्याचे पोलिस सुपरिंटेंडंट मि० कूड हे उन्हाळ्या निमित्त रजेवर गेले असून त्या रजेंत उमरावतीचे असि. पो० सुपरि० मि० हर्बर्ट यांस येथें पोलीस सुपरिंटेंडंट नेमण्यांत आलें.

## आकोला बाजारभाव

| | |
|---|---|
| हुंडी दर्शनी | १००८=॥ |
| सोनें २४।= | चांदी ६९ |
| ज्वारी ४९।१० | जवस १०४ |
| गहूं | ८० ते १०० |
| बाजरी | ४० ४९ |
| मीठ | १८=॥ रु. मण |
| चणे | ३॥= रु. मण |
| तूप | ७॥ ८ रु. मण |
| तेल | ९॥ रु. मण |
| रुई | १०।१९ |


## जाहिरात

अकोला येथील फीमेल ट्रेनिंग क्लासच्या पहिल्या वर्षाच्या वर्गांत येऊं इच्छिणाऱ्या स्त्री उमेदवाराची परीक्षा घेण्याची तारीख २२ जून (सकाळीं ८ वाजतां) ठरविली आहे. ज्या कोणास या वर्गांत यावयाचें असेल त्यांनी हेड मिस्ट्रेस म्युनिसिपल गर्ल्स स्कूल अकोला यांस त्या दिवशीं समक्ष भेटावें. परीक्षा घेऊन योग्य ठरतील त्यांसच या वर्गांत घेतलें जाईल.

(Signed) C. H. Candy
Director of Public Instruction
30/5/30 Hyderabad Assigned District.


## वर्तमानसार

in Berar for the year 1902 with an explanatory note thereon by Lieutenant Colonel Swaine have been just out. The explanatory note is very brief and one has to wade patiently through the several statements accompanying the note, to make oneself fairly acquainted with the state of the Dispensaries and Hospitals during the past year. The number of Charitable Dispensaries and Hospitals in the Province during the year was the same as that in the previous year viz 47. The total number of patients treated in the Dispensaries and Hospitals during the year, was 354142 out of whom 2,10,029 were Hindus and 1,31,903 were Mahomedans. Comparing these figures with the total population in the Province one cannot fail to notice that the Hindus have not yet got over their scruples about English Medicines. There was a pretty large decrease in the number of out—patients viz 10815, which is chiefly attributed by Lieutenant Colonel Swaine to the scare in the native population in the districts of Akola, Buldana and Basim, caused by the undertaking of plague measures in these districts. The chief medical authority in this province has thus indirectly sounded a condemnatory note on the plague measures of the Government, on this *one* ground—that they are not liked by the Public!

The Pentecostal Mission at Buldana has been doing good work in that district as 5190 patients in all were treated in the year under report, by that institution. It is said that people living within a radius of 30 miles resorted to this institution for medical treatment. We are glad to find that the philanthrophy of the mission is being so well appreciated by the native population in the District. Let us hope that the noble example of this institution in helping the poor and the afflicted will be followed by persons who have the means and ability to do so.

On looking at the work of the individual Dispensaries and Hospitals, in the province, one cannot help being struck with the contrast afforded by the Civil Hospitals of Akola and Amraoti. The figures of the respective Hospitals are given below:—

*Civil Hospital*

| | Akola | Amraoti |
|---|---|---|
| Total No. of persons treated | 3490 | 10273 |
| Average daily attendance | 26 | 84 |
| No. of operations performed | 99 | 355 |
| Amount spent on European Medicines | 637/15/3 | 699/5/0 |

The low average number of daily attendance at the Akola Civil Hospital is surpassed by only four dispensaries in the province—those at Chikalda, Dharni, Ralegaon and Ner. All other Dispensaries and Hospitals in the province have better figures to show. We fail to understand why the Akola Civil Hospital should cut such a poor figure, when it is manned by a staff with an experienced officer like Lieutenant Colonel Railly at the head, which is in no way inferior to that at the Amraoti Civil Hospital. The difference in the populations of the two places cannot well account for this; or is it because the climate of Amraoti is more favourable to illnesses & accidents than that of Akola! The figures quoted above reveal the fact; and we leave it to the proper authorities to find out the proper cause of this difference and to remedy the same in the best way possible. Similarly we were surprised to see that Rs. 637—15—3 were spent for the purchase of European medicines for the Akola Civil Hospital, while Rs. 699—5—0 only were spent at Amraoti when the number of patients treated at Amraoti was nearly three times that at Akola. Can it be that the climate of Akola requires pretty large dozes of medicines for its unfortunate patients to get cured. But this theory falls to the ground when one casts a glance at the amount spent on medicines for the Akola Charitable Dispensary (Rs 348—15—2) with 14685 as its number of patients treated during the year.

The amount contributed by the District Boards and Municipalities for the maintenance of the Dispensaries in the province, is also an interesting feature of the Report. The District Boards and the Municipalities have in all contributed Rs. 18716—15—9 for maintaining the dispensaries, out of the total sum of Rs. 87335—14—6 spent for Hospitals and Dispensaries—which means that the Govt. has spent only 73.3 p. c. of the total expenditure. In order to arrive at a clear idea as to how much amount is contributed by the respective Municipalities and Boards for the purpose, we quote below the necessary figurus:—

*MUNICIPALITIES*

| *Akola District* | *Amount* Rs. | as. | p. |
|---|---|---|---|
| Akola | 1320 | 4 | 9 |
| Khamgaon | 1308 | 1 | 2 |
| Akot | 608 | 8 | 3 |
| Shegaon | 546 | 2 | 2 |
| Total... | 3783 | 0 | 4 |
| *Amraoti District* | Rs. | as | p. |
| Amraoti | 1283 | 5 | 11 |
| Morsi | 214 | 12 | 0 |
| | 1498 | 1 | 11 |
| *Ellichpur District* | Rs. | as. | p. |
| Ellichpur Civil Hospital | 100 | 0 | 0 |
| Ellichpur city | 516 | 2 | 8 |
| | 616 | 2 | 8 |
| Total... | 5897 | 4 | 11 |

DISTRICT BOARDS

| | | | |
|---|---|---|---|
| Akola | 2840 | 0 | 10 |
| Basim | 782 | 5 | 5 |
| Buldana | 4933 | 14 | 5 |
| Amraoai | 1212 | 1 | 6 |
| Ellichpur | 1529 | 10 | 8 |
| Wun | 1521 | 10 | 0 |
| Total Rs... | 12819 | 10 | 10 |
| Grand Total Rs. | 18716 | 15 | 9 |

The Charitable Dispensary at Khamgaon has received contribution both from the Khamgaon Municipality as well as the District Board Akola, which is Rs. 1308—1—2 and Rs. 479—10—8 respectively. Among the Municipalities Akola and Khamgaon have contributed most of all while among the District Boards, the Buldana District Board heads the list. The relief of the afflicted by giving timely help in the form of medicines &c, is as much the work of the government as of the Local Bodies. It should not also be forgotten that the present Dispensaries in Berar have been of great help to the Government in the detection of murder and poison case But it has been the tendency of late to saddle a larger portion of the expenditure on the Local Bodies every year and it is therefore high time that all the Local Bodies in the province including those which have fortunately escaped the burden upto this time, should be up and determine in consultation with the Government as to what share of the expenditure on this count should fairly fall on the Provincial revenue.

Malkapur 29/5/03

A large and crowded meeting was held on Sunday the 24th. May under the auspices of Shri Kumar Harbhamji Raoji, the Deputy Commissioner Buldana District, to explain to the public the plague rules and to make them acquainted with the precautionary measures to be adopted before plague makes it appearance in the town and its surrounding villages. The assembly consisted of about five hundred men, townsmen as well as villagers. The arrangements made by the Tahsildar were excellent. The audience heard the eloquent, impressive and enthusiastic speech with eager attention and was much struck with wonder at the tone in which it was delivered. Shri Kumar Harbhamji Raoji asked the people to thoroughly disinfect their houses with "Oopalies" before plague breaks out and to evacuate them after its appearance. He said that persons coming from infected area should be segregated. He admitted the difficulties that came in the way of segregation but told the means to surmount them by building good huts for incoming relatives and by putting a few in trouble in stead of many. He advocated inoculation and lastly, he impressed upon the people the efficacy of desiccation and advised the people to provide themselves with desiccants wherever it was possible. During the time the speech was delivered, enthusiasm prevailed and the assembly appeared to be much impressed with the kind tone. The speech was delivered in Marathi, a language understood by all the assembled. After the close of the speech Khan Bahadur Kali Badiuddin thanked the eloquent speaker for the interest taken by him in the welfare of the people. And after the distribution of the Pan—Supari the meeting was dissolved.

## वऱ्हाडवृत्त.

हवामान—– या सप्तकाच्या प्रारंभीं मोठा च पाऊस पडला. एकंदर पाणी ३ इंचावर पडलें. हा पर्जन्यकाळचा पाऊस नसून आगंतुक होता व ह्मणूनच पुनः ऊन कडक पडूं लागलें आहे. वारा सोसाट्याचा सुटतो. रोगराई ह्मणण्या सारखी कोणतीच नाहीं. आणि सार्वजनिक आरोग्य चांगलें समाधानकारक आहे.

मि. आर. ए. सिम्पसन साहेब डिपुटी कमिशनर, उमरावती हे प्रकती नादुरुस्त असल्या कारणानें सहा महिन्यांची रजा घेऊन विलायतेला रवाना झाले. त्यांच्या रजेंत मेजर मॉडवी साहेब असि. कमिशनर हे उमरावतीच्या डिपुटी कमिशनराचें काम पाहतील.

मि. सेफुद्दीनखान तहशिलदार इलिचपूर यांस एक्स्ट्रा असि. कमिशनर नेमून उमरावतीला बदलण्यांत आलें.

मि. शेख इस्मायल एक्स्ट्रा असि. कमिशनर हे मोठी रजा घेऊन मक्केस गेले होते. तिकडून ते सुरक्षितपणें परत आले असून त्यांची नेमणूक मोर्शी कोर्टावर झाली आहे.

मोर्शीहून रा. रा. बाळकृष्ण बळवंत सुळे एक्स्ट्रा असि. कमिशनर हे बडनेऱ्याच्य कोर्टावर परत येतील.

बडनेऱ्याहून मि. ओग्रेडी साहेब एक्स्ट्रा असि. कमि. यांची बदली आकोल्याच्या सिव्हिल जजाच्या जागीं होऊन रा० रा० विश्वनाथ नारायण दांडेकर एक्स्ट्रा असि० कमिशनर यांस मलकापूर कोर्टावर बदलण्यांत आलें वरील चार नेमणुका झाल्या विषयीं गांवांत आफवा आहे.

श्रीमती कुमारी नागुबाई जोशी या कलकत्ता युनिव्हरसिटीच्या प्रवेश परीक्षेंत पास झाल्या हें कळविण्यास मोठा आल्हाद वाटतो. राजश्री मोरो विश्वनाथ जोशी यानीं या आपल्या ज्येष्ठ कन्येला अविवाहित ठेवून चांगली विदुषी केली ही गोष्ट त्यांच्या मानसिक धैर्याची व सुधारणेच्या कळकळीची साक्ष देते. श्रीमती नागुबाई यांचें आह्मी पुनः अभिनंदन करितों. अशा या सद्गुणी कुमारीला ही विजयश्री ह्मणजे भावी मंगल सौख्यराशीचें प्रसादचिन्हच होय.

आकोल्याचे पोलिस सुपरिन्टेंडंट मि० कूड हे उन्हाळ्या निमित्त रजेवर गेले असून त्या रजेंत उमरावतीचे असि. पो० सुपरि० मि० हर्बर्ट यांस येथें पोलीस सुपरिन्टेंडंट नेमण्यांत आलें.

## आकोला बाजारभाव

| | | | |
|---|---|---|---|
| हुंडी दर्शनी | | | १००४=॥ |
| सोनें २४।= | | चांदी | ६५ |
| ज्वारी | ४१।१० | कपास | १०४ |
| गहू | | | ८० ते १०० |
| बाजरी | | | ४० ४५ |
| मीठ | | | १८=॥ रु. मण |
| चणे | | | ३॥= रु. मण |
| तूप | | | ७॥ ८ रु. मण |
| तेल | | | ६॥ रु. मण |
| रुई | | | ९०।१५ |


## जाहिरात

अकोला येथील फीमेल ट्रेनिंग क्लासच्या पहिल्या वर्षाच्या वर्गांत येऊं इच्छिणाऱ्या स्त्री उमेदवाराची परीक्षा घेण्याची तारीख २९ जून ( सकाळीं ८ वाजतां ) ठरविली आहे. ज्या कोणास या वर्गांत यावयाचें असें ल त्यांनी हेड मिस्ट्रेस म्युनिसिपल गर्ल्स स्कूल अकोला यास त्या दिवशीं समक्ष भेटावें. परीक्षा घेऊन योग्य ठरतील त्यांसच या वर्गांत घेतलें जाईल.

(Signed) C. H. Candy
Director of Public Instruction
30/5/30 Hyderabad Assigued District.


## वर्तमानसार

**नवीन यंत्र**—एका इटालियन शोधकानें खोल समुद्रांत प्रकाश पाडण्याचें एक यंत्र शोधून काढलें आहे. या यंत्रास खर्च फार थोडा लागत असून त्याच्या योगानें समुद्रांत २९० फूट लांबी पर्यंत चकचकीत प्रकाश पडूं शकतो व तो आजूबाजूस १६० फूट पर्यंत पसरतो असें आढळून आलें आहे. व अधिक उंच प्रतीचा यांत्रसाळा वापरल्यास हा प्रकाश पाहिजे तितका लांब पोंचूं शकेल असें या शोधकाचें म्हणणें आहे.

**अंतर्दृष्टीचे प्रयोग**— लंडनमध्यें एक अमेरिकन गृहस्थ आला असून त्यानें तेथें अंतर्दृष्टीचे बरेच प्रयोग करून दाखविले. घरापासून अमुक ठिकाणीं एकदां त्यास नेल्या नंतर परत येतांना रस्ते कितीही वाकडे असले तरी डोळे बांधून ठेवले असतांही त्याच रस्त्यानें गाडी हाकीत तो परत येतो, गाडी तो भेवक्या ठिकाणीं वळवितो, पुढें मनुष्य आल्यास थोडेही आदळून घरतो! डोळे बांधल्यावर त्याचे डोक्यासभोंवती तार गुंडाळलेली असून त्यांची टोकें गाडीत बसलेल्या इतर मंडळींनीं हातांत धरावी एवढीच त्याची या प्रयोगांत अट आहे.

**विजेचें झाड**— मध्य हिंदुस्थानचे जंगलांत असें एक चमत्कारिक झाड सांपडलें आहे कीं याचीं पानें फार लाजाळू असून त्यास हात लावतांच विजे प्रमाणें धक्का बसतो त्याजवळ लोहचुंबकाची कांडी नेली असतां तिजवरही याचा परिणाम होतो. तो इतका कीं ती झाडापासून ७० फूट लांब असली तरी ती हालूं लागते. या झाडा जवळ पक्षी किंवा किडे सुद्धां जात नाहींत.

## फळांचा औषधी उपयोग.

**ॲपल**— या फळाच्या सेवनानें उत्तम रक्तशुद्धि होते इतकेंच नसून ते मज्जांशावर उत्तम लागू पडतें व तसेंच कोणत्याही मादक पदार्थाच्या सेवनानें आलेली गुंगी हें फळ तावडतोब घालवितें. दारूच्या व्यसनांत गुरफटून गेलेल्या लोकांनीं या फळाचें सेवन दिवसांतून तीन वेळां केल्यास त्यांची दारू वरील इच्छा उडून जाते असा या फळाच्या अंगीं विलक्षण गुण आहे.

**पाइन ॲपल**—नांवाचें एक फळ आहे ज्याच्या सेवनानें घशांतील विकार नाहींसे होतात, या फळानें वरील विकाराचे कित्येक रोगी मृत्यूच्या तडाक्यांतून बचावले आहेत. याच्या योगानें घशांत चिकटून राहणारा कफ फारच त्वरित सुटून मनुष्य मोकळा होतो.

**अक्रोड**—संधिवात, गुडघी वगैरे रोगावर अक्रोडांचा विलक्षण उपयोग होतो. अत्यंत जुनाट संधिवात असला तरी अक्रोडाच्या सेवनानें त्यापासून होणारें दुःख हळूहळू कमी होत जातें.

**लिंबू**—लिंबासारखें गुणकारी फळ दुसरें मिळावयाचें नाहीं. या फळाच्या अंगीं क्विनाईनचा गुण असल्यानें ताप आलेल्या मनुष्यास रात्रीं निजते वेळीं पेलाभर ऊन पाण्यांत एक लिंबू पिळून तें मिश्रण प्यावयास दिलें असतां दुसऱ्या दिवशीं सकाळीं दरदरून घाम येऊन रोगी तापापासून मुक्त होतो.

**अनुभव**—केळीच्या सोपटांतील तंतूपासून कापड विणतां येईल कीं नाहीं हें पाहण्यासाठीं त्रावणकोर दरबारनें २९ प्रकारच्या सोपटांवर प्रयोग करून पाहिले. त्यावरून असें आढळून आलें कीं, सुमोर १२ प्रकारच्या केळीपासून इतके बारीक तंतू निघतात कीं त्यापासून टिकाऊ व रेशमा प्रमाणें कापड तयार करितां येतें. बाकीच्या प्रकारांपासून जाडे भरडे कापड व दोर करितां येतात.

**डाक्टरची पेटी**—पारीस शहरांतील सर्व मुख्य मुख्य रस्त्यांतून लवकरच 'प्रत्येकाचा डाक्टर' या नांवाच्या पेट्या उभारावयाच्या आहेत. या पेट्यास बाहेरून कपाळ दुःखी दात दुखी, पडशी वगैरे सामान्य १० रोगांचीं नांवें घातलेलीं आहेत, व त्या प्रत्येक नांवाचे खालीं पेटीस एकेक फट ठेवली आहे. ज्या ला जो रोग असेल त्यानें त्या फटींत १ पेनी (१ आणा) टाकला कीं, पेटींतून आपोंआप त्या रोगावरील औषधाची एक पुडी व अनुपानपत्र बाहेर यावयाचें, अशी त्या पेटींत यांत्रिक योजना केली आहे.

**ठेंगू मनुष्यें**— सुब्रह्मण्य मुनिस्वामी व परिमल नायडू या नांवांचीं दोन ठेंगू मनुष्यें मद्रासेहून न्यू यार्क येथें ता. १८ एप्रिल रोजीं पोंचलीं. थोरल्याचें वय ३८ असून त्याची उंची फक्त २८ इंच आहे.

**नापसंतीचा कळस**-- पुण्यास चंद्रचूड घराण्यांतील एका तरुणानें पत्नीच्या नापसंतीमुळें अफू खाऊन जीव दिला. लग्नसमयींच त्यानें वधू बद्दल नापसंती दर्शविली होती परंतु ती पूर्ण करून दाखविण्याचा प्रसंग त्यानें फलशोभनाचे दिवशीं आणला! बिचारा हतभागी खरा! जीव देण्यापेक्षां दुसरा पसंती विवाह करण्यास त्यास कशी बुद्धी सुचली नाहीं? अविचारानें त्यानें आपलाच घात का केला कोण जाणे!

**सूर्यावर डाग**— सूर्याच्या पृष्ठभागीं भयंकर मोठाली खळबळ चालली आहे व एक नवीनच विस्तृत डाग दिसूं लागला आहे असें म्हणतात. यामुळें आतां पाऊस चांगला पडेल असेंही भाकीत करण्यांत आलें आहे.

**लग्नाबद्दल कायदा**— आरजेंटिनामध्यें पुरुषांच्या लग्नासंबंधानें असा कायदा केला आहे कीं प्रत्येक मनुष्य २० वर्षांचा झाला म्हणजे तो लग्न करण्यास लायक ठरतो. या नंतर त्यानें तीस वर्षांपर्यंत लग्न न केल्यास प्रत्येक महिन्यास पांच डॉलर प्रमाणें लग्न होईपर्यंत दंड दिला पाहिजे. या प्रमाणें दंड भरून तो तीस वर्षांपर्यंत तसाच लग्न झाल्याशिवाय राहिल्यास पुढें दरमहा १ डॉलर प्रमाणें दंड ३५ वर्षांपर्यंत दिला पाहिजे. त्यापुढें तसाच राहिल्यास पन्नास वर्षपर्यंत दरमहा २० डालराप्रमाणें दंड भरावा लागतो. पुढेंही लग्न झालें नाहीं तर ७० वर्षांपर्यंत १० डालरप्रमाणें दंड दिला पाहिजे. इतक्या नंतरही लग्न झाल्याशिवाय तो राहिल्यास ८० वर्षांपर्यंत दरमहा २० डॉलराप्रमाणें दंड घेण्यांत येतो. तोंपर्यंत लग्न न झाल्यास पुढें दंडांतून मुक्त होतो. एखाद्यानें लग्न केलें आणि दुर्दैवानें तो विधुर झाला तर त्यानें तीन वर्षांच्या आंत दुसरें लग्न केलें पाहिजे या मुदतींत त्यानें लग्न न केल्यास तो दंडास पात्र होतो. यांत दुसरी एक अट अशी ठेवली आहे कीं, जर एखाद्या स्त्रीशीं कोणी लग्न जुळवीत असतां तिजकडून नकार मिळाला व तसें वर्षांतून तीन वेळां घडून आलें व तसें झाल्याचें त्या स्त्रीनायक त्यानें शाबीत केलें तर तो दंडास पात्र नाहीं. आतां स्त्रीनें पुरुषांस नाकबूल का केलें याची शाबिती करणें पुरुषांस मात्र जरा विचाराचें आहे. कांहीं तरी कमीपणा दुर्गुण वगैरे एखादी खोड असल्याशिवाय स्त्री पुरुषास कधीं नाकबूल करणार नाहीं. अशाच प्रकारचा स्त्रियांविषयींही कांहीं तरी निर्बंध असला पाहिजे. या देशांत प्रजा फार कमी असावी असें दिसतें. ती वाढविण्यासाठीं अशा प्रकारचा कायदा केला असावा.

**केंस स्वच्छ व मजबूत होण्यास उपायः**— २॥ तोळे नवसागर, व १। तोळा कापूर घेऊन त्याची अगदीं बारीक पूड करावी. सुमारें अच्छेर कढकढीत पाण्यांत ती घालून चांगली विद्रुत होऊं द्यावी. निवाल्यावर या मिश्रणाचा उपयोग करावा. त्यानें दरविवर केंस धोऊन ओले करावेत. यापासून केंस स्वच्छ व मजबूत होतात, एवढेंच नव्हे, पण तुकतुकीत व सुंदर होतात. त्यांचा रंग बदलत नाहीं व केंस लौकर जात नाहींत, त्यामुळें टक्कल पडत नाहीं. कापराचा कांहीं भाग खालीं बसतो, तथापि जरूरी पुरता अंश उदकाशी मिसळतो.

**कोंबड्याच्या नांवानें मृत्युपत्र**—नुकतीच एक युरोपियन लेडी मरण पावली. तिचा पुनर्जन्मावर विश्वास असे. तिजजवळ एक देखणा कोंबडा होता. आपल्या मृतपतीच्या आत्म्यानें त्या कोंबड्याच्या पोटांत प्रवेश केला असा तिचा पक्का ग्रह झाला. तिनें या कोंबड्या करितां मुद्दाम एक चांगली जागा तयार केली व आपल्या सर्व चाकर माणसांस असा हुकूम केला कीं सर्वांनीं याला आपला धनीच समजून वागावें या कोंबड्याचें नाव तिनें निर्दय असें ठेविलें जर एखादी कोंबडी या कोंबड्या जवळ आली तर या लेडीनें जाऊन तत्काळ त्या कोंबडीस ठार करावें. मरतांना तिनें मृत्युपत्र करून ठेविलें. तिच्या वारसांनीं मोठ्या आशेनें मृत्युपत्र उघडलें तों सर्व मालमत्तेचा धनी तो कोंबडा असें त्यांना कळलें तेव्हां त्यांनीं त्या कोंबड्यावर फिर्याद वगैरे करण्याच्या भरीस न पडतां त्याची हळून मान मुरगळून त्याला आपल्या पोटांत जागा दिली व सर्व मालमत्ता आपण दाबली.

**रक्षक पतंग**—फ्रान्सांत एका कल्पक मनुष्यानें एक पतंग असा तयार केला आहे कीं तुफानांत एकादें गलबत सांपडून जेव्हां फुटतें तेव्हां त्यांतील उतारूचे प्राण यानें वाचविता यावेत. या पतंगाच्या साहाय्यानें मनुष्य समुद्रांतून दीड हजार यार्डांवरून किनाऱ्यास येतो.

**हुषार मुलगी**—लंडनमध्यें एक मुलगी आपल्या स्वतःच्या बुद्धिसामर्थ्यानें लोकांचे अर्ज, पत्रें वगैरे लिहून ते टाइप रायटर यंत्रावर छापून देते व या प्रमाणें काम करून ती दररोज रु० पासून ७५ रुपये मिळविते. कामच्या हक्काचे सबंद दिवस खर्चवाशी करणाऱ्या पुरुषांना रोज चार आणे सुद्धां मिळण्याची मारामार पडते!

**चाल**— जपानमध्यें वनभोजन वगैरेंच्या प्रसंगीं अशी एक चाल आहे कीं, भोजनास आलेल्या मंडळीस जे कोरडे पदार्थ खावयाचे नसतील ते त्यांनीं आपल्या खिशांत घालून घरीं न्यावेत.

**भयंकर आग**— चीन मधील कॅंटन येथें आरसेनल फॅक्टरीस आग लागून तींत १५००० मनुष्यें जळून मेलीं.

**वाघाची कुस्ती**— बागमोडलें येथें एका मेंढक्यानें वाघाचे अंगावर जाऊन त्याच्याशीं बराच वेळ कुस्ती करून त्यास चीत केलें. नंतर लोकांनीं त्याच्या मदतीस येऊन वाघास ठार मारलें. वाघाबरोबर झोंबी खेळणारे हल्लींच्या काळांत क्वचितच सांपडतील.

**विलक्षण झाड**— दक्षिण अमेरिकेंत एक विलक्षण झाड दृष्टोत्पत्तीस आलें आहे. यापासून ऊसापेक्षां वीसपट अधीक साखर तयार होऊं शकते.

**पावसाचें यंत्र**— पारीस येथें उन्हाळ्याच्या दिवसांत रस्त्यावरील धूळ बसविण्याकरितां व हवेंत गारवा आणण्याकरितां मि० बेरिकस नांवाचे एक म्युनिसिपल इंजिनीयर विजेच्या सहाय्यानें कृत्रिम पर्जन्यवृष्टि करण्याचें यंत्र तयार करीत आहेत. या यंत्रास ७२० पौंड खर्च लागेल असा अंदाज आहे, या यंत्राची गती तासा सातपासून दहा मैल असल्यानें दर तासांत सात पासून दहा मैलांपर्यंत रस्त्यावर पाण्याचा शिडकाव करितां येईल. या यंत्राचा प्रयोग आगष्ट महिन्यें करून पहाणार आहेत. फायदेशीर दिसल्यास दुसरीं यंत्रें तयार करण्यांत येणार आहेत.

---

## NOTICE

—:o*o:—

All persons are, hereby, informed that if they do not attend in person or by Agent all copies will be sent to them by Value Payable post, provided that they give their full and correct address in the application for copy. Dated 11th. May 1903. District Wun.

(Sd.) NIZAMUDDIN
Deputy Commissioner
Yeotmal.

---

## नोटिस.

सर्वत्र लोकांस या नोटिशीनें कळविण्यांत येतें कीं, जे कोणी स्वतः अगर मुखत्यार मार्फत हजर होणार नाहींत त्यांच्या नकला त्यांनां व्ही. पी. नें पाठविल्या जातील. मात्र अर्जदारानें नकले करितां दिलेल्या अर्जांत आपला पूर्ण आणि बरोबर पत्ता दिला पाहिजे. ता. ११।५।०३ इ. जिल्हा वणी

सही
निजामुद्दीन
डेप्युटी कमिशनर
यवतमाळ जि. वणी.

REGISTERED N. N

बाहेरगांवी टपालहांशीलसह ........ २ ६
वर्गणी आगाऊच दिली पाहिजे.
किरकोळ अंक........................८२
नोटिशी बद्दल
१० ओळींचे आंत रु० १
दर ओळीस........८१ ०६
दुसरे खेपेस.... ........८१

All Subscriptions to be paid in advance,
Single copy ........................ 2 as
Advertisement
below 10 lines ...... 2 Rs
Per line over 10 ......3 as
Repetition Per line ...2 as

# वऱ्हाडसमाचार.

## THE BERAR SAMACHAR

VOL XXXVII AKOLA MONDAY 1 JUNE 1903 NO. 21

वर्ष ३७ आकोला सोमवार तारीख १ माहे जून सन १९०३ इ० अंक २१

### नोटीस

बेशमी रा. रा. बुत्रसिंग वल्लद गुमानसिंग देशमुख मौजे हिंगणे कारेगांव परगणे बाळापूर तालुका खामगांव जिल्हा आकोला यांस

खाली सही करणार महिपतराव वल्लद गोविंदराव देशमुख राहणार मौजे हिंगणे कारेगांव परगणे बाळापूर तालुका खामगाव याजकडून जाहिर नोटीस देण्यांत येते कीं मौजे मजकूर येथील स्थावर माल दोन शेतातील दोन पट्या वाटलेल्या तुम्ही माझे चुलत बंधु ह्मणून खरेदी लिहून दिल्या. हजार रुपयांची शेती १०० रुपयांस खरेदी लिहून तुम्हाजवळ गहाणांप्रमाणें ठेविली. शेती माझ्या ताब्यांतच पूर्वी पासून आज पर्यंत आहे. खरेदी लिहिली तेव्हांच तुम्ही करार केला कीं दुहोत्रा व्याजा सुद्धां रुपये आणून द्यावे ह्मणजे खरेदीखताचा हक सोडून देईन त्या करारा प्रमाणें मीं तुम्हाला मुद्दल २०० रुपये घेऊन व्याजाच्या शंभर १०० रुपयाबद्दल निराळा पुर्जा करून दिला; आणि त्या खरेदी खतामागें तुम्ही असा शेरा लिहिला कीं खरेदीचे कर्जाचे रुपये भरून पावलों. व खरेदीचा हक्क राहिला नाहीं. या खरेदी खताच्या पाठीमागे लिहिलेल्या लेखावर तुम्ही सही केली व त्यावर साक्षीही टाकल्या आहेत.

हें रद्द केलेलें खरेदीखत तुम्ही उलट खरेदीच्या कागदा सुद्धां मला वापस देणार होता. परंतु आळशा मुळें व बंधुपणाच्या विश्वासामुळें ती गोष्ट तशीच राहिली. तुम्ही खरेदीची नक्कल घेतली ह्मणून संशयाला कारण झालें आहे. ही जिन्नगीची गोष्ट आहे तेव्हां तुम्ही कागद पत्र नोट करून द्यावे ह्मणजे पुढें मुलाबाळांस उभयपक्षीं तसलीफ होणार नाहीं. ही नोटीस पोचल्या पासून एक महिन्याच्या आंत रद्द केलेला खरेदीचा कागद वापस करावा आणि उलट खरेदीचा कागद लिहून नोंदून द्यावा ह्मणजे माझ्यावर मोठी मेहरबानी होईल. व संशयाला कारण राहणार नाहीं. कळावें. २९ मे १९०३ इ०

सही
महिपती गोविंदराव व देशमुख
दस्तुर खुद्द.

### नोटीस

रा. रा. बापू वल्लद नारायण मोपळे मुक्काम मलकापूर यांस:-- पुंजी मर्दे बापू मोपळें वस्ती कसेब वडोदे इजकडून नोटीस देण्यांत येते कीं मी तुमची लग्नाची बायको असून तुम्ही मजला सात आठ वर्षांपासून टाकून दिले. मी माझे आईच्या घरीं किती दिवस राहावें? अज्ञान होती तो पावेतों आईनें पोसले. हल्लीं आठ वर्षांपासून मी मजुरी करून पोट भरते. मजुरी पुरत नसल्यामुळें मजला दरमहा रुपये २ प्रमाणें आठ वर्षांचे रुपये १९२ कर्ज झाले आतां पुढें मजला रुपये कोणी कर्ज देईल असें दिसत नाहीं ह्मणून कळवितें कीं नोटीस पावल्या दिवसा पासून आठ दिवसांचे आंत येऊन १९२ रुपये देऊन मजला घेऊन जावें तसें तुह्मी न केल्यास हीच तुमची फारकती समजून गंधर्वांचा जाती रिवाजा प्रमाणें नवरा करीन. मग तुमचा लग्नपणाचा कांहीं हक्क राहणार नाहीं. हक दाखविल्यास या नोटिशीवरून रद्द असे. शिवाय आज पावेतों तुमचेवर अवलंबून राहिल्या बद्दल मजला जे १९२ रुपये कर्ज झाले ते तुमचे पासून दिवाणी कोर्टांत दावा करून भरून घेतले जाईल हे खास समजावें. नोटीस पावल्या पासून आठ दिवसांचें आत येऊन १९२ रुपये देऊन मजला घेऊन जावें तसें न केले तर हीच फारकती समजून मी दुसरा नवरा करीन मग तुमचा लग्न संबंधाचा हक राहणार नाहीं. खर्च मागितल्यास तो रद्द असे शिवाय तुम्हास नोटिशीचा खर्च व पोटाचा खर्च १९२ रुपये द्यावे लागतील. कळावें. तारीख २४ माहे मे सन १९०३ इसवी.

( सही )
पुंजी मर्दे बापू मोपळे वस्ती
कसेब वडोदे पेटा येदलाबाद
निशाणी हातची
बांगडी असे.

### नोटीस.

बेशमी ( १ ) रामराव व्यंकटेश मुनशी व ( २ ) भिकाजी वल्लद कोंडाजी उभयतां राहणार आकोला. यांस:-

खाली सही करणार याजकडून नोटीस देण्यांत येते कीं मौजे उमरखेड तालुका आकोला येथील शेत सर्वे नंबर १३ एकर ३१ गुंठे १७ आकार रुपये ५७ हें शेत माझ्या मालकीचे व स्वसंपादित आहे. त्या शेतावर कोणाचा हक्क संबंध नाहीं असें असून तुह्मा दोघा पैकीं पहिल्यानें दुसऱ्याकडून त्या शेतातील १/२ हिस्सा विकत घेतला आहे. भिकाजीला हा हिस्सा खरेदी देण्याचा कोणताच अधिकार नाहीं, तो दारूबाज निवाला आहे ह्मणून त्याला फसवून रामरावानें खरेदी खत लिहून घेतले असें दिसतें. खरेदीची गुणगुण ऐकल्यावरून मी खरेदीची नक्कल काढविली आणि त्यावरून असेंही कळलें कीं तुह्मी दोघा लबाडांनीं माझी त्या कागदावर खोटी साक्ष टाकली आहे. तुह्मी मुद्दाम्यानें तो कागद परत आणून मजकडून फाडवून द्यावा. असा बनावटी खोटा कागद केल्या बद्दल मी तुह्मावर फौजदारींत फिर्याद करणार आहे. तुह्मी शेतांत पाय टाकाल तर तुमचा आगळीकी बद्दल फौजदारी कोर्टांत जबाब घेतला जाईल. आणि योग्य प्रकारें तुह्मास शेतातून हाकलून दिलें जाईल. माझ्या शेता संबंधानें सदहू खोटें खरेदीखत रद्द व बातल आहे. कळावें तारीख २६ मे सन १९०३ इसवी.

सही.
कोंडजी वल्लद सटवाजी
दस्तुर खुद्द.

### नोटीस

नोटीस बेशमी रावजी वा भीमजी शिंदे राहणार मौजे केळीवेळी तालुके अकोट यास:—

खालीं सही करणार याजकडून नोटीस देण्यांत येतें कीं माझी मुलगी नामे सारजी मर्द रावजी ही तुमची लग्नाची बायको असोन तुह्मी तिजला लग्न झाल्या पासून चार पांच वर्षे तिची नेआण करून चांगले रितीनें वागविले, हल्लीं तुह्मी आठ वर्षां पासून रोगांनीं ग्रस्त झाले असोन जन रिती प्रमाणें माझे मुलीचा संसार करण्यास असमर्थ झाले आहा करितां या नोटिसीनें कळविण्यांत येतें कीं ज्या अर्थी तुह्मी मुलीचा संसार करण्यास नालायक आहांत त्या अर्थी ही नोटीस पावल्या पासून आठ दिवसाचे आंत माझे मुलीचा दुसरा घरठाव करण्या करितां फारकती द्यावी. जर तुह्मी फारकती देणार नाहीं तर माझे घरी मुलगी आठ वर्षां पासून असोन तिचे खावटी खर्चा बद्दल दर साल रु. ५० प्रमाणें मी लोकांचे कर्ज काढून तिला पोसिले आहे ते रुपये एकंदर ४०० व ह्या नोटिसीचा खर्च तुह्मास द्यावा लागेल तुह्मी आपसांत वरील प्रमाणें निकाल न केल्यास खावटी खर्चा बद्दल व ह्या नोटिसीच्या खर्चा बद्दल रिती प्रमाणें दिवाणींत दावा करून कोर्ट खर्चा सुद्धा सर्व पैसे भरून घेऊं. शिवाय फारकती न दिल्याबद्दल हीच नोटीस फारकती समजून माझे मुलीचा दुसरा गंधर्वांचा नवरा करून देईन मग तुमचा नोवरेपणाचा हक्क राहणार नाहीं. ही नोटीस दिली ता. २९।५।१९०३ इ.

सही
सखाराम वा मानाजी मरोदे राहणार
पाळोदी ता० अकोले नि. खु.

### नोटीस

नोटीस बेशमी हरमान, गंभीर व किसन वा योगाजी लोढम जात कुणबी धंदा शेतीचा राहणार कानडी परगणें पिंजर तालुके आकोला यासी नोटीस देणार भगवान वा योगाजी लोढम जात कुणबी राहणार कानडी नोटीस देण्यांत येतें कीं, कानडी, घोंग व इराहीत वगैरे गांवची शेती माझ्या मालकीची व माझ्या नावानें आहे. पूर्वी आपण सर्व एकेठिकाणीं होतों एकेठिकाणी असतांना व दुष्काळामुळें व दुष्काळाच्या पूर्वींचे एकंदर कर्ज देणें आहे. कर्जाच्या धाकानें व सर्व कर्जांचा बोजा माझ्या एकट्यावर पडावा या इराद्यानें वेगळे झाले व वेगळे होण्यापूर्वी मजला सांगितलें आपणास शेती वाटून द्यावी आणी हिश्या प्रमाणे कर्ज ही देतों परंतु तसें कांहींच केलें नाहीं सावकार लोकांचा माझ्यावर फार तगादा आहे. याजकरितां तुह्मास नोटिसीनें कळवितों कीं तुह्मी सर्व माझ्याकडे येऊन एक विचारानें सावकाराचे कर्जाचा बंदोबस्त करावा तसें न केल्यानें सर्व शेती माझ्या नावानें असून माझ्याच कमाईची आहे. कर्ज न देता विनाकारण हिस्से तुह्मी मागतां याजकरितां नोटीस पावल्या पासून आठ दिवसाचें आंत कर्जाचा बंदोबस्त करण्यास माझ्याकडे येऊन बंदोबस्त करावा. तसें न केल्यास शिवनारायण चुनीलाल राहणार ईराहित यांचे पाशी शेती गाहाण आहे तो ह्मणतो कीं मी सर्व कर्ज देतों परंतु खरेदी मागतो. तुह्मी आठ दिवसाचें आंत तजवीज न केल्यास मी त्यास सर्व शेती खरेदी करून देईन मग तुमची तकरार राहणार नाहीं. कळावें ता. २९।५।०३ इ०

सही
सहीची निशाणी भगवान वा
योगाजी याचे हातची.

### नोटीस

बेशमी रा. रा. इंद्रसिंग वल्लद पर्वतसिंग देशमुख राहणार मौजे हिंगणें कारेगांव परगणे बाळापूर तालुका खामगांव जिल्हा आकोला. यांस.

खाली सही करणार हरी वल्लद पांडो रोहणकार राहणार हिंगणे कारेगांव तालुका खामगांव याजकडून नोटिशीनें कळविण्यांत येतें कीं गेल्या दुष्काळांत ह्मणजे सन १८९९ सालीं मौजे मजकूर येथील माझी शेतें चार व घावें एक मिळून स्थावर मालाचे तुम्हाला खरेदीखत लिहून नोंदून दिलें. ही खरेदी दुष्काळांतील इतर खरेद्यां प्रमाणें गहाणाच्या स्वरूपाची होती आणि उदर निर्वाहाच्या अडचणीसाठीं ही खरेदी लिहिली आणि ह्मणूनच तीन हजार रुपयांचा माल दोनशे रुपयांस खरेदी दिला व त्या दुष्काळाच्या सालाबद्दल तीन वर्षांचें पेकळ पट्टेखतही लिहून दिलें खरेदी लिहिली तेव्हांच आपण कबूल केलें कीं व्याजा सुद्धां दोनशे रुपये आणून चुकते द्यावे. ह्मणजे मी उलट खरेदी सदहू स्थावरची करून देईन. असें बोलणें झालें आणि नंतर मी तुम्हांस १२ फेब्रुवारी १९०३ रोजीं खरेदीच्या कर्जाबद्दल रुपये २०० व त्यांचे व्याज रुपये १७५ असे ३७५ रुपये गांवांत साक्षीदारा समक्ष दिले व तुम्ही व माझा सख्खा भाऊ दानाजी वल्लद यादव रोहणकार असे उभयतां खामगांवी जाऊन वरील स्थावर मालाची उलट खरेदी द्याना

ज्यांच्या नांवें राजश्री देवराव अर्जनवीस यांच्या हातून तुह्मी लिहिण्याला लाविली. अर्धवट खरेदी लिहिली तितक्यांत तुमचा नतव्या गांवाकडून आला आणि त्यानें तुह्मांस थोडेसें बाजूला नेलें. तुह्मी लागलीच विचारांत पडला आणि दानाजी खरेदी पुरी करण्यास हाक मारूं लागला तेव्हां तुह्मी मुकाट्यानें चालते झाला.

तुह्मी थोर कुलीन आहां तेव्हां कांहीं लबाडी होईल असें वाटत नाहीं. रुपये तुमच्या घरीं पोचलेच आहेत. आणि गहाणाच्या स्वरूपाची खरेदी असल्यामुळें सदहू स्थावर माल माझ्या ताब्यांतच आहे. तुह्मा जवळील दोनशे रुपयाची खरिदी रद्द आहे. तुह्मी लिहूं घातलेलें खरिदीखत पुरें करावें ह्मणून पुष्कळ वेळां झालें पण तुह्मी आज उद्यांची सबब पुढें करून मला चाळवीत आहां ही नोटीस पोचल्या तारखे पासून ८ दिवसाचे आंत उलट खरेदीखत पुरें करून नोंदून आणून द्यावें. असें करण्यास चुकाल तर तुह्मावर कोर्टांत फिर्याद करून योग्य ती दाद मिळविली जाईल आणि नोटिशीच्या खर्चा सुद्धां सर्व नुकसानी तुमच्या शिरावर राहील. कळावें. तारीख २९ मे १९०३ इ०

सही,
हरी यादोजी रोहणकार वस्ती
मौजे हिंगणे कारेगांव
दस्तुर खुद.

---

वऱ्हाडसमाचार

---

मिति जेष्ठ शुद्ध ६ शके १८२५

---

## व्यक्तिस्वातंत्र्य.

हल्लींचा काळ व्यक्तिस्वातंत्र्याचा आहे. ज्याचा सो मुखत्यार आहे, आणि आपण करूं तें आपण होऊं असा प्रयत्नवाद आपणांस पदोपदीं पुढें ढकलीत आहे. ही गती सांप्रतच्या उत्क्रांतीची आहे आणि काल चक्रापुढें जो बलवान असेल तोच विद्यमान राहील. इत्यादि विचार आजकालच्या प्रगतीचीं मुख्य आधारभूत तत्वें आहेत. पण या विचारांनीं आपणामधील एकोपा मोडला आहे. पूर्वींची भूतदया नष्ट झाली आहे. जो तो ऐश्वर्याचा पाठलाग करीत धांवत चालला आहे. पण धनदौलत ही सुखें नसून सुखाचीं साधनें आहेत हें आपण विसरत चाललों आहों. साधनांचें महत्व फार वाढलें आणि साध्य वस्तु जी सुख तिला पराङ्मुख होऊन आपण सुखसाधनें संपादतांना अवघा जन्माचा जन्म दुःखांत व कष्टांत घालवितो. श्रीमंती सुखासाठीं पाहिजे खरी पण श्रीमंतीसाठीं आपण सर्व सुखाला तिलांजली दिली आहे. ऐहिक संपदा आपल्या कार्याची मुख्य गुरुकिल्ली होऊन बसली आहे. अशी स्थिती होण्याला मुख्य कारण सांप्रतचा विचारक्रम होय. विचार हा आपल्या उद्योगाची प्रवर्तक शक्ति होय आणि ती चुकला असल्यामुळें आपली उद्योगमाला देखील चुकली आहे. प्रस्तुतची बलवत्तर धनतृष्णा, जीवन कलहांतील आरत्या तत्संबंधीं निराशा आणि निराशेपुढें कुंठित गती हीं आमची पारध करीत आहेत.

व्यक्तिस्वातंत्र्यामुळें आपणांस वाटतें कीं आपली आपण आयुष्याची इमारत बांधली पाहिजे. प्रयत्नवादी सांगतात कीं तूं जें करशील तें होईल. अर्थशास्त्र पदोपदीं सांगतें कीं संपदा ही जगाची अमर शक्ती आहे आणि या सर्वंकष शक्तीमुळें सर्व पृथ्वी आपलीशी होईल. हे विचार मनांत प्रचलित झाले ह्मणजे जी स्फूर्ती येते ती मीपणाला प्रसवते. हल्लींचा उद्योग असा आहे कीं, मीच पुढें पाहिजे, माझेंच प्रथम अवाहन पाहिजे व माझीच सर्वत्र पूजा पाहिजे. या तत्वाचा परिणाम असा झाला आहे कीं सर्व जग ह्मणजे माझी ऐश्वर्यभूमी होय. स्वार्थ साधत नाहीं तर सर्व जग व्यर्थ होय. किंबहुना, मला सर्व जगाची फिकीर ह्मणजे माझ्या स्वार्थासाठीं होय. सारांश, आपण डुबलो तर दुनिया डुबली आणि आपण तरलों तरच दुनिया धन्य होय. अशा सारख्या कल्पना व्यक्तिस्वातंत्र्याच्या बुडाशीं असतात. आणि त्याचमुळें सर्व मी मी ह्मणणारे प्राणी जगाला स्वसुखासाठीं कवटाळीत असतात.

व्यक्तिस्वातंत्र्य खरोखर फार उत्कृष्ट आहे; पण त्याचा उत्कृष्टपणा त्याच्या मीपणाला न ओळखल्यामुळें नष्ट झाला आहे. आपला मीपणा ऐहिक सुखापलिकडे जात नाहीं. ह्मणजे त्यांचा परिघ आपल्या इंद्रियांच्या भोगविषयापुढें नाहीं. मला घोडा पाहिजे, गाडी पाहिजे, सुग्रास भोजन पाहिजे. शरीराला सुंदरता आणणारे हेमादि अलंकार पाहिजेत, सौख्य देण्याला मला माता पितर पाहिजेत, माझ्या आरामासाठीं दास पाहिजेत, माझ्या सुखासाठीं मला बंधुवर्गाचे, इष्टमित्रांचें, व सेवकगणाचें साहचर्य पाहिजे. या ऐहिक सुखाच्या वस्तुसमुच्चया पलिकडे आपली दृष्टी वळत नाहीं, आणि ह्मणूनच आपला मीपणा आपणास आडमार्गांत नेत आहे.

अधिभौतिक संपदा आपला योगक्षेम सुखानें जाण्यासाठीं पाहिजे आहे पण ही संपदा ह्मणजे आपल्या आयुष्याचें इतिसर्वस्व मात्र नाहीं आहे हें आपण विसरतों, किंबहुना आपणास इतर संपदा अगदीं नकोशा झाल्या आहेत. ऐहिक संपदा उपभोगानें नष्ट होते. ही संपदा एका जवळ आहे ती दुसऱ्या जवळ असूं शकत नाहीं. भोगानें क्षय पावणारी व परिच्छेदानें एकगत असणारी अशी ही संपदा स्वकीय उन्नती स्वार्थपरायणते पलिकडे जाऊं देणार नाहीं हें स्पष्टच आहे.

पण ऐहिक संपदे विषयीं आह्मी तिरस्कार दाखवितों असें मात्र कोणी समजूं नये. ऐहिक संपदा या उच्चतर व श्रेष्ठतर संपदा मिळविण्याचा सोपान मार्ग आहे. पण तिचा उपयोग सोपानाहून अधीक होतां कामा नये. आपण उंच मजल्यावर जाणार आहों पण शिडीच्या पायरीवरच जर आपण रममाण झालों, व सभोंवतालच्या रम्य देखाव्यानें भुलून तेथेंच उभे राहिलों तर आपण उच्च शैलशिखरावर जाणार नाहीं इतकेंच नाहीं तर सोपानावर स्वस्थ उभें राहून आपण धाडकन खालीं पडण्याची मोठी भिती आहे. ऐहिक संपदा अशा साठीं पाहिजेत कीं आपला योगक्षेम सुखानें चालावा ह्मणजे आधिभौतिक काळजी दूर होतील; आपणांला चैनी नकोत पण पुरेशीं सुखसाधनें पाहिजेत; सौंदर्य व रमणीयता आपणांस पाहिजे पण व्यर्थ डामडौल व बडेजाव नको; संपदा असली ह्मणजे आह्मांस इतर मोल्यवान संपदा मिळविण्याला फुरसत मिळेल आणि विनाकारण देहास झिजविणारें द्रव्यार्जन करावें लागणार नाहीं. आह्मा मधील परम शांतीमय ब्रह्माची ओळख करून घेण्याला आह्माला विपुल धनदौलतीमुळें वेळ मिळावा आणि आमच्या पशुवृत्तींला सैरावैरा फिरण्यास सांपडूं नये.

ऐहिक संपदेहून उत्तम अशा अन्यसंपदा पुष्कळ आहेत. विद्याधन दिल्यानें वृद्धिंगत होतें आणि उपभोगाच्या अभ्यासानें क्षय न पावतां त्याची अभिवृद्धीच होते. विद्याधनाची वाटणी मागण्यासाठीं सर्व जग आपणापुढें उभें राहिलें तरी त्याची वाटणी करितां करितां आपला मूळचा विद्येचा झरा मोठाच वाढेल, आपलें विद्याजल जोरानें वाहूं लागेल आणि अनंत अशा विद्येच्या प्रवाहांत आपण आनंदानें पोहूं लागूं. ब्रह्मसुख विद्याधनाचा अंतिम भाग आहे. या ब्रह्माच्या खाणाखुणा पटल्या ह्मणजे आपल्या मीपणाची कक्षा मोठी विस्तृत होते. जो आपमतलबी व संकुचित दृष्टीचा असतो त्याचा मी ह्मणजे तो स्वतां व त्याचे अगदीं नजिकचे आप्त या पलिकडे जात नाहीं. भूतदया अंगांत अधीक असली ह्मणजे तोच मी आपली सामान्य कक्षा सोडून आप्तमित्रादि विस्तृत पावणाऱ्या वर्गाला आळें घालतो, ज्याची दृष्टी ब्रह्मज्ञानानें विस्फारित होते त्याच्या मीमध्यें सर्व सृष्टीचा समष्टीन्यायानें समावेश होऊं लागतो. ज्याचा मी सर्व सृष्टीला संकलित करितों तो जवळ जवळ परमेश्वरा पत पोंचतो. सारांश, आह्मास असलें खरें व विस्तृत व्यक्तिस्वातंत्र्य पाहिजे आहे.

## उतारूंची नोंद

आकोल्यास जे उतारू रेल्वेमार्गानें येतात त्यांच्या नांवबारीची यादी दररोज होत असते. उतारू गाडीच्या खालीं उतरला कीं स्टेशनाच्या बाहेर जातांना टिकिट कलेक्टर उतारू जवळचें टिकिट गोळा करितो आणि त्या बरोबर लागलीच तेथें उभा असलेला डाक्टर उतारूंच्या नाडीला हस्तस्पर्श करितो. पुढें लागलीच पोलिसचा जवान जिन्यापाशीं उभा असतो तो प्रत्येक उतारूला मागील व्हराड्याच्या खोलींत आपलें नांव उतरून देण्याला सांगतो. तेथें लागलीच खोलींत पोलीस कारकुना सभोंवतीं उतारूंची गर्दी होते. जो तो आपली सुटका व्हावी ह्मणून दादा बाबा करून आपलें नांव अगोदर उतरावयाला लावण्याचा प्रयत्न करितो. कोणतीही गाडी आली कीं दीड दोन तास पर्यंत नांवें उतरण्याची गर्दी चालली असते. तो पोलिसचा कारकून पडला एक आणि तो आपल्या दोन हातांनीं जलदीं लिहिण्याची पराकाष्ठा करितो, परंतु उतारूंची गर्दी मोठी असल्या मुळें उतारूंचा पुष्कळ वेळ या भानगडींत व्यर्थ जातो आणि त्यांत बराचसा त्रासही सोसावा लागतो.

याप्रमाणें उतारूंची नोंद दररोज आकोल्याच्या स्टेशनावर होत असते. या नोंदीचा हेतु काय आहे हें आह्मांस बरोबर कळत नाहीं. पूर्वीं जेव्हां आकोल्यास प्लेगाचा रोग नव्हता तेव्हां प्लेगानें दूषित झालेल्या भागांतून येणाऱ्या उतारूंची नोंद मुद्दाम ठेवीत असत; आणि या नोंदीप्रमाणें दहा दिवस पर्यंत त्या उतारूंच्या हालचालीवर देखरेख रहात असे. असें करण्याचा उद्देश असा की या दहा दिवसांच्या तपासणींत जर कोणी प्लेगाच्या दोषिक ज्वरानें ज्वरित झाला तर लागलीच त्याला वेगळा काढण्यांत यावा आणि त्याचा इतर लोकांशीं संसर्ग होऊं देऊं नये. प्लेगाला प्रतिबंधक ह्मणून अशी योजना केली होती आणि आमच्या मतें अशा व्यवस्थेनें प्लेगाचा नवीन रोगी किंवा बाहेरून आलेला रोगी याचा दुसऱ्यास संसर्ग होत नसे. या व्यवस्थेच्या दृष्टीनेंच प्रथम रेल्वे स्टेशनावर उतारूंच्या नोंदीची तजवीज करण्यांत आली.

पण हल्लीं या नोंदीचा कांहीं उपयोग होत नाहीं असें आह्मांस वाटतें. प्लेगाचा रोग अगोदर आकोल्यांत शिरलाच आहे तेव्हां प्रतिबंधाचा उपाय ह्मणून ही नोंद कांहीं उपयोगी पडत नाहीं, त्या शिवाय या नोंदी प्रमाणें पुढें दहा दिवस उतारूंचा तपास होत नाहीं. तर या नोंदीचा कांहींच उपयोग नाहीं. १० दिवसांच्या तपासणीच्या सोयीसाठीं ह्मणून ही नोंद ठेवण्यांत येत असे. जर ही तपासणी बंद करण्यांत आली आहे तर उतारूंची नोंदही बंद करण्यांत यावयाला पाहिजे होती. ती नोंद अद्याप कां चालू आहे याचें आह्मास कारणच समजत नाहीं. ही नोंदीची व्यवस्था डाक्टर रेली साहेब यापुढें बंद करितील तर त्यांचे उतारूंवर उपकार होतील. नांवें लिहून देण्याचा सव्यापसव्य विनाकारण नको आहे असें आह्मांस वाटतें दर गाडीला स्टेशनावर या गोष्टीमुळें उतारूंची मोठी खोटी होते आणि फार त्रास होतो. तो बंद करण्याची वेळ पूर्वींच येऊन चुकली आहे. हें नोंदणीचें काम बंद ठेवण्यांत येईल तर स्टेशनावर ठेविलेला हा पोलिसाचा आमला लागणार नाहीं. खर्चाच्या दृष्टीनें व उतारूंच्या सोयीच्या दृष्टीनें आह्माला वाटतें कीं उतारूंची नोंद जितकी लवकर बंद होईल तितकें बरें होईल.

---

The Berar Samachar

MONDAY JUNE
1 1903

---

*CIVIL HOSPITALS & CHARITABLE DISPENSARIES IN BERAR*

The annual Returns on the Civil Hospitals and Charitable Dispensaries

in Berar for the year 1902 with an explanatory note thereon by Lieutenant Colonel Swaine have been just out. The explanatory note is very brief and one has to wade patiently through the several statements accompanying the note, to make oneself fairly acquainted with the state of the Dispensaries and Hospitals during the past year. The number of Charitable Dispensaries and Hospitals in the Province during the year was the same as that in the previous year viz 47. The total number of patients treated in the Dispensaries and Hospitals during the year, was 354142 out of whom 2,10,029 were Hindus and 1,31,903 were Mahomedans. Comparing these figures with the total population in the Province one cannot fail to notice that the Hindus have not yet got over their scruples about English Medicines. There was a pretty large decrease in the number of out—patients viz 10815, which is chiefly attributed by Lieutenant Colonel Swaine to the scare in the native population in the districts of Akola, Buldana and Basim, caused by the undertaking of plague measures in these districts. The chief medical authority in this province has thus indirectly sounded a condemnatory note on the plague measures of the Government, on this *one* ground—that they are not liked by the Public!

The Pentecostal Mission at Buldana has been doing good work in that district as 5190 patients in all were treated in the year under report, by that institution. It is said that people living within a radius of 30 miles resorted to this institution for medical treatment. We are glad to find that the philanthrophy of the mission is being so well appreciated by the native population in the District. Let us hope that the noble example of this institution in helping the poor and the afflicted will be followed by persons who have the means and ability to do so.

On looking at the work of the individual Dispensaries and Hospitals, in the province, one cannot help being struck with the contrast afforded by the Civil Hospitals of Akola and Amraoti. The figures of the respective Hospitals are given below:—

*Civil Hospital*

| | Akola | Amraoti |
|---|---|---|
| Total No. of persons treated | 3490 | 10273 |
| Average daily attendance | 26 | 84 |
| No. of operations performed | 99 | 355 |
| Amount spent on European Medicines | 637/15/3 | 699/5/0 |

The low average number of daily attendance at the Akola Civil Hospital is surpassed by only four dispensaries in the province—those at Chikalda, Dharni, Ralegaon and Ner. All other Dispensaries and Hospitals in the province have better figures to show. We fail to understand why the Akola Civil Hospital should cut such a poor figure, when it is manned by a staff with an experienced officer like Lieutenant Colonel Railly at the head, which is in no way inferior to that at the Amraoti Civil Hospital. The difference in the populations of the two places cannot well account for this; or is it because the climate of Amraoti is more favourable to illnesses & accidents than that of Akola! The figures quoted above reveal the fact; and we leave it to the proper authorities to find out the proper cause of this difference and to remedy the same in the best way possible. Similarly we were surprised to see that Rs. 637—15—3 were spent for the purchase of European medicines for the Akola Civil Hospital, while Rs. 699—5—0 only were spent at Amraoti when the number of patients treated at Amraoti was nearly three times that at Akola. Can it be that the climate of Akola requires pretty large doses of medicines for its unfortunate patients to get cured. But this theory falls to the ground when one casts a glance at the amount spent on medicines for the Akola Charitable Dispensary (Rs 348—15—2) with 14685 as its number of patients treated during the year.

The amount contributed by the District Boards and Municipalities for the maintenance of the Dispensaries in the province, is also an interesting feature of the Report. The District Boards and the Municipalities have in all contributed Rs. 18716—15—9 for maintaining the dispensaries, out of the total sum of Rs. 87385—14—6 spent for Hospitals and Dispensaries—which means that the Govt. has spent only 73.3 p. c. of the total expenditure. In order to arrive at a clear idea as to how much amount is contributed by the respective Municipalities and Boards for the purpose, we quote below the necessary figurus:—

*MUNICIPALITIES*

| *Akola District* | Rs. | as. | p. |
|---|---|---|---|
| Akola | 1320 | 4 | 9 |
| Khamgaon | 1308 | 1 | 2 |
| Akot | 608 | 8 | 3 |
| Shegaon | 546 | 2 | 2 |
| Total... | 3783 | 0 | 4 |
| *Amraoti District* | Rs. | as | p. |
| Amraoti | 1283 | 5 | 11 |
| Morsi | 214 | 12 | 0 |
| | 1498 | 1 | 11 |
| *Ellichpur District* | Rs. | as. | p. |
| Ellichpur Civil Hospital | 100 | 0 | 0 |
| Ellichpur city | 516 | 2 | 8 |
| | 616 | 2 | 8 |
| Total... | 5897 | 4 | 11 |

DISTRICT BOARDS

| | Rs. | as. | p. |
|---|---|---|---|
| Akola | 2840 | 0 | 10 |
| Basim | 782 | 5 | 5 |
| Buldana | 4933 | 14 | 5 |
| Amraoti | 1212 | 1 | 6 |
| Ellichpur | 1529 | 10 | 8 |
| Wun | 1521 | 10 | 0 |
| Total Rs... | 12819 | 10 | 10 |
| Grand Total Rs. | 18716 | 15 | 9 |

The Charitable Dispensary at Khamgaon has received contribution both from the Khamgaon Municipality as well as the District Board Akola, which is Rs. 1308—1—2 and Rs. 479—10—8 respectively. Among the Municipalities Akola and Khamgaon have contributed most of all while among the District Boards, the Buldana District Board heads the list. The relief of the afflicted by giving timely help in the form of medicines &c, is as much the work of the government as of the Local Bodies. It should not also be forgotten that the present Dispensaries in Berar have been of great help to the Government in the detection of murder and poison case But it has been the tendency of late to saddle a larger portion of the expenditure on the Local Bodies every year and it is therefore high time that all the Local Bodies in the province including those which have fortunately escaped the burden upto this time, should be up and determine in consultation with the Government as to what share of the expenditure on this count should fairly fall on the Provincial revenue.

---

Malkapur 29/5/03

A large and crowded meeting was held on Sunday the 24th. May under the auspices of Shri Kumar Harbhamji Raoji, the Deputy Commissioner Buldana District, to explain to the public the plague rules and to make them acquainted with the precautionary measures to be adopted before plague makes it appearance in the town and its surrounding villages. The assembly consisted of about five hundred men, townsmen as well as villagers. The arrangements made by the Tahsildar were excellent. The audience heard the eloquent, impressive and enthusiastic speech with eager attention and was much struck with wonder at the tone in which it was delivered. Shri Kumar Harbhamji Raoji asked the people to thoroughly disinfect their houses with "Oopalies" before plague breaks out and to evacuate them after its appearance. He said that persons coming from infected area should be segregated. He admitted the difficulties that came in the way of segregation but told the means to surmount them by building good huts for incoming relatives and by putting a few in trouble in stead of many. He advocated inoculation and lastly, he impressed upon the people the efficacy of desiccation and advised the people to provide themselves with desiccants wherever it was possible. During the time the speech was delivered, enthusiasm prevailed and the assembly appeared to be much impressed with the kind tone. The speech was delivered in Marathi, a language understood by all the assembled. After the close of the speech Khan Bahadur Kali Badiuddin thanked the eloquent speaker for the interest taken by him in the welfare of the people. And after the distribution of the Pan—Supari the meeting was dissolved.

---

## वऱ्हाडवृत्त.

हवामान--- या सप्तकाच्या प्रारंभीं मोठाच पाऊस पडला. एकंदर पाणी ३ इंचावर पडलें. हा पर्जन्यकाळचा पाऊस नसून आगंतुक होता व ह्मणूनच पुनः ऊन कडक पडूं लागलें आहे. वारा सोसाट्याचा सुटतो. रोगराई ह्मणण्या सारखी कोणतीच नाहीं. आणि सार्वजनिक आरोग्य चांगलें समाधानकारक आहे.

मि. आर. ए. सिम्पसन साहेब डिपुटी कमिशनर, उमरावती हे प्रकृती नादुरुस्त असल्या कारणानें सहा महिन्यांची रजा घेऊन विलायतेला रवाना झाले. त्यांच्या रजेंत मेजर मॉडर्वी साहेब असि. कमिशनर हे उमरावतीच्या डिपुटी कमिशनराचें काम पाहतील.

मि. सेफुद्दीनखान तहशिलदार इलिचपूर यांस एक्स्ट्रा असि. कमिशनर नेमून उमरावतीला बदलण्यांत आलें.

मि. शेख इस्मायल एक्स्ट्रा असि. कमिशनर हे मोठी रजा घेऊन मक्केला गेले होते. तिकडून ते सुरक्षितपणें परत आले असून त्यांची नेमणूक मोर्शी कोर्टावर झाली आहे.

मोर्शीहून रा. रा. बाळकृष्ण बळवंत सुळे एक्स्ट्रा असि. कमिशनर हे बडनेऱ्याच्या कोर्टावर परत येतील.

बडनेऱ्याहून मि. ओग्रेडी साहेब एक्स्ट्रा असि. कमि. यांची बदली आकोल्याच्या सिव्हिल जज्जाच्या जागीं होऊन रा० रा० विश्वनाथ नारायण दांडेकर एक्स्ट्रा असि० कमिशनर यांस मलकापूर कोर्टावर बदलण्यांत आलें. वरील चार नेमणुका झाल्या विषयीं गांवांत आफवा आहे.

श्रीमती कुमारी नागुबाई जोशी या कलकत्ता युनिव्हर्सिटीच्या प्रवेश परीक्षेंत पसार झाल्या हें कळविण्यास मोठा आल्हाद वाटतो. राजश्री मोरो विश्वनाथ जोशी यांनीं या आपल्या ज्येष्ठ कन्येला अविवाहित ठेवून चांगली विदुषी केली ही गोष्ट त्यांच्या मानसिक धैर्याची व सुधारणेच्या कळकळीची साक्ष देते. श्रीमती नागुबाई यांचें आह्मी पुनः अभिनंदन करितों. अशा या सद्गुणी कुमारीला ही विजयश्री ह्मणजे भावी मंगल सौख्यराशीचें प्रसादचिन्हच होय.

आकोल्याचे पोलिस सुपरिंटेंडंट मि० कूड हे उन्हाळ्या निमित्त रजेवर गेले असून त्या रजेंत उमरावतीचे असि पो० सुपरि० मि० हर्बर्ट यांस येथें पोलीस सुपरिंटेंडंट नेमण्यांत आलें.

---

## आकोला बाजारभाव

| | |
|---|---|
| हुंडी दर्शनी | १००८=॥ |
| सोनें २४।= | चांदी ६१ |
| ज्वारी ४५।५० | जवस १०५ |
| गहू | ८० ते १०० |
| बाजरी | ४० ४५ |
| मीठ | ३८=॥। रु. मण |
| चणे | ३॥= रु. मण |
| तूप | ७॥ ८ रु. मण |
| तेल | ९॥ रु. मण |
| रुई | ९०।९५ |

---


## जाहिरात

अकोला येथील फीमेल ट्रेनिंग क्लासच्या पहिल्या वर्षाच्या वर्गांत येऊं इच्छिणाऱ्या स्त्री उमेदवारांची परीक्षा घेण्याची तारीख २२ जून ( सकाळीं ८ वाजतां ) ठरविली आहे. ज्या कोणास या वर्गांत यावयाचें असेल त्यांनी हेड मिस्ट्रेस म्युनिसिपल गर्ल्स स्कूल अकोला यांस त्या दिवशीं समक्ष भेटावें. परीक्षा घेऊन योग्य ठरतील त्यांसच या वर्गांत घेतलें जाईल.

(Signed) C. H. Candy
Director of Public Instruction
30/5/30 Hyderabad Assigned District.


## वर्तमानसार

**नवीन यंत्र**—एका इटालियन शोधकानें खोल समुद्रांत प्रकाश पाडण्याचें एक यंत्र शोधून काढलें आहे. या यंत्रास खर्च फार थोडा लागत असून ह्याच्या योगानें समुद्रांत २९० फूट लांबी पर्यंत चकचकीत प्रकाश पडूं शकतो व तो आजूबाजूस ६६० फूट पर्यंत पसरतो असें आढळून आलें आहे. व अधिक उंच प्रतीचा मालमसाला वापरल्यास हा प्रकाश पाहिजे तितका लांब पोंचूं शकेल असें या शोधकाचें ह्मणणें आहे.

**अंतर्दृष्टीचे प्रयोग**— लंडनमध्यें एक अमेरिकन गृहस्थ आला असून त्यानें तेथें अंतर्दृष्टीचे बरेच प्रयोग करून दाखविले. घरापासून अमुक ठिकाणीं एकदां त्यास नेल्या नंतर परत येतांना रस्ते कितीही वांकडे असले तरी डोळे बांधून ठेवले असतांही त्याच रस्त्यानें गाडी हाकीत तो परत येतो, गाडी तो नेमक्या ठिकाणीं वळवितो, पुढें मनुष्य आल्यास घोडेही आवरून धरतो! डोळे बांधल्यावर त्याचे डोक्यासभोंवतीं तार गुंडाळलेली असून त्यांची टोकें गाडीत बसलेल्या इतर मंडळींनीं हातांत धरावीं एवढीच त्याची या प्रयोगांत अट आहे.

**विजेचें झाड**— मध्य हिंदुस्थानचे जंगलांत असें एक चमत्कारिक झाड सांपडलें आहे कीं ह्याचीं पानें फार लाजाळू असून त्यास हात लावतांच विजे प्रमाणें धक्का बसतो त्याजवळ लोहचुंबकाची काही नेली असतां तिजवरही ह्याचा परिणाम होतो, तो इतका कीं ती झाडापासून ७० फूट लांब असली तरी ती हालूं लागते. ह्या झाडा जवळ पक्षी किंवा किडे सुद्धां जात नाहींत.

## फळांचा औषधी उपयोग.

**ॲपल**— या फळाच्या सेवनानें उत्तम रक्तशुद्धि होते इतकेंच नसून ते अपांगावर उत्तम लागू पडतें व तसेंच कोणत्याही मादक पदार्थाच्या सेवनानें आलेली गुंगी हें फळ तावडतोब घालवितें. दारूच्या व्यसनांत गुरफटून गेलेल्या लोकांनीं या फळाचें सेवन दिवसांतून तीन वेळां केल्यास त्यांची दारू वरील इच्छा उडून जाते असा या फळाच्या अंगीं विलक्षण गुण आहे.

पाइन ॲपल—नांवाचें एक फळ आहे ह्याच्या सेवनानें घशांतील विकार नाहींसे होतात, या फळानें वरील विकाराचे कित्येक रोगी मृत्यूच्या तडाक्यांतून बचावले आहेत. याच्या योगानें घशांत चिकटून राहणारा कफ फारच त्वरित सुटून मनुष्य मोकळा होतो.

अक्रोड—संधिवात, गुडघी वगैरे रोगावर अक्रोडांचा विलक्षण उपयोग होतो. अत्यंत जुनाट संधिवात असला तरी अक्रोडाच्या सेवनानें त्यापासून होणारें दुःख हळूहळू कमी होत जातें.

लिंबू—लिंबासारखें गुणकारी फळ दुसरें मिळावयाचे नाहीं. या फळाच्या अंगीं क्विनाईनचा गुण असल्यानें ताप आलेल्या मनुष्यास रात्रीं निजते वेळीं पेलाभर ऊन पाण्यांत एक लिंबू पिळून तें मिश्रण प्यावयास दिलें असतां दुसऱ्या दिवशीं सकाळीं दरदरून घाम येऊन रोगी तापापासून मुक्त होतो.

**अनुभव**—केळीच्या सोपटांतील तंतूपासून कापड विणतां येईल कीं नाहीं हें पाहण्यासाठीं त्रावणकोर दरबारनें २९ प्रकारच्या सोपटांवर प्रयोग करून पाहिले. त्यावरून असें आढळून आलें कीं, सुमोर १२ प्रकारच्या केळीपासून इतके बारीक तंतू निघतात कीं त्यापासून टिकाऊ व रेशमा प्रमाणें कापड तयार करितां येतें. बाकीच्या प्रकारांपासून जाडें भरडें कापड व दोर करितां येतात.

**डाक्टरची पेटी**—पारीस शहरांतील सर्व मुख्य मुख्य रस्त्यांतून लवकरच 'प्रत्येकाचा डाक्टर' या नांवाच्या पेट्या उभारावयाच्या आहेत. या पेट्यांस बाहेरून कपाळ दुःखी दात दुखी, मंदी वगैरे सामान्य १० रोगांचीं नांवें घातलेलीं आहेत, व त्या प्रत्येक नांवाचे खालीं पेटीस एकेक फट ठेवली आहे. ज्याला जो रोग असेल त्यानें त्या फटींत १ पेनी (१ आणा) टाकला कीं, पेटींतून आपोआप त्या रोगावरील औषधाची एक पुडी व अनुपानपत्र बाहेर यावयाचें, अशी त्या पेटींत यांत्रिक योजना केली आहे.

**ठेंगू मनुष्यें**— सुब्रह्मण्य मुनिस्वामी व परिमळ नायडू या नांवांचीं दोन ठेंगू मनुष्यें मद्रासेहून न्यू यार्क येथें ता. १८ एप्रिल रोजीं पोंचलीं. थोरल्याचें वय ३८ असून त्याची उंची फक्त २८ इंच आहे.

**नापसंतीचा कळस**— पुण्यास चंद्रचूड घराण्यांतील एका तरुणानें पत्नीच्या नापसंतीमुळें अफू खाऊन जीव दिला. लग्न समयींच त्यानें वधू बद्दल नापसंती दर्शविली होती परंतु ती पूर्ण करून दाखविण्याचा प्रसंग त्यानें फलशोभनाचें दिवशीं आणला! बिचारा हतभागी खरा! जीव देण्यापेक्षां दुसरा पसंती विवाह करण्यास त्यास कशी बुद्धी सुचली नाहीं; अविचारानें त्यानें आपलाच घात कां केला कोण जाणे!

**सूर्यावर डाग**— सूर्याच्या पृष्ठभागीं भयंकर जोराची खळबळ चालली आहे व एक नवीनच विस्तृत डाग दिसूं लागला आहे असें ह्मणतात. यामुळें आतां पाऊस चांगला पडेल असेंही भाकीत करण्यांत आलें आहे.

**लग्नाबद्दल कायदा**— आरजेंटिनामध्यें पुरुषांच्या लग्नासंबंधानें असा कायदा केला आहे कीं प्रत्येक मनुष्य २० वर्षांचा झाला ह्मणजे तो लग्न करण्यास लायक ठरतो. त्या नंतर त्यानें तीस वर्षांपर्यंत लग्न न केल्यास प्रत्येक महिन्यास पांच डॉलर प्रमाणें लग्न होईपर्यंत दंड दिला पाहिजे. या प्रमाणें दंड भरून तो तीस वर्षांपर्यंत तसाच लग्न झाल्याशिवाय राहिल्यास पुढें दरमहा १ डॉलर प्रमाणें दंड ३५ वर्षांपर्यंत दिला पाहिजे. त्यापुढें तसाच राहिल्यास पन्नास वर्षेपर्यंत दरमहा २० डालराप्रमाणें दंड भरावा लागतो. पुढेंही लग्न झालें नाहीं तर ७० वर्षांपर्यंत ३० डालरप्रमाणें दंड दिला पाहिजे. इतक्या नंतरही लग्न झाल्याशिवाय तो राहिल्यास ८० वर्षांपर्यंत दरमहा २० डॉलराप्रमाणें दंड घेण्यांत येतो. तोंपर्यंत लग्न न झाल्यास पुढें दंडातून मुक्त होतो एखाद्यानें लग्न केलें आणि दुर्दैवानें तो विधूर झाला तर त्यानें तीन वर्षांच्या आंत दुसरें लग्न केलें पाहिजे या मुदतींत त्यानें लग्न न केल्यास तो दंडास पात्र होतो. यांत दुसरी एक अट अशी ठेवली आहे कीं, नर एखाद्या स्त्रीशीं कोणी लग्न जुळवीत असतां तिजकडून नकार मिळाला व तसें वर्षांतून तीन वेळां घडून आलें व तसें झाल्याचें खात्रीलायक त्यानें शाबीत केलें तर तो दंडास पात्र नाहीं. आतां स्त्रीनें पुरुषास नाकबूल कां केलें याची शाबिती करणें पुरुषास मात्र जरा विचाराचें आहे. कांहीं तरी कमीपणा दुर्गुण वगैरे एखादी खोड असल्याशिवाय स्त्री पुरुषास कधीं नाकबूल करणार नाहीं. अशाच प्रकारचा स्त्रियांविषयींही कांहीं तरी निर्बंध असला पाहिजे. या देशांत प्रजा फार कमी असावी असें दिसतें. ती वाढविण्यासाठीं अशा प्रकारचा कायदा केला असावा.

**केंस स्वच्छ व मजबूत होण्यास उपायः**— २॥ तोळे नवसागर, व १। तोळा कापूर घेऊन त्यांची अगदीं बारीक पूड करावी. सुमारें अच्छेर कढकढीत पाण्यांत ती घालून चांगली विद्रुत होऊं द्यावी. निवाल्यावर त्या मिश्रणाचा उपयोग करावा. त्यानें वरचेवर केंस धोळून ओले करावेत. यापासून केंस स्वच्छ व मजबूत होतात, एवढेंच नव्हे, पण तुकतुकीत व सुंदर होतात. त्यांचा रंग बदलत नाहीं व केंस लोकर जात नाहींत, त्यामुळें टक्कल पडत नाहीं. कापराचा कांहीं भाग खालीं बसतो, तथापि जरूरी पुरता अंश उदकाशी मिसळतो.

**कोंबड्याच्या नांवानें मृत्युपत्र**—नुकतीच एक युरोपियन लेडी मरण पावली. तिचा पुनर्जन्मावर विश्वास असे. तिजजवळ एक देखणा कोंबडा होता. आपल्या मृतपतीच्या आत्म्यानें त्या कोंबड्याच्या पोटांत प्रवेश केला असा तिचा पक्का ग्रह झाला. तिनें त्या कोंबड्या करितां मुद्दाम एक चांगली जागा तयार केली व आपल्या सर्व चाकर माणसास असा हुकूम केला कीं सर्वांनीं त्याला आपला धनीच समजून वागावें त्या कोंबड्याचें नांव तिनें निर्दय असें ठेविलें जर एखादी कोंबडी त्या कोंबड्या जवळ आली तर त्या लेडीनें जाऊन तत्काळ त्या कोंबडीस ठार करावें. मरतांना तिनें मृत्युपत्र करून ठेविलें. तिच्या वारसांनीं मोठ्या आशेनें मृत्युपत्र उघडलें तों सर्व मालमत्तेचा धनी तो कोंबडा असें त्यांना कळलें तेव्हां त्यांनीं त्या कोंबड्यावर फिर्याद वगैरे करण्याच्या भरीस न पडतां त्याची हळूच मान मुरगळून त्याला आपल्या पोटांत जागा दिली व सर्व मालमत्ता आपण दाबली.

**रक्षक पतंग**—फ्रान्सांत एका कल्पक मनुष्यानें एक पतंग असा तयार केला आहे कीं तुफानात एखादें गलबत सांपडून जेव्हां फुटतें तेव्हां त्यांतील उतारूंचे प्राण त्यानें वाचविता यावेत. या पतंगाच्या साहाय्यानें मनुष्य समुद्रांतून दीड हजार यार्डावरून किनाऱ्यास येतो.

**हुषार मलगी**—लंडनमध्यें एक मुलगी आपल्या स्वतःच्या बुद्धिसामर्थ्यानें लोकांचे अर्ज, पत्रें वगैरे लिहून ते टाइप रायटर यंत्रावर छापून देते व या प्रमाणें काम करून ती दररोज ६० पासून ७१ रुपये मिळविते. आपल्या इकडे सबंद दिवस खर्डेवाशी करणाऱ्या पुरुषांना रोज चार आणे सुद्धां मिळण्याची मारामार पडते!

**चाल**— जपानमध्यें वनभोजन वगैरेच्या प्रसंगीं अशी एक चाल आहे कीं, भोजनास आलेल्या मंडळीस जे कोरडे पदार्थ खावयाचे नसतील ते त्यांनीं आपल्या खिशांत घालून घरीं न्यावेत.

**भयंकर आग**— चीन मधील कॅंटन येथें आरसेनल फॅक्टरीस आग लागून तींत १५००० मनुष्यें जळून मेलीं.

**वाघाची कुस्ती**— बागमाडले येथें एका मेंढक्यानें वाघाचे अंगावर जाऊन त्याच्याशीं बराच वेळ कुस्ती करून त्यास चीत केलें. नंतर लोकांनीं त्याच्या मदतीस येऊन वाघास ठार मारलें. वाघाबरोबर झोंबी खेळणारे हल्लींच्या काळांत क्वचितच सांपडतील.

**विलक्षण झाड**— दक्षिण अमेरिकेंत एक विलक्षण झाड दृष्टोत्पत्तीस आलें आहे. त्यापासून उंसापेक्षां वीसपट अधीक साखर तयार होऊं शकते.

**पावसाचें यंत्र**— पारीस येथें उन्हाळ्याच्या दिवसांत रस्त्यावरील धूळ बसविण्याकरितां व हवेंत गारवा आणण्याकरितां मि० बेरिकच नांवाचे एक म्युनिसिपल इंजिनीयर विजेच्या सहाय्यानें कृत्रिम पर्जन्यवृष्टि करण्याचें यंत्र तयार करीत आहेत. या यंत्रास ७२० पौंड खर्च लागेल असा अंदाज आहे, या यंत्राची गती ताशीं सातपासून दहा मैल असल्यानें दर तासांत सात पासून दहा मैलांपर्यंत रस्त्यावर पाण्याचा शिडकाव करितां येईल. या यंत्राचा प्रयोग आगष्ट महिन्यांत करून पहाणार आहेत. फायदेशीर दिसल्यास दुसरीं यंत्रें तयार करण्यांत येणार आहेत.

---

## NOTICE

—:o*o:—

All persons are, hereby, informed that if they do not attend in person or by Agent all copies will be sent to them by Value Payable post, provided that they give their full and correct address in the application for copy. Dated 11th. May 1903. District Wun.

(Sd.) NIZAMUDDIN
Deputy Commissioner
Yeotmal.

---

## नोटीस.

सर्वत्र लोकांस या नोटिशीनें कळविण्यांत येतें कीं, जे कोणी स्वतः अगर मुखत्यार मार्फत हजर होणार नाहींत त्यांच्या नकला त्यांनां व्ही. पी. नें पाठविल्या जातील. मात्र अर्जदारानें नकले करितां दिलेल्या अर्जांत आपला पूर्ण आणि बरोबर पत्ता दिला पाहिजे. ता. ११।५।०३ इ. जिल्हा वणी

सही
निजामुद्दीन
डेप्युटी कमिशनर
यवतमाळ जि. वणी.

REGISTERED N. No.

बाहेरगांवीं टपालहाशिलांसह........ २ ६
वर्गणी आगाऊन दिली पाहिजे.
किरकोळ अंक.............................॥२

नोटिशी बद्दल
१० ओळीचे आंत रु० १
दर ओळीस.........॥१ ॥१
दुसरे खेपेस.... .... ....॥१

Mofussil ... ... ... 3 ( with postage
All Subscriptions to be paid in advance.
Single copy ........................ 2 as

Advertisement
below 10 lines ...... 2 Rs
Per line over 10 ......8 as
Repetition Per line ....2 as

# वऱ्हाडसमाचार.

# THE BERAR SAMACHAR

VOL XXXVII AKOLA MONDAY 8 JUNE 1903 NO 22

वर्ष ३७ आकोला सोमवार तारीख ८ माहे जून सन १९०३ इ० अंक २२

## नोटीस.

बेशमी राजश्री बाबन वल्लद तुकाराम ताले राहणार शहापूर तालुका खामगांव यांसः

खाली सही करणार इजकडून नोटीस देण्यांत येतें कीं मी तुमची लग्नाची बायको असून मी संसार करण्या इतकी शहाणी झाली आहे. तुम्ही गेल्या खरपाडीच्या आधीं मला माहेरीं म्हणजे माझ्या चुलत भावाच्या घरीं आणून घातलें. माझा भाऊ यशवंत वल्लद सूर्यभान यानें पुष्कळ वेळा तुमची विनवणी केली व मला घरीं घेऊन जाण्या-विषयीं आग्रह केला. पुष्कळदा चार पंच लोक मध्यस्ती घातले व मी पुन्हां घरीं घेऊन राहूं लागले तर तुम्ही मला मारहाण करून घालवून दिलें. तुम्हाला चार पंचाची देखील भीड पडली नाहीं. तुम्ही मला सोडून दुसरी सवतही केली. या वरून माझी खात्री होते कीं तुम्हाला मला वागविणें नाहीं. मी तुम्हाला नको आहे. मी तुमच्या घरीं नांदून संसार करण्याला तयार आहे. माझी चांगली कुळी मी बुडवूं इच्छित नाहीं. तुम्ही मला जनरिती प्रमाणें वागवावें. तसें तुम्ही न करा-ल तर माझा जन्म व्यर्थ चालला आहे. तुम्ही माझ्या पोटापाण्याची सोय करावी म्हणून अनेक वेळा म्हणून पाहिलें. परंतु तुम्ही मला वागवीत नाहीं व मला पोटापाण्याठाहि देत नाहीं. तुमच्या नांवावर कर्ज काढून इतकीं वर्षे कशी तरी लोटलीं पण या पुढें कर्जही कोणी देत नाहीं व मलाहि असें निराश्रित रहावयाचें नाहीं. तुम्ही सावकारी कर्ज देऊन मला घेऊन जा किंवा नवरेपणाचा हक्क सोडून मला कायमची फारकत देऊन टाका. असें करण्याला मी एक पंधरवा-ड्याची मुदत देते. इतक्या काळांत तुम्ही काहींच निकाल करणार नाहीं तर तुमचें गैर वर्तन हींच तोंडी फारकत समजून दुसरा घरठाव करीन; आणि असा घरठाव करी पर्यंत कोर्टांत तुम्हावर अन्नवस्त्राची फिर्याद करून नोटिशीच्या खर्चासुद्धां सर्व रक्कम वसूल करून घेईन. तुम्ही आपल्या कुळाला शोभेल असा योग्य तो निकाल करावा. कळावें. तारीख १ जून १९०३ इसवी.

सही

गिरजाई मर्द बाबन ताले राहणार
हल्लीं वाडेगांव तर्फे चुलतभाऊ
यशवंत सूर्यभान पाटील सरप
राहणार वाडेगाव दस्तुर खुद्द.

---

## नोटीस.

रा० रा० दवलतराव वल्लद तुळजाजी देशमुख राहणार मौजे उमरे तालुका बाळापूर पोस्ट आलेगांव यांस.

खाली सही करणार याजकडून कळवि-ण्यांत येतें कीं आम्ही तुमचें कर्ज १००० एक हजार रुपये घेऊन त्याच्या मोबदल्यांत तुम्हाला आठ शेतें म्हणजे मौजे सावरगांव येथील सर्व्हे नंबर ६१, १४३, १७८, १८० पैकीं, १२९, २३१ पैकीं, २७३ व १६७ यांचे खरेदीखत करून नोंदून दिलें. पण त्या खरिदीच्या वेळीं तुम्ही करार केला होता कीं व्याजा सुद्धा मुद्दल रुपये चुकते केल्यास आठ शेतांची खरिदी परत करून देईन. सदर्हू आठ शेतांची किंमत कितीतरी पटीनें अधीक आहे. या खरेदीखतावरील गहाण कर्जाची फेड माझ्यानें होईना म्हणून पंच मार्फत तारीख २८।७।०२ रोजीं सर्व कर्जाचा निकाल केला तो येणें प्रमाणें:—

( १ ) आठ शेता पैकीं १६७ सर्व्हे नंबर ( पांढरीचा ) खेरीज करून बाकी-च्या सात शेतांची संपूर्ण मालकी सदर्हू रकमेच्या मोबदल्यांत तुम्हाकडे देण्यांत यावी.

( २ ) त्या सातही शेतांचीं खातीं बद-लून तुमच्या नांवानें मी करून द्यावीं.

( ३ ) सर्व्हे नंबर १६७ पांढरीचा हा माझा मी परत घ्यावा पण फक्त त्या सालचें म्हणजे १३१२ फसलीचें पीक मात्र तुम्ही घ्यावें व त्या सालाचा वायदा मी भरावा. येणें प्रमाणें तुमचा निकाल संपूर्ण पंच मार्फतीनें तुम्ही करून घेतला. मी राजीनामा दिला व खात्याचा वर्ग तुमच्या नांवानें करण्यांत आला. १३१२ फसलीचें पीक तुम्ही घेतल्या नंतर उन्हाळ्यांत मी शेत वाहूं लागणार होतो इतक्यांत तुम्ही १३१३ फसली साठीं तेंच शेत दांडगाईनें दत्तु वल्लद अवधूत अहीर जिरेमाळी यांस बटाईनें वहितीला दिलें आणि आतां तुम्ही बेमानी-च्या गोष्टी सांगूं लागला. व म्हणतां कीं हें शेत मी देवाल नाहीं. ही नोटीस पोचल्या तारखे पासून आठ दिवसांच्या आंत सदर्हू पांढरीचा नंबर माझ्या स्वाधीन करून द्या-वा आणि तसें करण्यास चुकाल तर तुम्हा-वर लबाडीनें फसविल्या बद्दल फोजदारी करून दिवाणींतून सर्व नुकसानी सुद्धां व चालूं पीका सुद्धां शेताचा ताबा परत घेण्यांत येईल. कळावें. तारीख १ जून १९०३ इ०

सही

विठोबा सटवाजी पाटील
राहणार सावरगांव
दस्तुर खुद्द.

---

## नोटीस.

रा. रा. गणू मोहाळ पाटील राहणार नेर धामण ता० आकोट. यांस.

खाली सही करणार याजकडून नोटीस देण्यांत येते कीं तुम्हास आम्ही सुमारे ४ चार वर्षें झाली मुकत्यारपत्र दिले होतें. तें आमच्या मना विरुद्ध, तुम्ही वर्तन करिता सबब आज पासून रद्द केलें आहे. आमच्या नांवावर कोणा पासून कर्ज वगैरे किंवा देवघेवीचा संबंध करूं नये, केल्यास तो रद्द समजला जाऊन तुमचेवर त्याची जबाबदारी राहील. मी किंवा माझी इस्टेट जबाबदार होणार नाहीं. कळावे ता. ४।६।०३ इसवी.

सही.

सूर्यभान वल्लद सोनाजी कुणबी
राहणार लांबकानी पेठ
मुंडगांव तालुके आकोट
दस्तुर खुद्द.

---

## जाहिरात

या नोटिसीने मी सर्वांस जाहीर करितो कीं रा. रा. लखमीचंद लालचंद, रामचंद्र गणेश कानिटकर, गोविंदसा व्यंकटसा व नारायण बळवंत हे माझे मुखत्यार होतें. पैकीं नारायण बळवंत वारल्यामुळें व बा-कीच्या तिघांनीं माझी नवकरी सोडल्यामुळें मी सर्वांची मुखत्यार पत्रें रद्द केलीं आहेत. तरी माझे संबंधानें यांच्यासी कोणी व्यव-हार करूं नये केल्यास मी त्याबद्दल जबा-बदार नाहीं. कळावे तारीख १ माहे जून सन १९०३ इसवी.

सही.

हरकचंद गुलाबचंद गुजराथी
दुकान तेल्हारे
तालुके आकोट.

---

## नोटीस.

बेशमी श्रावण वल्लद हरसिंग झाले साहू राहणार मोजरी [ सादलापूर बुजरुक ] ता. आकोला, पोस्ट पिंजर. यासः–

मी खालीं सही करणार असें कळवितो कीं सुमारें दोन वर्षां पूर्वीं मी तुमचे पासून कर्जाऊ ६० रुपये काढले व त्याचा कागद करून दिला. पुढें ७-८ दिवसांतच तुमच्या घरीं लग्न झालें त्यावेळीं मी आपल्या जवळचे ३० रुपये खर्चून तुम्हांस तूप पाठविले होतें. आतां तीन महिन्या खालीं तुमच्या रुपयांचा पूर्ण हिशोब केला तेव्हां तुम्ही वरील ३० रुपये मुजरा दिलेत व बाकीचें हिशोबानें निघालेले ३१ रुपये मी तुम्हांस दिले. व कागद परत मागितला तेव्हां उद्यां देऊं म्हणाल्यात, परंतु आतां चाळवीत आहा व कागद देत नाहीं. सबब या जाहीर लेखानें कळवितो कीं, चार दिवसाच्या आंत कागद परत करावा. असें न करितां पुढें मागें त्या कागदा वरून फिर्याद अर्यादि कराल तर मी कांहीं एक देणार नाहीं. तुमचा सर्व हिशोब चुकता केला आहे. तो कागद पोकळ व बातल असे, कळावें तारीख २ माहे जुलई सन १९०३ इ.

सहीची निशाणी.

राघमी वल्लद लक्ष्मण कुणबी
राहणार मोजरी याचे
हातची रेघ.

---

## नोटीस

बेशमी पांडु वल्लद विराजी नागरे घाटोळ जात कुणबी राहणार कसबे आकोट काजी पुरा तालुके मजकूर यांसः—

मी खाली सही करणार याजकडून नोटीस देण्यात येते कीं मौजे खानापूर त्रिंबकपूर परगणे आकोट येथील माझे मालकीचे शेत सर्व्हे नंबर ३१ यातील निमे हिस्सा व सर्वे नंबर १९ यातील चार आण्यांचा हिसा तुम्हास पांच वर्षे पट्यानें वहितीस दिला त्यपैकीं स्वामित्वाबद्दल रकम सन १३११ फसली सालचे रुपये ९० व सन १३१२ फसलीबद्दल ११० रुपये एकुण रुपये देणगीं तुमचेकडून येणें असून आजपावेतों दिलें नाहीं. करार टळल्यामुळें वरील रकमेचें व्याज एकतीस रुपये बारा आणे ३१॥=१२ एकूण रकम २३१॥=१२ आठ दिवसांत माझे मजला आणून द्यावेत तसें न केल्यास दिवाणी कोर्टांत दावा करून खर्चासहीत रकम घेतली जाईल आणि या नोटीशीचा खर्चही तुम्हास द्यावा लागेल.

सर्व्हे नंबर ३१ या शेतांत पश्चीम भा-गाकडील तुम्ही शेताची किस्तगारी करूं नये. केल्यास लागवड खर्चाची जबाबदारी मजवर नाहीं कळावें तारीख १ माहे जून सन १९०३ इसवी.

सही

सरस्वती जवजे व्यंकटराव हनतोडकर
राहणार आकोट निशाणी
खुद्द बांगडी.

---

## नोटीस.

नोटीस बेशमी सखाराम वल्लद मानाजी सरोदे राहणार पाळोदी ता. आकोले जिल्हे मजकूर यास– नोटीस देण्यांत येते कीं तुम्ही ता. २९।५।०३ इसवीचे वऱ्हाडसमाचार पत्रांत नोटीस दिली ती पावली. सदर्हू नोटिशीचे आगोदर तुम्ही तुमचे मुलीचे फारकती करितां चार पंचासमक्ष रुपये २०० देण्यास तयार झाले होते व मी ३०० रुपये मागत होतो यावप्रमाणें आपसांत निकाल होत असतां केला नाहीं व विनाकारण नोटीस दिली. म्हणून हल्लीं या नोटीशीनें तुम्हास कळविण्यांत येते कीं तुम्ही लग्नाबद्दल रुपये ३०० व मुलीचे आंगावरील दागीनें असे आम्हास आणून देऊन फारकती घेऊन जावी असे तुम्ही १५ दिवसांचे आंत न केल्यास रितीप्रमाणें तुमचेवर दावा केला जाईल व या नोटीशीचा खर्च तुम्हास द्यावा लागेल. कळावें. तारीख ५।६।०३ इ०

सही

मिराजी व० कृष्णाजी गोरे कुणबी
वस्ती केळीवेळी ता. आकोट
निशाणी खुद्द.

## वऱ्हाडसमाचार

मिति ज्येष्ठ शुद्ध १३ शके १८२५

विद्याखात्याशीं अत्यंत निकट संबंध असणाऱ्या एका गृहस्था बरोबर गप्पा चालल्या असतां ते सहज ह्मणाले कीं, अलीकडे मुलांची प्रवृत्ती कादंबऱ्या व नाटकें वाचण्याकडे फारच वळली आहे. त्यास इतर पुस्तकें वाचणें अगदीं नीरस व कंटाळवाणें होतें आणि त्यामुळें त्यांच्या मनास चांगलेंसे योग्य वळण मिळत नाहीं. हा त्यांचा अभिप्राय आह्मांस खरा वाटतो. ज्यांचीं मुलांस वाचनाची गोडी नसेत व ज्यांना वाचण्याची हौस व आवड आहे अशांस काल्पनिक गोष्टीच फार प्रिय वाटूं लागल्या आहेत. काल्पनिक कादंबऱ्यांत त्यांचीं मनें अगदीं तल्लीन होतात तीं इतकीं कीं त्यास ती गोष्ट पुरी झाल्या शेरीज स्वस्थताच वाटत नाहीं, अशा कादंबऱ्या तात्कालिक करमणूक करून मनास रमवितात. पण ह्या मनरंजनापलीकडे त्यांचा विशेषसा उपयोग होत नाहीं. किंबहुना कादंबरीच्या नादानें व चिर सहवासानें मुलांचीं मनें एका प्रकारें दूषित होतात असें ह्मटल्यास अतिशयोक्ति होणार नाहीं, त्यांच्या अंतःकरणात भलत्याच स्वैर कल्पना व विचारतरंग उठतात, व त्यांस सारासार विचार कमी असल्यामुळें त्याचा परिणाम चांगलासा होत नाहीं.

वाचनानें मुलांचीं मनें संस्कृत झालीं पाहिजेत, वाचनानें मुलांस चांगली शिक्षा लागली पाहिजे, वाचनानें त्यांच्या मनाचा विकास होऊन त्यांचे विचार प्रौढ व उदात्त झाले पाहिजेत व ह्या गोष्टी ज्या मुळें प्राप्त होतील अशीं पुस्तकें त्यांच्या वाचनांत आलीं पाहिजेत. मुलांस वाचनाची गोडी लागावी ह्मणून त्यास चांगल्या गोष्टींचीं पुस्तकें द्यावींत. ह्या गोष्टी देवादिकांच्या, साधुसंतांच्या, शूर, धाडसी अशा थोर लोकांच्या असल्यास फार चांगलें, प्रत्येक गोष्टींत स्वामीभक्ति, बंधुप्रीति, दानत, औदार्य, परोपकार, आत्मसंयमन, दृढनिश्चय आदिकरून सद्गुण पैकीं एखादा विशिष्ट गुण वर्णिलेला असावा. अशा गोष्टींच्या वाचनानें मनांत उच्च विचार उत्पन्न होतील, सदाचार अंगीं बाणेल, व मनास उभारती होऊन आनंद व सौख्य हीं लाभतील.

सुरस, चटकदार अशा कादंबऱ्याच फार झाल्या आहेत. यापेक्षां सत्पुरुषांचीं चरित्रें व कथानकें जितकीं तयार होतील तितकीं चांगलीं. कादंबऱ्या त्याज्यच आहेत असें नाहीं, पण त्यातील भराऱ्यांनीं शेवटीं मनास थकवा येतो. मुलांना कथा पुराणांतल्या अत्युत्तम गोष्टी वाचण्याची व श्रवण करण्याची आवडी उत्पन्न करून दिली पाहिजे. त्याच गोष्टी वारंवार व पुनःपुन्हां त्यांच्या डोळ्यापुढें मांडल्या पाहिजेत. अशा गोष्टींच्या साहचर्यानें साहजिक मनाची प्रवृत्ती सन्मार्गाकडे प्रबळ होईल व त्याच्या पाप वासना मरून जातील हें निर्विवाद आहे. अलौकिक पुरुषांचे गुण गाण्यानें अंगांत एक विलक्षण प्रकारची अनिर्वाच्य अशी शक्ती उत्पन्न होत असते व त्या शक्तीच्या जोरावर मनुष्याचें चित्त सदोदित प्रसन्न राहतें. उत्तम गोष्टीचा सहवास असणें हेंच उच्च प्रतीचें शिक्षण होय, अशा गोष्टीचा वीट कधींही येत नाहीं. त्या जितक्या वेळां एकाव्यांत तितक्या थोड्याच वाटतात. कादंबऱ्या प्रमाणें ह्या मुळें डोकें हलकें पडून त्रस्त होत नाहीं. ह्या गोष्टींतलें रसमाधुर्य फारच अवर्णनीय होय. अशीं सद्बोधाचीं पुस्तकें शाळांतल्या क्रमिक पुस्तकांपैकीं असावीत; ह्मणजे आपोआप मुलांना नीतिशिक्षण मिळेल व त्यांच्या कोमल बुद्धीवर हा बोध चांगला ठसून त्यास चांगलें वळण लागेल.

हें धरील मत आईबापांनीं, व गुरुवर्यांनीं मुद्दाम ध्यानांत घ्यावें. मुलांनींहि होतां होईल तों अशाच वाचनाच्या नादांत दंग राहण्यास शिकावें. आपल्या देशांत कोणकोण सत्पुरुष होऊन गेले, त्यांनीं काय काय अद्वितिय कृत्यें केलीं, त्यांची कीर्ति कशी अजरामर झाली वगैरे गोष्टी सुज्ञांना जितक्या समजतील तितक्या चांगल्या. अलीकडल्या मुलांना एकाहि सत्पुरुषाचा एखादाहि महिमा माहीत नसतो ही गोष्ट विशेषच विचार करण्याची आहे. ही गोष्ट अगदीं निर्विवाद आहे कीं, सत्पुरुषाच्या चरित्रांतील एकच गोष्ट जें शिकवील, जी मनाची तंद्री लावील व जी स्फूर्ति देईल तशी शक्ति क्वचितच इतरत्र दिसेल.

## निजिध्यास

परवां आह्मी आगगाडींत बसून एका गांवास जात होतों. गाडींत एक कोंकणस्थ ब्राह्मण बसला होता. गाडी सुरूं झाल्यावर तुह्मी कोण, काय, कोठें वगैरे तांत्रिक प्रश्न झाल्यावर त्या गृहस्थानें आपण होऊन मुद्दाम मोठ्या ताकलुतीनें एक गोष्ट आह्मांस सांगितली. तिचा अर्थ फारच खोल व ध्यानात ठेवण्या सारखा आहे ह्मणून ती गोष्ट आह्मीहि सांगतों.

एका राजधानींत एक साधु राहत होता. राजा नित्यदर्शनास येत असे. एके प्रसंगीं साधु महाराज कंद भक्षण करीत होते इतक्यात राजाची स्वारी प्राप्त झाली. त्या साधूनें त्यास आपल्या पैकीं तीन कंद खाण्यास दिले व पाच सात आपण खाऊन ईश्व ध्यानास लागला. ते दिवशीं राजाची कामवासना अनिवार झाली व तो आपल्या शंभर स्त्रियासहही रममाण झाला तरी त्याची तृप्ती होईना. हें पाहून त्याच्या मनांत संशय आला कीं, अरे मी तीन कंद खाल्ले तर माझी ही अवस्था झाली, मग ज्या साधूनें पाच सात खाल्ले त्याची काय दशा झाली पाहिजे! हा साधू नसून लुच्चा असावा, ह्मणून त्यानें त्यावर छिटेक्टिव्ह पोलीस ठेविले. ही गोष्ट साधूस अंतर्ज्ञानानें समजली. नंतर त्या साधूनें त्या राजास रोजचे ३ कंद प्रमाणें २१ कंद खाण्यास सांगितले व बजावलें कीं, राजा, तू ७ वे दिवशीं मरणार आहेस तर ह्या अवधींत सर्व इच्छा तृप्त करून घे. राजास ह्या हद्रोगाचा सशोभिरा लागला. त्यानें कंद खाणें सुरू ठेवले. पण त्यास कांहींच सुखेच्छा होईना. त्याला कायतो मृत्यू पुढें दिसत होता. ७ वे दिवशीं राजाला साधूनें बोलावून विचारलें कीं संशय निवृत्ती झाली किंवा नाहीं? साधूनें उलगडून सांगितलें कीं ज्या गोष्टीचा निजिध्यास ठेवावा तीच सदोदित दिसते व दुसरें कांहींच आपल्या डोळ्यापुढें दिसत नाहीं. आह्मी रोज ७–७ कंद खाल्ले तरी आमचें प्रभूचे ठायीं अनन्य भावें एक चित्त असल्यामुळें आह्मी ब्रह्मानंदांतच दंग असतो व आमच्या इतर वासना नष्ट पावतात.

ही गोष्ट काय सांगतें आहे कीं, ज्या वस्तूचा आपण ध्यास घेतो तीच वस्तु प्रिय वाटते व इतर गोष्टी तुच्छ भासतात. आपलें राष्ट्र मृत्युमुखीं पडलेलें आहे, आपलें स्वातंत्र्य नष्टावलें आहे, आपल्या अंगांत कांहीं पराक्रम उरला नाहीं, आपण हीन व दीन होत आहोंत हीच गोष्ट डोळ्यापुढें एक सारखी ठेविली पाहिजे. आपले पूर्वीचे सुखोपभोग व ऐषआराम हीं अगदीं विसरून गेलें पाहिजे. ही गोष्ट आपल्या मनांत सतत वागेल तर मग इतर व्यवसाय आपणास रुचणार नाहींत. हीच गोष्ट आपल्या आयुष्याची इतिकर्तव्यता असें समजून आपण ह्याचीच पुरी पाठ घेऊं. पण अद्याप आपल्या कैनी संपल्या नाहींत. आपल्या देशाचें हृदय विदारण करणारें चित्र अद्याप आपण दृष्टीनें बरोबर निरखिलें नाहीं. अद्याप आपणांस आपला स्वतांचा अभिमान वाटत नाहीं, स्वदेशी गोष्टींची आपणांस आवडी नाहीं, व स्वदेश प्रीतीचा व स्वतंत्र्याचा रस अंगांत भिनला नाहीं. वरील गोष्टींतल्या राजास जसें आपल्या मृत्यूचें एकच ध्यान लागलें होतें तद्वत आपणांस आपल्या राष्ट्राच्या मृत्यूचें ध्यान आपणास लागलें पाहिजे आपण हळेक्षांक केली व आपण सर्वांनीं एक समयावच्छेदेंकरून जोर धरला नाहीं तर आपला मृत्यू खास टळणार नाहीं. आपण आपली वस्तुस्थिती डोळ्यात तेल घालून अवलोकन केली पाहिजे व पुढें ओढवणाऱ्या बिकट संकटांतून पार होण्याचा उद्योग करण्यांत आपलें तनमनधन अर्पण केलें पाहिजे. ह्यांत जर अंतर होईल तर सर्वस्वी घात होणार हें कधींहि विसरतां कामा नये.

## काळी मृत्तिका

शेतांतील काळी माती किंवा नदी काटची गाळाची माती ह्यांत कांहीं विशिष्ट गुण आहेत. दिसायाला नुसती माती आहे पण या मातीचे गुण अनुभवून घेण्या सारखेच आहेत ह्या मातीचा पाण्यांत भिजवून अंगास लेप केला असतां शरीर अगदीं लोण्या सारखें मऊ व गुळगुळीत पडतें, व तें सतेज कांती धारण करितें. माती अंगास लावल्यानें सर्व मळमळ धुऊन जाऊन अंग अगदीं स्वच्छ व साफ होतें. बिलकूल मळकट राहात नाहीं. अलीकडे नाना तऱ्हेचे सोप [ साबण ] निघालेले आहेत व सर्वत्र त्यांचीच चहा होत आहे. पण आह्मी खात्रीनें सांगतो कीं ह्या साबणापेक्षां हजारों पटीनें हें शास्त्रप्रणित मृत्तिका स्नान आरोग्य कारक व आनंददायक आहे. पण हें लोकांस कसें पटत पडावें हा मोठा प्रश्न आहे. कारण मनुष्य स्वभावच असा आहे कीं फुकटांत जी वस्तु प्राप्त होते तिची किंमत त्यास कळत नाहीं. रुपयापाया खर्चून आणलेल्या सोपाचेंच त्यास महत्व वाटतें. विलायती वस्तूंचें वेडहोरें आमच्यांत फार माजलें आहे पण हें कालांतरानें आपोआप गोंडळ व पूर्वींची ही माती, शिकेकाई, दूध, आंबा ह्याच गोष्टी आपण पसंत करूं.

आपलें शरीर अगदीं सुंदर दिसलें पाहिजे, व आपल्या अंगाचा सुगंध सुटला पाहिजे अशी प्रबळ इच्छा यूरोपांतील स्त्रियांना जितकी आहे तितकी दुसरीकडे क्वचितच आढळून येईल. त्या सकाळ पासून पुन्हा उजाडेपर्यंत ह्या कामांतच चूर असतात असें ह्मणण्यास हरकत नाहीं. त्या आपला इष्ट हेतु साधण्या साठीं कोणकोणचे सुगंध व रंग लावील याची आपणांस कल्पना होणें कठीण आहे. पण ह्या स्त्रियांनाहि आपल्या काळ्या मातीचा चिखल अंगास फासणें अंमत फायदेशीर वाटूं लागलें आहे, व त्या सुगंधी सोप सोडून देऊन ह्या चिखलांत मनसोक्त लोळण घालतात हें ऐकून पुष्कळांचा जीव ठिकाणावर राहणार नाहीं असें आह्मांस वाटतें. आतां लवकरच असा काळ येईल कीं, पाश्चिमेकडून शिक्का मिळवून आलेलें हें मत सर्वमान्य ठरेल व आह्मांस मोठा भरंवसा आहे कीं आपली पुरातनची चाल पुन्हां चांगली प्रस्थापित होईल.

आपल्या धर्म शास्त्रांतील पंचामृत स्नान, गंधोदक स्नान, मृत्तिका स्नान हीं पुष्कळांच्या माहितींतलीं स्नानें आहेत. ह्या स्नानविधींचा परिणाम फारच आरोग्य दायक आहे हें आपण विसरून जात आहों हें बरें नव्हे. अद्यापहि आपल्याकडे पुष्कळ ठिकाणीं स्त्रीपुरुषें काळ्या मातीनें केस धुतात व अंग स्वच्छ करितात. ही माती लागेल तितकी व वाटेल तेथें व पैहि खर्च न करितां मिळणारी आहे. शिवाय ह्या मातीचे औषधिक गुण पुष्कळ आहेत. अंगावर उष्णतेनें किंवा कांहीं अन्य विकारानें फोड व गांठी येतात त्या हिच्या लेपनानें बऱ्या होतात. कपाळ किंवा पोटदुखी राहते. हाता पायाची व डोळ्याची आग होत असल्यास ती शमते. ह्मणजे साधारण नित्य व्यवहारांतील दुखणींवाणीं यांना लवकर आराम पडतो. विंचवाच्या दंशावरहि ह्याचा उपयोग बरा होतो. कांहीं विशिष्ट अनुपानांनें ह्या मातीमुळें मोठमोठे रोग बरे झाल्याचीहि उदाहरणें आहेत. तर अशा मृत्तिकेचा लोकांनीं अव्हेर करूं नये व तिची महती काय आहे ह्याची खरी पारख मुद्दाम अनुभवून पहावी ह्मणून ही विनंती आहे. हें येथें सांगणें जरूर आहे कीं, आह्मांस बऱ्याच लोकांनीं आपला अनुकूल अनुभव कळविला आहे व सध्यां ते तिचाच आश्रय करून राहत असतात.

## माफीची सुनावणी

( शुद्धवऱ्हाडी व डाक्टर रेली )

आमचे व्यवसाय बंधु रा. रा. शुद्धवऱ्हाडी कर्ते यांनीं आह्माकडे छापण्यासाठीं एक कडकवारीची माफी मागण्याच लेख पाठविला होती. पण त्यांत कांहीं आता राम...

...ताप तरी चमत्कार दाखला ...

डरला नाहीं. अशा समजुतीवर आह्मी ती प्रसिद्ध केली नाहीं पण आमच्या शुद्ध वऱ्हाडी कर्त्यांच्या मागील ससेमिरा सुटावा व अधिकाऱ्याची तब्बेत खुष राहावी ह्मणून त्या माफीला खालील स्थळ देतो:-

आह्मी आमच्या पत्राच्या ता० १९ जानेवारी सन १९०३ च्या अंकांत असें छापलें होतें कीं अकोला जिल्ह्याचे सिव्हिल सर्जन साहेब बहादूर यांच्या हुकुमानें सरासरी ४।५ वर्षांचीं दोन लहान मुलें एका घराच्या माहींत कित्येक तासपर्यंत कोंडून ठेविलीं गेलीं होतीं आणि या मुलांना अशा रीतीनें अन्यायानें प्रतिबंधांत कां ठेविलें ह्मणून डेपुटी कमिशनर साहेब बहादूर यांनीं जेव्हां मे० कर्नल रेली साहेब बहादूर यांस पत्रानें लिहिलें तेव्हां त्यां मुलांची सोडणूक झाली.

आमच्या पत्राच्या ता० ९ फेब्रुवारी १९०३ च्या अंकात आह्मी प्रसिद्ध केलेली सर्व बातमी आह्मी परत घेतली व दिलगिरी ही प्रदर्शित केली; आणि त्या अंकीं असेंहि लिहिलें होतें कीं आह्मी प्रसिद्ध केलेली सर्व बातमी खोटी असून लोकांचा गैरसमज करणारी होती.

खोटी बातमी मिळाल्या कारणानें आह्मी ले. क. इ. डब्ल्यु. रेली साहेब बहादूर सिव्हिल सर्जन आकोला यांच्या विरुद्ध चुकून जो खोटा आरोप आह्मी प्रसिद्ध केला होता त्याबद्दल जितक्या प्रसिद्धपणें मागता येईल तितक्या प्रसिद्धपणें आह्मी त्यांची माफी मागतो; व अशी खोटी बातमी प्रसिद्ध केल्यामुळें मे० रेली साहेब बहादूर यांस जो विनाकारण त्रास झाला किंवा त्यांचे बद्दल लोकांचा जो गैर समज झाला असेल तो या लेखानें नाहींसा होईल व याबद्दल पुन्हा एक वेळ आह्मी त्यांची फार फार माफी मागतों.

एडिटर "शुद्धवऱ्हाडी."

या कळमवार माफीनें डाक्टर रेली साहेबांची समजूत पडेल आणि त्यांच्या संबंधानें लोकांचा गैर समज दूर होईल असा भरंवसा आहे. हा माफीचा मसुदा विनाकारण लांब लचक आहे. शुद्धवऱ्हाडी कर्त्यांनीं आपला कबूलजबाब घेतल्या नंतर या मसुद्याची गरज नव्हती. आमच्या मतें क्षुल्लक गोष्टीला फार महत्त्व देण्यांत आलें आहे. क्षणभर कल्पना केली कीं डाक्टर रेली साहेब यांनीं घर बंद करविलें आणि मुलें अडकली गेलीं. बंदोबस्ताच्या गर्दींत अशी नजर चूक होण्याचा संभव आहे. पण या चुकीची दुरुस्ती ह्मणजे डाक्टर साहेबांच्या कानावर गोष्ट घालण्याचाच विलंब होता. कोणताच माणूस मुलांस कोंडणार नाहीं आणि तशांत दयाशील व डाक्टरी करणारा अधिकारी ही गोष्ट ती कशी करणार! शुद्धवऱ्हाडीच्या अंकांत ती बातमी वाचली तेव्हांच आह्मांस तिच्यांत कांहीं अर्थ वाटला नाहीं. या बातमींत डाक्टर रेली साहेबां विरुद्ध कांहींच मजकूर नव्हता. मुलें घरांत चुकून राहिलीं असली तरी त्याचा दोष डाक्टर साहेबाकडे तो कसला! एखाद्या क्षुल्लक चुकीचा बागुलबोवा कसा होतो त्याचें हें एक उदाहरण होय.

---

# The Berar Samachar

MONDAY JUNE 8 1903

If one thing is more distressing than another it is the deepening poverty of our people. It has made us helpless and hopeless: It has paralysed our best efforts in every line of life: It has laid low our national aims and aspirations: It has made our very existence a doubtful fact. This national calamity is indeed the result of causes too many to mention. But there is no denying that of all the evils that Heaven sends to a nation the foreign rule is the most potent evil that works such a great mischief. But India in the dispensation of the Providence and for her own good must be ruled by foreigners. Happily for the Indians the righteous Englishmen are to rule over them. In spite of continuous efforts to the contrary their spirit of self—interest waxes high in the administration of this conquered country. Nor is it easy for them to forget those deep rooted racial distinctions and the proud consciousness of being the conquerers. But the sting of the foreign rule has now almost disappeared. India and England walk hand in hand and stand as one united powerful empire.

But the fact of the increasing poverty of India stares her in the face. It presents a knotty problem both for the Englishmen and the Indians. Poverty is the greatest political danger to a state and if it finds no way out it is sure to invoke its utter destruction and ruin. Both the Englishmen and the Indians must combine to remove this undesired state of things. Both must stand on the same political platform and work in unison. Industrial activity points to the solution of the whole problem. English industries must foster the Indian ones and not kill them. The English interests must not conflict with the interests of the Indians as they do at present. Both together must compete with foreign industries and must bring the money into the united empire. But England exploits India for her own advantage. She enriches herself at the expense of India. She competes with the Indian industries and that too till they are destroyed. India is thus left without any means of making money. India is made the great market for the English wares. India has lost her prestige as an industrial nation. India is thus dwindling into insignificance and the Indians are becoming mere labourers. All the expenses which India has to incur for her administration far exceed the incomes that she possesses. And such a state of finance can never make any nation rise and thrive.

Industrial revival is the only saviour of our nation: Industrial revival alone can fan the dying embers of our national existance into a blazing flame. But it is impossible to work in this direction without a lift from England. India alone is not equal to the great task of this industrial awakening and so she implores the help of the English people. India on her own part is now fully alive to this sense of new awakening All her hopes are centered in the success of this new undertaking. The spirit of self—help not wanting, and the inspiring angel of Industry cheers up the gloomy path towards the goal. Now it lies with the rulers to make us stand or fall. In the interests of justice and humanity they have to discharge their duty of patronizing our dying industries. We hope that they fail not to act to the satisfaction of all.

---

"The late Mr. Parnell, the 'Uncrowned King", was fond of preaching among his friends the precept—"Never trust an Englishman." There is no use disguising the fact that a good many educated Indians are beginning to think that Parnell might have been right after all. They have almost every one of them come into contact with one or two Englishmen whose saintly lives have commanded in an unstinted measure their regard and even reverence. But their estimate of the character of the great majority of latter—day Anglo-Indians is precisely the same as that formed by Parnell of the character of Englishmen. It is a pity that it should be true but facts are rather stubborn things which cannot be blinked out of existence or swaggered away. Any worthy Englishman would be startled to find to what extent the pride of race and the enjoyment of pelf and power have blunded, in a certain type of Anglo—Indians, some of the noblest instincts which have made the English so great."

---

## वऱ्हाडवृत्त.

हवामान-- दिवसा ऊन चांगलेंच प्रखर तापतें. रात्रीं वारा जरा सोसाट्याचा सुटतो. प्रातःकाळच्या हवेंत थंडावा असतो. एकंदरींत हवे संबंधानें लोक सध्या आनंदांत आहेत.

दर्यापुराहून 'हितेच्छू' कळवितात कीं, तेथील हवा चांगली असून नदीचें पाणी मे० तहशिलदार साहेबांनीं विशेष लक्ष पुरवून स्वच्छ ठेविलें आहे. परंतु हितेच्छूची एक मोठी तक्रार लायब्ररी संबंधानें आहे कीं लोकांस ताजीं पत्रें मुळींच वाचायास सांपडत नाहींत, तीं कोणाच्या तरी घरीं पडलेली असतात. तर ही लोकांची गैर सोय दूर होणें इष्ट दिसतें.

मि० शेख महमद इस्मायल एक्स्ट्रा असि० कमिशनर यांची नेमणूक उमरावतीस झाल्या अन्वयें ते तिकडे रवाना झाले.

मि० आर. ए. सिम्सन साहेब डेपुटी कमिशनर हे नुकतेच आजारीपणाच्या रजेवर विलायतेस जाण्यासाठीं रवाना झाले होते. वाटेंत आगबोट एडनला पोचण्या पूर्वींच साहेब बहादुरास देवाज्ञा झाली हें कळविण्यास फार दुःख वाटतें. वाघानें घायाळ केल्या दिवसापासून यांची प्रकृती एक वेळ थकली ती उत्तरोत्तर थकतच चालली. त्यांस काळिजाचा रोगही जडला असून तो बळावत चालला होता. मद्यादिकांच्या सेवनाचा प्रतिबंध त्यांच्या हातून राहीना ह्मणून त्यांची प्रकृती अगदीं अखेरीच्या थराला फार जलदी आली साहेब बहादूर ऐन उमेदीच्या वयांत मरण पावले ही दुःखाची गोष्ट होय. या [illegible] पडकळ मिळावटीचा होता. तलख प्रकृती होती पण तिच्या उच्छृंखलपणाला दूर करणारे कांहीं गोड गुणही अंगीं होते. त्यांस लिहिण्याचा फार कंटाळा असे पण प्रकरणातील पुराव्याची शहानिशा ते चांगली करीत असत. त्यांच्या मरणामुळें इष्टमित्रांस मोठी हळहळ वाटेल. ईश्वर त्यांस सद्गती देवो!

---

## आकोला बाजारभाव

| | |
|---|---|
| हुंडी दर्शनी | १००८ |
| सोनें २४।= | चांदी ६९ |
| ज्वारी ४५।१० | जवस १०४ |
| गहू | ९६ ते १०० |
| बाजरी | ९९ |
| मीठ . | ३८=।। रु. मण |
| चणे | ३।।- रु. मण |
| तूप | ८। रु. मण |
| तेल | ९। रु. मण |
| रुई | ९०।९९ |

## नोटीस.

मेहरबान— शेट नेनसुखदास गोकुळदास मारवाडी राहणार खामगांव यांस:--

खालीं सही करणार या नोटिशीनें असें कळवितों कीं खामगांव येथील जीन फ्याक्टरीचे उत्तरेस जी खुली जागा आहे. त्यापैकीं एक हिस्सा आमचे मालकीचा असून बाकीचे हिस्से आपलेकडे भाड्यानें आहेत. त्यानें भाडे सालोसाल आह्मी तुह्मास देत आहों. त्या सहा हिश्या पैकीं एक हिस्सा रा. खतसीदास शिवलाल चांडक राहणार खामगांव यांचे मालकीचा असून त्यांनीं आह्मांस विकला आहे. करितां तुमचा आगर दुसरे कोणाचा सदर्हू इसमाचे हिश्यावर हक्क असेल तर ही नोटीस पावल्या पासून १५ दिवसाचे आंत आपला हक्क आह्मांस शाबीत करून दाखवावा. तसें तुमचे कडून आगर दुसरे कोणाकडून न झाल्यास सा तारखे नंतर आह्मी त्या जागेचें योग्य रीतीनें खरेदीखत सदर्हू इसमा पासून करून घेऊन तें पक्कें करून घेऊं. व मग कोणाचा ही हक्क राहणार नाहीं. व तक्रार ऐकिली जाणार नाहीं. ह्मणून ही नोटीस लिहून दिली असे. कळावे. तारीख ९ जून १९०३ इ०

सही

मुल्ला हाजी इसुफ आली
शेख जाफरजी जिनिंग
फ्याक्टरीचे मालक
खामगांव.

## वर्तमानसार

वादळाचा अपूर्व प्रभाव—गेल्या आठवड्यांत पुष्कळच ठिकाणीं मोठमोठी वादळें झाल्याबद्दल खबरा आल्या आहेत. वारा चारही दिशांनीं उद्दाम रीतीनें स्वैर फिरत होता. पावसाचा जोराचा तडाखा सुरू होता. कित्येक ठिकाणीं विजा पडून घरें भंगलीं, व प्राणहानि झाली. वाऱ्यानें घरांचें पत्रें कवलें उडालीं, घरें पडलीं, समुद्र खवळला, मचवे बुडाले, मोठमोठे वृक्ष उखडून पडले. अशी एकच दाणादाण उडाली. सर्वांचीं अंतःकरणें भीतीनें कांपत होती, व यावेळीं प्रलय काळच्या विराट स्वरूपाची थोडीशी ओळख झाली. निमिषार्धांत परमेश्वर काय काय तरी चमत्कार दाखवितो!

**हजामतीचें विजेचें यंत्र**— हजामत करण्याचें एक विजेचें यंत्र निघालें आहे.

**लोहचुंबकाची रेल्वे गाडी**— कोपनहेगेन येथें लोहचुंबकाचे सहायानें रेल्वेची गाडी चालविण्याची खटपट चालली आहे. ही गाडी एका तासांत ३०० मैल जाईल असें म्हणतात.

**उंटावरून पृथ्वी प्रदक्षिणा**— दोघां हिंमतदार रशियन तरुणांनीं उंटावर बसून पृथ्वीप्रदक्षिणा एका वर्षांत करण्याबद्दल २ हजार पौंडांची पैज लाविली असून ते सेंटपीटर्सबर्ग येथून आपल्या प्रवासासही निघाले आहेत.

**गमतीचें यंत्र**— पोस्टवाले शहरांतील पत्रांच्या पेट्यांतून पत्रें वेळचे वेळीं काढून नेतात कीं नाहीं याची बिनचूक वर्दी देणारें यंत्र एका अमेरिकन विद्युच्छास्त्रज्ञानें शोधून काढलें आहे. पत्रांच्या ह्या सर्व पेट्या विजेच्या तारांनीं जोडल्या असून ही तार हेड पोस्ट आफिसांत नेलेली असते. पोस्टमननें एखाद्या पेटींतील पत्रें काढिलीं नाहींत कीं ताबडतोब ही बातमी हेड पोस्टमध्यें कळते. एवढेंच नाहीं, तर एका पेटींतील पत्रें काढिलीं नाहींत तर राहिलेल्या पेट्यांपैकीं कोणतीही त्यास उघडतां येत नाहीं.

**पदवी काढून घेतली**— सरकारी कामदारांस रावसाहेब, रावबहादूर, खानसाहेब व खानबहादूर अशा मोठ्या शब्दांनीं गौरविण्याची जी पद्धत आहे, ती यापुढें सरकारानें बंद केली आहे असें म्हणतात. मर्जी!

**स्त्रियांची टोळी**— रशियांत १८ स्त्रियांची एक टोळी पकडली आहे, तिजजवळ रत्नें वगैरे पुष्कळ सांपडली आहेत. या स्त्रियांना चांगलें निशाण मारतां येतें. यांनीं सधन लोकांचे खून करून त्यांना लुटण्याचा धंदा चालविलेला होता! या स्त्रिया मोठ्याच सद्गुणी दिसतात!

**चहाचा जुलूम**— चहाचे अंगीं पोषक धर्म नाहींत. याचे अंगीं फक्त क्षणैक टिकणारे उत्तेजक अथवा उल्हास उत्पन्न करण्याचे धर्म आहेत. पण या बरोबरच त्याचेमध्यें दुर्गुणहि आहेत. त्यामध्यें टॅनिन हें द्रव्य फार असल्यामुळें मलावरोध होतो, व पुढें पुढें पचन क्रिया बिघडते. सारांश, क्षणैक सुखासाठीं तो जर घेतला तर त्यापासून कायमचें आरोग्य बिघडतें. चहाभक्त म्हणजे अभिमांद्याचें माहेरघरच होय. त्याची एकदा संवय जडली कीं, ती सुटत नाहीं. अफू, गांजा, माजुम, सुरा, यांचे प्रमाणेंच ती अगदीं वेड वून सोडते. म्हणूनच, चहाची गणना व्यसनामध्यें होते. चहा पिणें म्हणजे सुरा पिण्याची पहिली पायरी होय, असें असून चहाचे परोपकारी युरोपियन व्यापारी लोक त्याचा आमच्या लोकांमध्यें शिरकाव करण्यासाठीं तोटा सोसून अनेक तऱ्हेनें यत्न करीत आहेत व त्यास सरकारचीहि सहानुभूति आहे, यास काय म्हणावें? आमचा सधनसमाज तर चहानें अगोदरच घेरला आहे. लग्नकार्यांत विहिणीसहि चहाचा पेला हा एक अवश्य मान होऊन बसला आहे. खालचा बहुसमाज तर फारच अडाणी असल्यामुळें पैशास पैशाभर चहा देणाऱ्या इंग्रजी व्यापाऱ्यांच्या मोहक जाळांत तो तेव्हांच सांपडण्याचा संभव आहे. हा समाज एकदां चहाभक्त बनला कीं चहा निरुपद्रवी समजून दुधाप्रमाणें लहान मुलांसहि तो चहाचा चमचा आपल्याबरोबर चाखणारच. त्याचा परिणाम सुकुमार लेकरावर विशेष घातुक होऊन त्यास लहानपणा पासूनच व्यसनाची चट लागणार. सारांश, दूरवर, निःपक्षपातपणें आणि शास्त्रीयरीत्या विचार केल्यास चहाचें व्यसन अत्यंत त्याज्य होय. असें असून आपली पोळी पिकावी म्हणून व्यापारी लोक व सरकार अप्रत्यक्ष रीतीनें तो आपल्यावर लादूं पहात आहेत, ह्यास जरी कायद्याच्या दृष्टीनें जुलूम म्हणतां यावयाचा नाहीं, तरी तो नैतिक अथवा शास्त्रीयदृष्ट्या जुलूम नव्हे काय! मि० वि०

**गाण्याचा उपयोग**— गाणें ऐकणारांच्या मनास आनंद होतो व त्यामुळें त्यांच्या इतर मानसिक व्यथाहि दूर होतात. खुद्द गाणारांच्या मेंदूवर इतका समाधानकारक परिणाम जरी होत नाहीं तरी त्यापासून त्यांची छाती मजबूत होते. अर्थात, त्यांना छातीसंबंधीं विकार दमा, खोकला क्षय इत्यादि होत नाहींत. क्षय होण्यास ज्यांची प्रकृति अनुकूल अशा लोकांनीं गाण्याचा रावता ठेविल्यास त्यास तो विकार होत नाहीं असा शास्त्रज्ञ लोकांचा अनुभव आहे.

**अंगास चिकटलेल्या कपड्यापेक्षां ढिला कपडा अधीक गरम असतो**— याचें कारण असें कीं, ढिल्या कपड्याचे आंत गरम हवेचा थर राहण्यास अवकाश असतो, तसा अवकाश घट्ट कपड्याचे आंत नसल्यामुळें तो तितकी उष्णता करीत नाहीं.

**वाद्य आवडणारे प्राणी**— विंचू फक्त सारंगीच्या नादानें खूष होतात. सरड्याला सर्व प्रकारचीं वाद्यें आवडतात, आर आणि मणेर यांना कोणतेंच वाद्य आवडत नाहीं. परंतु साप फक्त सनईच्या नादानें अगदीं तल्लीन होतो, आस्वली आणि शहामृग यांना सारंगी फार आवडते. लांडग्यांना शिंगाचा नाद फार फार पसंत पडतो. हत्तींना उच्च सुरांतल्या पाव्यानें फारच आनंद होऊन ते नाचू लागतात, वाघाला सारंगी आणि पावा या दोहोंचाही नाद आवडतो. सील माशांना कांहींच आवडत नाहीं.

**गाडीच्या चाकाएवढें फूल**— हें जगांतील अत्यंत मोठें फूल सुमात्रा बेटांत आहे. त्या फुलाचें नांव "रॅफ्लेशिया आर्नोल्डि" असें आहे. या फुलाचा व्यास चांगला तीन फूट असतो, म्हणजे गाडीच्या चाका एवढें हें फूल असतें. याला बदामी आकाराच्या व पांढऱ्या शुभ्र अशा पांच पाकळ्या असतात या फुलाचें वजन सुमारें १५ रतल भरतें. व त्यांतून सुमारें दोन ग्यालन पाणी निघतें. या फुलाच्या कळ्या मोठ्या कोबीच्या गड्ड्या एवढ्या पण लांबट आकाराच्या असतात.

**बक्षीस**— पारिसमध्यें शहराला सौंदर्य यावें म्हणून दरसाल जे कोणी अत्यंत उत्तम अशा घरांचे नकाशे तयार करतील, त्यांपैकीं पहिल्या तिघांस सोन्याचीं पदकें बक्षीस देतात. आणि त्या नमुन्यावर जे घरे बांधतील त्यास घरपट्टीचा आकार निम्मे ...

**लबाडीची जाहिरात**— कलकत्यास रामलाल बर्मन नांवाच्या एका माणसानें ब्रिस्टन मार्केना आणि मंडळी नांवाचें एक दुकान घातलें आणि विजेचे दिवे पंखे वगैरे गांवीं विकण्याकरितां एजंट पाहिजेत. मालाच्या किंमती बद्दल २०० रु. प्रथम डिपाझिट भरावे व ठरलेल्या अटीवर एजंट व्हावें, ज्यांची मर्जी असेल त्यांनीं अर्ज करावे अशा अर्थाची एक जाहिरात पुष्कळ वर्तमानपत्रांत प्रसिद्ध केली. या मनुष्यानें ही जाहिरात खोटीच दिली व अशा रीतीनें लोकांकडून सुमारें ३,५०० रु. जमा केले असा त्याच्यावर आरोप आहे. खटल्याची चौकशी होऊन ९ वर्षें सक्त मजुरीची शिक्षा झाली. लोकांनीं सावध रहावें.

**चमत्कारिक हकीकत**— कोचीनमध्यें वेदकंचेरी प्रांतामध्यें मंचनाथ चंगल नांवाचा गृहस्थ राहत असे. तो मरण पावला. त्याच्या विधवेस नवऱ्यानें स्वप्नांत येऊन सांगितलें कीं, आपल्या हरिणास भिक्षेस पाठवीत जा. म्हणजे तुझ्या निर्वाहाची सोय होईल. त्याप्रमाणें ती हरिणास भिक्षेस पाठविते. त्या हरिणाचे गळ्यांला दोन पिशव्या बांधल्या आहेत. त्यांत लोक पैसे वगैरे टाकतात. एकदां एका लुच्चानें त्यांतील पैसे काढून घेतले, तों घरीं त्याचा एक बैल मेला, दुसरा मरणोन्मुख झाला. व मुलगा अत्यवस्थ झाला तेव्हां त्याचे मनांत शंका आली आणि त्यानें हरिणाचे पिशवींतील पैसे व दंडादाखल आणखी एक रुपया यांत घालून हरणाचे पिशवींत टाकले, व घरीं येतो तों त्याचा बैल व मुलगा दोघेही बरे झाले.

**शर्यत**— पारीस पासून माद्रिदपर्यंत मोटार गाड्यांची एक शर्यत नुकतीच झाली. १२७ मोठाल्या गाड्या व ३३ लहान गाड्या आणि ४७ मोटार सायकल इतक्यांची शर्यत लागली होती. ज्या ठिकाणाहून निघणार होती त्या ठिकाणीं ३,००० लोक ती पहाण्यास जमले होते! या शर्यतींत अपघात अगणित झाले. एक गाडी एका झाडाला आपटली आणि त्या गाडींतील एक मनुष्य ठार मेला व एकास जबर जखम झाली. १ फ्रेंच, १ इंग्रज आणि दुसरे तीन पारीस व बोर्डो यांच्या दरम्यान मेले. शिवाय इंग्रज व फ्रेंच मिळून ९ इसम मरण्याच्या पंथात आहेत. ही शर्यत पहाण्यास आलेल्या लोकांपैकीं आठ जणांच्या अंगावरून गाडी गेली पैकीं ४ मेले! आणखी ही किरकोळ माणसें भाजल्या पोळल्याच्या बातम्या आहेत. या शर्यतीचे परिणाम इतके भयंकर झालेले पाहून ती फ्रेंच व स्पेन हद्दींत चालवूं नये असें तेथील सरकारानें ठरविलें आहे.

**पोस्टाचें कार्ड**— पोस्टाचें कार्ड ४॥। इंच लांब व ३ इंच रुंद असतें परंतु पाव आण्याचीं तिकिटें निघाल्या पासून निरनिराळ्या प्रकारच्या कार्डांस तीं चिकटवून लोक कार्डाचें काम भागवितात. परंतु कार्डांचा आकार मोठा झाल्यानें अशा कार्डांबद्दल लोकांस भुर्दंड भरावा लागे. हल्लीं सरकारांतून असें ठरविण्यांत आलें आहे कीं, ५॥ इंच लांब व ३॥ इंच रुंद कार्ड असलें तरी तें पाव आण्यांत येईल.

**तोतया**— राजापुरानजीकचे गांवीं राहणाऱ्या विनायक हरी काळे नांवाच्या इसमानें बडोद्यास जाऊन वासुदेव गंगाधर नेने एल. एल. बी. असें नांव धारण करून मोठी मामलेदारी मांडली होती. अशा थाटांत त्यानें आपल्या विवाहाचाही घाट जुळवून आणिला होता, परंतु त्यास पोलिसानें पकडून त्याजवर खटला चालविला आहे. मुंबई युनिव्हर्सिटीच्या रजिस्ट्रारास फसविल्या संबंधाचे कांहीं कागद याचे जवळ सांपडले.

**टोळाचें विष**— संगमेश्वर तालुक्यांत कोळंब येथील नदीच्या डोहावरील आंब्यावर टोळ बसले, त्यांची विष्टा डोहांत पडली. या योगानें आंतील मासे मरण पावले. हे मासे ज्यांनीं खाल्ले तीं माणसें आजारी पडलीं आहेत. यावरून टोळाचे विष विषयीं लोकांनीं सावध असावें.

**खरा कोंडवाडा**— परवां पुण्याहून सोलापुराकडे प्रातःकाळीं एक गाडी गेली त्या वेळीं तेथील उतारूंना तिसऱ्या वर्गाच्या वेटिंगरूम मध्येंच कोंडून पडावें लागलें. डोळ्या देखत गाडी चालती झाली पण गाडीपर्यंत कोणास जातां आलें नाहीं कारण तेथील टिकिट कलेक्टरच्या सुस्तीमुळें तो कोंडवाडा उघडला गेला नाहीं. अशा कोंडवाड्यांतील उतारूंच्या हाल अपेष्टांमुळें अधिकाऱ्यांचें मन द्रवेल काय!

---

## जाहिरात

जाहिरात शेख काসम वल्द कच्छी राहणार गौंडर वस्ती पाथर्डी हल्लीं परागंदा यांस आणि इतर सर्वत्र लोकांस कळविण्यात येतें कीं सदरहू कासम कच्छी यानें मौजे पाथर्डी येथील दुकान माझ्यानें घेतलें होतें. कांहीं दिवस दुकानगिरी चालवून कासम वल्द यानें आपलें दिवाळें काढलें आणि माझ्या दुकानांत कांहीं किरकोळ माल सोडून देऊन दुकानाला कुलूप लावून चालता झाला. या गोष्टीला आज ३ महीने काळ लोटला. आमचें दुकानचें भाडें येण्याचा संभव नाहीं. दुकानाला कुलूप असल्यामुळें दुकानची खराबी होत चालली आहे या करितां आम्ही असें जाहीर करितों कीं आज पासून १५ दिवसांचे आंत कासम वल्द अगर त्याचा योग्य मुखत्यार यानें आमचें भाडें चुकतें करून आपला माल घेऊन जावा असें करण्यास चुकल्यास आम्ही पंचासमक्ष कुलूप तोडून दुकान उघडूं आणि दुकानांतील माल नाशिवंत असल्यामुळें जाहीर रितीनें लिलांव करून विकून टाकूं व भाड्याचे रकमेपेक्षां विक्रीचा पैसा अधीक आल्यास तो अधीक पैसा बिनवारशी म्हणून तहशिलदार साहेब तालुके आकोट यांचे कचेरींत दाखल करून देऊं. कळावें तारीख ५ माहे जून सन १९०३ इ०

सही

रामाराम वल्द दलपतसिंग

रजपूत राहणार पाथर्डी

तालुके आकोट

दस्तुर खुद.

REGISTERED N. No. 4

वर्गणीबद्दल

आकोल्यातील लोकांस................१ रु.

बाहेरगांवीं टपालहाशिलांसह........ २ रु.

वर्गणी आगाऊच दिली पाहिजे.

किरकोळ अंका..........................ं२

नोटिशी बद्दल

१० ओळीचे आंत रु० १

वर ओळीस..........ं१ ं१

दुसरे खेप..............ं१

Town ... ... ... ... 1 Rs.

Mofussil ... ... ... 2 ( with postage

All Subscriptions to be paid in advance.

Single copy ........................ 2 as

Advertisement

below 10 lines ...... 2 Rs

Per line over 10 ...... 8 as

Repetition Per line ... 2 as

# वऱ्हाडसमाचार.

## THE BERAR SAMACHAR

VOL XXXVII AKOLA MONDAY 15 JUNE 1903 NO 23

वर्ष ३७ आकोला सोमवार तारीख १५ माहे जुन सन १९०३ इ० अंक २३

### नोटिसीचें उत्तर

नोटीस वेशमी सरस्वती भवजे ठंबजाव हंतोडकर राहणार कनवे अकोट दमडग बेळाळ तालुके मजकूर यांस:-

मी खालीं सही करणार याजकडून नोटीस देण्यांत येते कीं तुह्मी मजला नोटीस वऱ्हाडसमाचार मार्फत तारीख ३।६।०३ इसवी रोजीं दिली ती तारीख ९।६।०३ इसवी रोजीं मजला पावली तुमचे मजला ३९ रुपये देणें आहेत व ते रुपये ही नोटीस पावल्यापासून ४ दिवसाचे आंत येऊन घेऊन जावे तसें न केल्यास पुढें कोणत्याच प्रकारची तुमची तकरार ऐकली जाणार नाहीं. तुमचे मागणें २३।८।१२ निरर्थक असोन विनाकारण नोटीस दिली ही बिलकूल बरोबर नाहीं रुपये ३९ देण्यास मी निरंतर कबूल होतों सर्वस्वी तुमचा खोटेपणा व बेइमानी आहे सबब तुमचे नोटिशीचा खर्चही मजला कबूल नाहीं.

सर्वे नंबर ३१ चे शेतांची बीस १० २१ एकवीस वर्षांपूर्वी सरकार मार्फत वांटणी झाली त्या प्रमाणें पूर्वेचा भाग तुमचा असल्या प्रमाणें वाहावा व पश्चिमेचा भाग माझा आहे त्यांत विनाकारण तुह्मी तंटा करूं नये केल्यास त्याचे नुकसानीबद्दल योग्य कोर्टांत दावा केला जाईल व या नोटिसीचा खर्च तुह्मास द्यावा लागेल कळावें. तारीख ११।६।०३ इसवी.

सही

पांडु वल्लद विराजी नागरे राहणार आकोट काभीपूरा दस्तुर खुद्द.

### नोटिशीचें उत्तर

रा० रा० पांडु वल्लद तुकाराम तांबटकार राहणार वाडेगांव यांस:—

मी खालीं सही करणार या लेखानें कळवितो कीं तुह्मी तारीख ४ माहे जून सन १९०३ इसवीच्या शुद्धवऱ्हाडी पत्रांतून नोटीस दिली ती पावली. आपण दिलेली नोटीस बरीच बनावटी केलेली आहे. आपण चांदीची व रोख रुपये दिल्याची गोष्ट लिहि ती ती अगदीं खोटी व लबाडीची आहे तुह्माकडे मीच ४८॥ रुपये मागण्यात दोन तीन वेळा आलो होतो पण कांहींच दिले नाहीं. आणि उलटी अशी बेमानीची नोटीस देता हें पाहून फारच अचंबा वाटतो. असो. आतां मला रुपये नको आहेत तुह्मी करारनामा लिहून दिला आहे, त्यांत शर्त अशी आहे कीं जर बक्षीस रुपये न दिले तर सर्व शेत माझें मालकीचें होईल व त्यावर तुमचा कांहीं एक राहणार नाहीं. आतां या करारा प्रमाणें शेत माझ्याच मालकीचें झालें आहे किस्तवारी मीच करीत आहे गाईनें या शेतात पाय कराल तर मी तुमच्यावर

हें पक्कें ध्यानांत ठेवावें कळावें. तारीख १० जून सन १९०३ इ०

सहीची निशाणी

नथू वल्लद रामजी सोनार राहणार वाडेगांव निशाणी हातोडा.

### नोटीस.

रा० रा० रामु वा. मल्हारी कळोने जात फुलमाळी राहणार पातुर शेखबाबू यांस.

तुळशी भ्र० रामु कळोनें राहणार व्याळे तालुके बाळापूर याजकडून नोटीस देण्यात येते कीं मी तुमची लग्नाची बायको असून तुह्मी मजला आज दीड वर्षां पासून कांहीं कारण नसतां टाकून दिलें व माझे आईचे घरी किती दिवस राहावे ! मी रोज मजुरी करून पोट भरीत आहे. मजुरी पुरत नसल्यामुळें मजला दरमहा २ रुपये प्रमाणें कर्ज रुपये ४० झालें आहे. आतां कर्ज कोणी देत नाहीं म्हणून मी कळविते कीं ही नोटीस पावल्या पासून आठ दिवसांचे आंत येऊन रुपये ४० खावटीचे देऊन मजला घेऊन जावे तसें तुह्मी न केल्यास हीच तुमची फारकती समजून जाती रिवाजा प्रमाणे दुसरा गंधर्वाचा नवरा करीन. मग तुमचा कांहीं एक नवरेपणाचा हक्क राहणार नाहीं. हक्क दाखविण्यास या नोटिसीवरून रद्द असे. आजपर्यंत तुमचेवर अवलंबून राहिल्याबद्दल जे कर्ज झालें ते मी दिवाणीत कोर्टांत दावा करून मळून घेईन. नोटीस पावल्या पासून ८ दिवसाचे आंत येऊन रुपये ४० पोट खर्च देऊन घेऊन जावे. तसे, न केल्यास मी दुसरा नवरा करीन मग तुह्मी गंधर्वास लागलेला पैसा मागितल्यास तो मिळणार नाहीं. शिवाय तुह्मास नोटिसीचा खर्च, पोट खर्च व कोर्ट खर्च द्यावा लागेल.

टीप—या शिवाय माझ्या आईचे घरचे सोन्याचे दागीने एक नथ सोन्याची मासे ०९, पुतळ्या दोन मासे ०८, हे अंगावरून काढून घेतले ते व नगदी रुपये १० दिले ते आणून द्यावेत. कळावे, ता० ८।६।१९०३ इसवी.

सही

तुळशी भ्र० रामु कळोने व्याळे तालुके बाळापूर निशाणी

### नोटीस

नोटीस ...

शेख ...

ता...

... the ... was ... were shown on ... experienced and ... like Mr. Elliot ...eb, that the above ... was withdrawn and the ...llowed to remain intact ...casion. But we are sorry to ...that a fresh attempt has been ...er contemplation at present for moving the authorities to remove the huts. It is said that the authorities are this time, going to be moved to take up the fields in question under the Land Acquisition Act. We fai to guess what public puopose is going to be served by removing the huts in question, beyond giving an ... a ... ers of ...se lives ...gent acts ... admit that ... a accident

जवळून वहिवाटीस घेतले तुमचे करारा प्रमाणें फसली सन १३१२ सालाप्रमाणें दहा वर्षें पुरी होऊन गेलीं आहेत. हल्लीं तुह्मास आह्मी सदहू शेत आमचे ताब्यांत देण्याबद्दल बरे. च वेळां झटलें असतां त्याप्रमाणे तुह्मी वर्तन करीत नसून ताब्यांत देण्यास हरकती दाखवितां करितां नोटिशीनें कळविण्यात येते कीं नोटीस पावल्या दिवसापासून ८ दिवसांचे आंत सदहू दोन्ही शेतें पट्ट्यातांत तुह्मी कबूल केलेल्या शर्ती प्रमाणें शेत नांगरून वखरून कुंदाकाडी वगैरे काढून आमचे ताब्यांत द्यावें असें न केल्यास रीती प्रमाणें तुमच्यावर दिवाणींत दावा करून शेताचे दुरुस्तीबद्दल जो खर्च लागेल त्याजबद्दल व सन १३१२ फसली सालचे पिकाबद्दल रुपये १०० व या नोटिशीचे खर्चाबद्दल असें सर्व मिळून नुकसान भरून घेण्यांत येईल. व शेताचे ताब्याबद्दल ही दावा करणें पडेल. कळावें. तारीख १२ माहे जून सन १९०३ इ०

सह्या

१ रामजी वल्लद दत्ताआपा हडगर मयत वारस पुत्र सोनुआपा वल्लद रामजी ... तर्फे मुखत्यार आत्माराम वल्लद बनसी कोष्टी याचे हातची निशाणी असे.

२ गोविंदा वल्लद येकोबा हडगर मयत वारस बाप येकोबा हडगर वस्ती बाळापूर तर्फे मुखत्यार आत्माराम बनसी कोष्टी याचे हातची निशाणी.

३ बिसमिल्लाखा वल्लद नामदारखा मयत वारस बायको जवरबी मर्द बिसमिल्लाखा तर्फे मुखत्यार अमीरखा वा। नवाजखा मुसलमान याचे हातची निशाणी.

४ आत्माराम वल्लद बनसी कोष्टी वस्ती छोटनापूर याचे हातची निशाणी.

### विंचवाची पलटण

तेमवर प्रांतांत मायावर शहरानजीकच्या शिलवंदी नांवाच्या गांवाजवळ दुपारच्या ... सांपडला होता त्यास १० वर्षांची शिक्षा झाली. वाशीम जिल्ह्यांतील एका बाईनें हरामाचें मूल टाकून दिलें व त्यामुळें तें मेलें असा तिजवर आरोप होता.

मि. सैफुद्दिनखान लालखान आफिशिएटिंग ए० अ. क. उमरावती यास पहिल्या वर्गाच्या माजिस्ट्रेटीचा अधिकार देण्यात आला आणि रा० रा० रामराव बापूजी पतकी आफिशिएटिंग ए० अ० क० यवतमाळ यांस पहिल्या वर्गाच्या माजिस्ट्रेटीचा अधिकार देण्याविषयीं शिफारस झाली आहे.

श्री माणिक प्रभू प्रासादिक संगीत नाटक मंडळी येथें आली असून तिचे तीन खेळ

विंचू बसलेला तिच्या मागून चालला होता. हा खास विंचू त्या पलटणीचा म्हणा अगर या दशकंठकयुक्त प्राण्यांचा म्हणा राजा किंवा नाईक असावा, असें वाटलें. असो. ही पलटण चालली असता पुढें तिला कांहीं अंतरावर एक मोठा थोरला दगड आडवा आला अर्थात या पलटणीची वाट आडल्या सारखी झाली. हें सर्वांच्या पुढें असलेल्या विंचवानें पाहून तो लगेच आपल्या पलटणीला सोडून झटदिशी मागें परतला. तेव्हां त्या पलटणीमध्यें चळवळ झाली. तो पुढारी विंचू जो निघाला तो वर सांगितलेल्या तांबड्या विंचवाकडे आला. तिकडे ती सर्व पलटण अगदीं शिकविल्या प्रमाणें व्यवस्थित व स्तब्ध उभी होती. हा जो विंचू आपल्या नायकाकडे आला त्यानें त्याच्या जवळ येऊन जणूं काय आपण वर्दी देण्यासाठींच आलों आहे. असें त्यानें ते आपले नांगीरूप निशाण उभारून सुचविलें आणि त्याच्या पुढें तोंड करून तो त्याच्याशीं कांहीं बोलला ! ती त्याची भाषा फक्त काय ती एका देवाला च ठाऊक ! ... त्यानें कळविल्यावर त्या स्वारीचा घोडा (तो काळा विंचू) आपल्या यजमानास त्याच्या आज्ञेनुरूप घेऊन पलटण सोडून तिच्या पुढच्या भागाकडे त्या निरोप सांगणाऱ्या विंचवाच्या मागून चालला तो वर निर्दिष्ट केलेल्या दगडा पाशीं पोंचला पण ते रक्तवर्ण वृश्चिकराज आपल्या घोड्यावरून खालीं उतरले व त्या दगडाजवळ गेले आणि आपली नांगी उचलून त्या दगडावर मारिली त्याबरोबर दगडाचे दोन भाग होऊन मधून या पलटणीस पलीकडे जाण्यास मार्ग मिळाला. अर्थात त्याची कुंठितावस्था दूर करून नंतर त्या राजाधिराज वृश्चिकराज महाराजांनीं पुनः आपल्या वाहनावर आरोहण केलें व पूर्ववत पलटणीच्या मागून आपला घोडा चालविला व ती पलटण दगडा मधून मार्ग क्रमूं लागली. या प्रमाणें त्या प्राण्यामध्यें सैन्याची किंवा लष्कराची कल्पना कितपत आहे हें त्याप्रमाणेंच ...

...पुनर्विवाह— नागपूरचे प्रसिद्ध न्यायाधीश व सुधारक रा० रा० वामन महादेव कोल्हटकर यांस पुनर्विवाहाच्या स्त्री पासून जीं अपत्यें झालीं आहेत त्यापैकीं वडील मुलगी कुमारी आवडी इचा विवाह पुण्यास गेल्या सोमवारीं मोठ्या समारंभानें झाला. रा. रा. हरी गणेश वापुरे इंडियन सिव्हील सरव्हंट यांस वर योजिले होते राजश्री वापुरे यांनीं मानसिक धैर्य उत्कृष्ट दाखविलें राजश्री कोल्हटकर यांच्या १७।१८ वर्षांच्या प्रौढ मुलीस वर उत्तम मिळाला. लग्नाचा सोहळा फार टोलेजंग झाला. अक्षतीच्या प्रसंगीं देवालयाचीं द्वारें मुद्दाम बंद केल्या मुळें अक्षत दरवाजावरच ठेविली.

वऱ्हाडसमाचार

मिति जेठ वद्य ६ शके १८२५

## नोंदणी खातें.

वऱ्हाड प्रांतांत सहा जिल्ह्याचे सहा जिल्हा-रजिस्ट्रार आहेत आणि त्यांच्या हाता खालीं ६२ सब-रजिस्ट्रारच्या कचेऱ्या आहेत. वणी जिल्ह्याला नोंदणीच्या सोयी पुष्कळशा अधीक आहेत. वणी जिल्ह्याला ११ सब-रजिस्ट्रारच्या कचेऱ्या आहेत. तितक्याच कचेऱ्या बुलढाणें जिल्ह्यांत आहेत. आकोला जिल्ह्यालाहि तितक्याच ह्मणजे ११ सब-रजिस्ट्रारच्या कचेऱ्या आहेत. पण आमदन्याच्या खर्चाच्या मानानें पाहतां इलिचपूर जिल्ह्याच्या कचेऱ्या सर्वांत कमी ह्मणजे सात आहेत परंतु या जिल्ह्यांतील फीचें उत्पन्न आठ कचेरीवाल्या वाशीम जिल्ह्याच्या जवळ जवळ दुपटीनें अधीक आहे आणि आमदन्याचा खर्च फारच कमी ह्मणजे ४६४२ रुपये असून वणी जिल्ह्यापेक्षां दिढीनें व बुलढाणें जिल्ह्या इतकेंच ह्मणजे १३ हजार रुपये उत्पन्न एकट्या इलिचपूर [illegible] सब-रजिस्ट्रार १४ असून एकंदर आमदन्याचा खर्च १२ हजारा जवळ आहे. उमरावती जिल्ह्याचें उत्पन्न साडे चोवीस हजार रुपये होतें. आणि तेंच आकोला जिल्ह्याचें २३ हजार रुपये होतें, एकंदर साही जिल्ह्यांच्या उत्पन्नाची एकुणात ८२?३० रुपये असून एकंदर आमदन्याचा खर्च ९१३४७ रुपये १९०२ सालीं होता. नोंदणीचें काम १९०१ सालापेक्षां बरेंच कमी झाल्यामुळें उत्पन्नाचा आंकडाही तीन हजार रुपयांनीं कमी आहे वरील आकड्यावरून हें लक्ष्यांत येईल कीं नोंदणीखातें ह्मणजे सरकाराला सालीना ३१४० हजार रुपये उत्पन्नाची बाब आहे. हें खातें लोकोपयोगी असून सरकाराला मोठें फायद्याचें आहे. या खात्याची आज पर्यंतची शिल्लक रुपयें ७,३०६९७ आहे. या आंकड्या वरून या कामाची सधनता ध्यानांत येईल. १९०२ सालीं एकंदर ३

१९०१ सालापेक्षां ३४१ दस्तऐवज अधीक असूनही त्या गहाणमालाची किंमत १९०१ साला प्रमाणेंच ३९ लक्ष रुपये असून ४० हजार रुपयांनीं अधीक आहे. या वरून असें दिसतें कीं अधीक मौल्यवान इस्टेटी संबंधानें गहाणाच्या देवघेवी घडल्या आहेत. १९०२ सालीं एकंदर १ कोटी १४ लक्ष ३९ हजार ६१६ रुपये किंमतीच्या स्थावर जंगम दौलती संबंधानें नानाविध व्यवहार झाले.

आमच्या समजुती प्रमाणें दुष्काळानें जो कहर उसळला होता तो कधींही न विसरण्या सारखाच होता. त्या सालीं पुष्कळशा मोडकळीस आलेल्या घराण्यांची जिन्नगी सावकाराच्या घरीं चालती झाली. दुष्काळामुळें एकदां जी गती मिळाली होती ती परतण्या सारखीच नव्हती. उत्तरोत्तर वाढत चाललेल्या गरिबीमुळें आमच्या प्रांतांतील मध्यम प्रतीच्या लोकांचा वर्ग खालावत चालला होता आणि त्या घोर दुष्काळांत हा मध्यम लोकांचा वर्ग पुष्कळस नष्टप्रायच झाला आहे. आमच्या प्रांतांतील सुखवस्तु लोकांचा मध्यम वर्ग मोडकळीस येऊन ऱ्हास पावत आहे ही गोष्ट मोठ्या काळजीची आहे. श्रीमान सावकारांच्या घरीं एकदां धनदौलत संचित झाली आणि मधल्या सुखवस्तु लोकांचा वर्ग इतिहासाचा विषय होऊन बसला ह्मणजे नोंदणीच्या कामाची वाढ न होतां लोकस्थिती मात्र अधिकाधीक असमाधानकारक होत [illegible] नोंदणी खातें लोकस्थितीचा एक आरसा आहे परंतु दुष्काळा सारखा भयंकर प्रसंग आल्या नंतर या आरशांत लोकस्थितीचें प्रतिबिम्ब बरोबर पडत नाहीं. ही गोष्ट या सालच्या नोंदणी खात्याच्या इतिहासावरून दिसून येत आहे. नोंदणीचें काम कमी पण लोकांची गरिबी मात्र वाढती आहे. सावकारांच्या घरीं जमी न जुमला एकदां गेला ह्मणजे त्याचा फारशा देवघेवी होत नाहींत.

---

आज मऱ्हाठेशाई बुडून सारीं [illegible]नास पाउणसें वर्षें झालीं असतील नसतील [illegible] आरल्यांत किती तरी फरक झाला आहे! आपले सध्याचे लोक जितके नामर्द, भेड व रणभिरू आढळतील तितके पृथ्वीच्या पाठीवर खरोखरी कोठेंही नसतील. हिंदुस्थानांत इंग्रजीचा प्रताप दिनकर तळपत असतां तेथील लोक इतके भित्रे व [illegible] शिपाई [illegible] हें आश्चर्य होय. ज्या आपणांस दुसऱ्याच्या तोंडानें पाणी पिण्यांतच सुख वाटूं लागलें आहे. अशी स्थिती ज्या देशाची होत आहे तो आपला देश भरभराटीस कधींच चढणार नाहीं.

अशी आमची दुर्दशा होण्याचें कारण इंग्रजी अमदानीच होय. इंग्रजीचा अम्मल सुरू झाल्या बरोबर तिनें आमच्या हातांतील शस्त्रें हिसकावून घेतलीं आणि आह्मांस हतवीर्य करून सोडलें. जगाच्या आरंभा पासून लढाया चालू आहेत, पुष्कळ वेळां वीर गड्यांनीं देशाचे देश जिंकून पादाक्रांत घातले आहेत पण त्या खऱ्या शूर सिंहाना दुसऱ्याचीं शस्त्रें हरण करून त्यांच्यावर राज्य करावें अशी बुद्धि झाली नाहीं. पण ह्या इंग्रजी राज्यांत पादाक्रांत झालेल्या लोकां जवळ स्वसंरक्षणाचीं हत्यारें असणें [illegible] राजनीतीस उचित दिसत नाहीं. ईश्वरानें सर्व प्राण्यांस पंच हत्यारी ठेविलें [illegible] पण हिंदुस्थानांतील मनुष्य प्राणी मात्र बिन हत्यारी होऊन बसला आहे. हें त्याचें खरें दुर्दैव कीं, [illegible]ना जें स्वातंत्र्य आहे तितकेंहि ह्या [illegible]ष्यास नसावें.

प्रत्येक देशांत लोकांना स्वरक्षणासाठीं शस्त्र वापरतां येते व लढाईच्या प्रसंगीं देशरक्षणासाठीं तयार राहतां यावें ह्मणून त्यास शस्त्रविद्याहि शिकविली जाते. सध्यां इंग्रजी साम्राज्याचें शत्रू पासून रक्षण करण्याचें काम गोरठघर गोऱ्या लोकांकडून होत नाहीं असा चांगला अनुभवहि येत चालला आहे. अशा समयीं हिंदुस्थानांतल्या लोकांस शस्त्रविद्या शिकविणें अत्यंत इष्ट आहे. हिंदुस्थानांतील प्रजेस शस्त्र देऊं [illegible]ल्यामुळें अनर्थ ओढवेल ह्मणून जी भीति राज्यकर्त्यांच्या मनात आहे ती निरर्थक व घातुक होय हिंदुस्थानचे लोक अत्यंत राजनिष्ठ आहेत अशी पुरी खात्री होऊन चुकली आहे. त्यास शस्त्रास्त्रांत प्रविण केल्या पासूनच पराक्रम घालवून देतां येईल. साम्राज्याचे रक्षणासाठीं जितके शूर वीर तयार करितां येतील तितके पाहिजेच आहेत. लोकांकडून ही कामगिरी चांगली बजावली जाईल, आणि हिंदुस्थानांतील लोकांच्या अंगांतल्या गुणाचें चीज असेंच करून घेतलें पाहिजे. लोकांना शस्त्रें वापरण्यास परवानगी दिली पाहिजे. त्यास लढवय्ये व शूर शिपाई बनविलें पाहिजे. हिंदुस्थानचे लोक रणांगणांत शत्रू पुढें उभे ठाकतील तर इंग्रजी राज्यांत विलक्षण जोर उत्पन्न होईल, व इंग्रजी साम्राज्यास कोणीहि शत्रू उरणार नाहीं. ही गोष्ट अत्यंत म[illegible]ची आहे व ही वेळेवर लक्ष्यात घेतली नाहीं [illegible] प्रसंग विशेषीं साम्राज्यास मोठाच [illegible] धोका नको.

ता० ९।६।०३
(आमच्या [illegible]त्राकडून)

मि. [illegible]दशी नामें एटिंग ए० अ० [illegible] आहे. [illegible] वर्गाच्या माजिस्ट्रे[illegible]ला आणि रा० रा० [illegible] आफिशिएटिंग ए० अ० क[illegible] पहिल्या वर्गाच्या माजिस्ट्रेटी[illegible] देण्याविषयीं शिफारस झाली आहे.

श्री माणिक प्रभू प्रासादिक संगीत ना[illegible] मंडळी येथें आली असून तिचे तीन खेळ [illegible]

खनिज द्रव्येंहि विपुल आहेत. या जिल्ह्याच्या शेतीकडे लोक पुष्कळच धांव मारतात परंतु तिकडील खनिज संपत्तीकडे [illegible] कांही दृष्टी अजून वळलीच नाहीं कापसाचें पीक फार चांगलें होतें; आणि [illegible] मानाने या जिल्ह्यांत अलिकडे [illegible]नताचे कारखाने पुष्कळच झाले आहे हे जिनाचे कारखाने ठिकठिकाणीं आहेत. कांहीं कांहीं ठिकाणीं गठ्ठे बांधण्याचे कारखाने आहेत. एकंदरीत या जिल्ह्याला महत्व अलिकडे [illegible] आलें असून इकडील जमीन [illegible] तुकड्या इतकी दुर्मिळ व महाग आहे.

या जिल्ह्यांतील लोकांस गोधनाची आवड विशेष दिसते. जनावरें चारण्याच्या सोयी पुष्कळ आहेत. स्वल्प खर्चानें गाई ह्मशी पाळतां येतात. इकडे गोधनाची संपदा मोठी खरी पण पाणीदार, मजबूत व दर्शनीय बैल फार थोडे. व तसेंच पुष्कळ दूध देणाऱ्या गाईह्मशी देखील आकोला जिल्ह्या प्रमाणें आढळणार नाहींत.

या जिल्ह्यांतील समाजाचे मुख्य वर्ग दोनच पडतील. एक वर्ग श्रीमान धनिक लोकांचा तर दुसरा वर्ग गरीब लोकांचा. इकडे मध्यम प्रतीच्या लोकांचा वर्ग बहुत करून नाहींच ह्मटलें तरी चालेल. येथें गांवोगांव फिरून पहा ह्मणजे आढळेल कीं कांहीं चार पांच लोकच ढळक व सधन असतात व बाकीचा जनसमूह काबाड कष्ट करणारा, मोलमजुरी करणारा व अत्यंत गरीब असा आहे. जे श्रीमान आहेत ते जमिनीवर अलिकडे उत्तम सावरले आहेत; पण असे श्रीमान प्रत्येक गांवाला हाताच्या बोटावर मोजणारे आहेत, हेच लोक बहुतक जमिनीचे मालक असतात आणि प्रत्येकाजवळ शंभर शंभर दोनदोनशे तिफणी जमीन असते. यामुळें प्रत्येक गांवाला असामींची खातीं फार थोडीं असतात. वहितदार कुळांची संख्या फार थोडी पण ते सर्वगुण चांगले संपन्न आहेत. वणी जिल्ह्यांत एका हजार आठशें वस्तीच्या गांवांत दोनच असामी वहितदार कुळें होती असें आमच्या पाहण्यांत आलें. यामुळें या भागांत सारा वसूल करण्याचे फारसे परिश्रम पाटील पटवाऱ्याला पडत नाहींत. आकोला जिल्ह्यांतील कोणताही गांव पहा त्या गांवाला सरकारी नंबर १०० असले तर वहितदार कुळें ९०।९५ आढळतील. या प्रमाणें आकोल्या सारख्या जिल्ह्यांत जसा मध्यम प्रतीच्या लोकांचा वर्ग मोठा आहे तसा वणी जिल्ह्यात मध्यम प्रतीच्या लोकांचा वर्ग दिसून पडत नाहीं. हा मध्यम प्रतीच्या लोकांचा वर्ग ह्मणजे समाजाचा मुख्य उत्कृष्ट भाग होय असें आह्मी समजतों. मध्यम प्रतीच्या लोकांमध्यें सद्गुण जितके चांगले वाढूं शकतात तितके श्रेष्ठ अगर अगदीं खालच्या वर्गांत वाढूं शकत नाहींत. हा मध्यम वर्ग सुखी तर सर्व [illegible] सुखी असें आह्मी समजतों. अलीकडे [illegible] इंग्रजी सुधारणा झाली आहे [illegible] बहुतेक सर्व गोष्टी ह्या मध्यम [illegible] कारणीभूत दिसतात. [illegible] लोकांचा ओघ असा दिसतो [illegible]त ते अधिक धनवान होत

The public c[illegible] the most poignant [illegible] it is stifled in the most unsatisfactory manner in which the above event is some how hushed up. The general lot of people demands a public inquiry into the matter and will not remain silent until the whole case is reported with all the necessary details. It will not do to remark that the sudden death was a pure matter of accident and we think that the matter should not end here in this hap-hazard fashion. His Excellency the Viceroy has issued very recently a resolution which necessitates a thorough inquiry into such matters of accidents in which Natives lose lives simply for the rash and negligent acts of a sportive soldier. We admit that no body is to blame if an accident

persons to whom permission [illegible] already granted, which were shown on the occasion by the experienced and well meaning officers like Mr. Elliot and Kumar Saheb, that the above unjust order was withdrawn and the huts were allowed to remain intact on the occasion. But we are sorry to hear that a fresh attempt has been under contemplation at present for moving the authorities to remove the huts. It is said that the authorities are this time, going to be moved to take up the fields in question under the Land Acquisition Act. We fai to guess what public puopose is going to be served by removing the huts in question, beyond giving an

आहेत व जे गरीब आहेत ते अधिकच गरीब होत चालले आहेत, आणि मध्यम वर्गापैकीं कांहीं थोडे लोक श्रेष्ठतेला पोहों- चले आहेत तेवढे खेरीज करून बाकींच्या लोकांचा उत्तरोत्तर ऱ्हासच होत चालला आहे. ही ऱ्हासाची गोष्ट कितीहि खरी असली तरी अजून आकोल्या कडील भागांत हा मध्यम वर्ग फार मोठा आहे. वणीकडे हा वर्ग बहुतेक नाहींच आणि त्यामुळें तिक- डील समाजाची स्थिती असावी तितकी चांगली नाहीं.

यवतमाळचे हल्लींचे दिपुटी कमिशनर मे० निजामुद्दीन साहेब हें आपलें काम फार चोख करीत असतात. यांची स्वारी भोपाळ संस्थानाकडे जाण्याची होती पण सध्यां तो बेत रहितच दिसतो. मेहेरबान साहेब हे इकडील प्रांतांत चांगले ओळखीचे आहेत. यांच्या कारभाराचें वळण अगदीं पृथक आहे. रयतेच्या सुखाकडे हे फार लक्ष देतात, यांची टापटीप मोठी आहे पण त्या मानानें ह्यांना कामाचा उरक कमी दिसतो. सरबराईच्या संबंधानें ह्यांनीं एक उत्कृष्ट हुकूम फर्माविला आहे. त्याचें मुख्य तत्व असें कीं अगोदर 'दाम आणि मग काम' ह्यामुळें लोकांनां सरबराईची त्रास फार होत नाहीं.

यवतमाळ गांव मुळचा लहान. येवती खेड्याचा हा मुळचा माळ होय. अलीकडे १०।२० वर्षांत हा एक सुंदरसा टुमदार गाव बनत चालला आहे. गांवाबाहेरील फॅक्टरीच कारखानें यामुळें ह्यास विशेष रमणीयता आली आहे. येथें म्युनसिपालिटी आहे पण तिच्या हातून शहर सफाईचें काम नीटसें होतें असें दिसत नाहीं. पाणवठ्याच्या जागा असाव्या तशा चांगल्या स्वच्छ ठेविल्या जात नाहींत. गांवांतील गटारें व घाणीं यांचा निकाल नीटपणें गांवा बाहेर काढून दिलेला नाहीं.

(पुढें चालूं)

# The Berar Samachar

MONDAY JUNE 15 1903

We have referred in our columns to the melancholy event in which a poor peasant met his death at the hands of a shooting party in the Jalgaon Taluk. We thought that the matter will not be dropped altogether and will be fully investigated in the interests of justice and the prestige of the righteous English rule. A soldier fires a gun at a buck whereas the bullet hits a man dead on the spot. The public conscience smarts under the most poignant pain when it is stifled in the most unsatisfactory manner in which the above event is some how hushed up. The general lot of people demands a public inquiry into the matter and will not remain silent until the whole case is reported with all the necessary details. It will not do to remark that the sudden death was a pure matter of accident and we think that the matter should not end here in this hap-hazard fashion. His Excellency the Viceroy has issued very recently a resolution which necessitates a thorough inquiry into such matters of accidents in which Natives lose lives simply for the rash and negligent acts of a sportive soldier. We admit that no body is to blame if an accident happens and costs lives in the long run. But it is to be seen whether a soldier who goes on a shooting excursion in the early hours of a hot sun in may and fires at a buck in a field where men are expected to do their field—work, should not have foreseen such an accident with ordinary diligence and care. In the absence of such a precaution the matter of a fatal accident amounts to a culpable negligence or rashness if nothing further. We do not think that the death which happens within the range of a gun—shot can be treated as a pure accident until we eliminate a good number of provisions in the Penal Code that make it imperative on all persons irrespective of race or creed to take all precautionary measures to avoid such fatalities which are the sure and certain results of an ill—conceived shooting excursion. We are sorry that our popular Deputy Commissioner and the District Superintendent of Police have quietly consigned the shooting accident to oblivion. We do not think that the matter should end here. Let the *innocent* soldier stand his trial before a judicial tribunal and the public will then judge of his conduct in the light of the decision which will be passed upon him in the end of a fair and impartial trial. We presume that all this must be done in the name of the British justice. and an acquittal also will further necessitate some proper provision for the family which has been left without the comfort and the support of the deceased. We do not know if any such steps have been taken in a manner to make some amends for the losses which the bereaved family suffers on account of this fatal accident. We have tried to express the public sentiments in this connection and we think that they should be properly respected as far as possible.

—:0:—

Our readers have probably not forgotten as yet the agitation that was caused among the Marwari and Mahomedan public here, a few months ago, owing to an order promulgated by the Deputy Commissioner of this district, for removing the huts that were erected in the fields by the side of the Sioni Road, including those on lands for which building fines were paid as required by Sec. 63 (c) of the Land Revenue Code. It is said that the above order was issued at the instance of a few countrymen of Mr. Chemberlain *i, e.* Residents in the Civil Station, a few whose tender eyes cannot bear the sight of an Undesirable a viz a well to-do native in the vicinity of the Civil Station. But thanks to the good sense and the spirit of doing justice by the persons to whom permission was already granted, which were shown on the occasion by the experienced and well meaning officers like Mr. Elliot and Kumar Saheb, that the above unjust order was withdrawn and the huts were allowed to remain intact on the occasion. But we are sorry to hear that a fresh attempt has been under contemplation at present for moving the authorities to remove the huts. It is said that the authorities are this time, going to be moved to take up the fields in question under the Land Acquisition Act. We fai to guess what public purpose is going to be served by removing the huts in question, beyond giving an inner sense of satisfaction to a microscopic number of residents in the Civil Station, by the sight of the dismantled huts. But we make bold to say that it requires a special pleading to consider this purpose a public one. Besides it will, we humbly submit, be more than counter-balanced by a heavier weigh on the other side, consisting of a breach of promise on the part of the Government together with the unnecessary ill feeling which is likely to result from the course that is proposed to be taken. But we are confident that the officers who showed good sense on the last occasion, are succeeded at present by officers who are in no way inferior to the formerse in that respect viz the officers likt Messrs Hare and Rustomji in whose hands the destinies of this town have been hanging at present. We hope that these experienced and well meaning officers will not give an undue weight to the clamours of a few busy bodies from the Civl Station, At least they will not decide the matter *ex-parte*, without giving a due hearing to the occupants of the fields, whose interests are at stake owing to the step that is under contemplation. It is a well known fact that the native town here is over crowded and it is therefore a matter for congratulation that the orthodox, wealthy merchants in Akola like the occupants of the fields above referred to, are thinking of moving out. The Government should therefore not discourage people from moving out in times of plague—which according to the recent *Fatwa* of the medical profession, is the best preventive against plague. The Government may however ensure a better observance of the laws of Hygiene on the parts of the occupants of houses on the Sioni *Road*, in the interests of the Civil Station as well as the above persons, but should on no account break their faith with them—which is fraught with moral danger on every side.

## वऱ्हाडवृत्त.

हवामान— मृग नक्षत्राचे दोन चरण होत आले पण अद्याप पाऊस नाहीं. मध्यंतरी रोहिणी नक्षत्रांत पावसाची झोड शी दर्शनीं झाली तिच्या वरून पर्जन्य काळाला प्रारंभ लौकर होईल असें वाटलें होतें, हल्लीं उन्हाळा सक्त आहे. मधून मधून वारा सोसाट्याचा सुटतो, व विजा चमकतात, गरमी विशेष होते इत्यादि गोष्टी भावी पर्जन्याचीं सुचिन्हें होत, शेतीच्या कामाकडे लोक अगदीं गर्क आहेत.

गेल्या आठवड्यांत येथें सेशन कचेरी भरली होती. एक भिल्ल पुष्कळशा गुन्ह्यांत सांपडला होता त्यास १० वर्षांची शिक्षा झाली. वाशीम जिल्ह्यांतील एका बाईनें हरामाचें मूल टाकून दिलें व त्यामुळें तें मेलें असा तिजवर आरोप होता.

मि. सैफुद्दिनखान लालखान आफिशिएटिंग ए० अ. क. उमरावती यास पहिल्या वर्गाच्या माजिस्ट्रेटीचा अधिकार देण्यात आला आणि रा० रा० रामराव बापूजी पतकी आफिशिएटिंग ए० अ० क० यवतमाळ यांस पहिल्या वर्गाच्या माजिस्ट्रेटीचा अधिकार देण्याविषयीं शिफारस झाली आहे.

श्री माणिक प्रभू प्रासादिक संगीत नाटक मंडळी येथें आली असून तिचे तीन खेळ येथें झाले. परवां रात्रीं 'नलसिंहतारा' या नाटकाचा प्रयोग करून दाखविला. या मंडळीला हल्लीं लोकाश्रय चांगला मिळत असून या कंपनीच्या हस्तक पत्रकार रा० रा० विष्णु मोरेश्वर महाजनी व रा० रा० दत्तात्रय कृष्ण कोल्हटकर डाक्टर यांनीं आपल्या सह्या मुद्दाम दिल्या आहेत.

## आकोला बाजारभाव

| | |
|---|---|
| हुंडी दर्शनी | १००॥ |
| सोनें २४॥= | चांदी ६९ |
| जवारी ४९।९० | जवस १०४ |
| गहू ४॥। ९। | ९९ ते १०० |
| बाजरी | ९९ |
| मीठ | ३॥।= रु. मण |
| चणे | ३॥– रु. मण |
| तूप | ७॥।= रु. मण |
| तेल | ६।– रु. मण |
| रुई | ९०।९४ |

## जाहीर नोटीस.

पूर्वीं पंढरपुरीं प्लेग असल्यामुळें गेल्या माघी व चैत्री यात्रा सरकारी हुकुमानें बंद करण्यांत आल्या होत्या. आतां ईश कृपेनें प्लेग शहरांतून अगदीं नाहींसा झाला आहे. व गांव पूर्ववत् भरला आहे. करितां येत्या आषाढी यात्रेस यात्रेकरूंनीं येण्यास कोणतेंही प्रकारची हरकत किंवा अडचण नाहीं. सर्वांत कळावें. तारीख ११ जून सन १९०३ इसवी.

S. B. Sardesai

सेक्रेटरी म्युनसिपाल कमेटी पंढरपूर.

## वर्तमानसार

भयंकर खून— युरोपांतील टर्कीच्या उत्तरेला सर्व्हिआ संस्थान आहे तेथील राजा अलेक्झांडर, त्याची पत्नी, इतर आप्त, चार प्रधान, इत्यादिकांचा गेल्या बुधवारीं मध्य रात्रीं लष्करी लोकांनीं खून केला, युरोपच्या इतिहासांत ही फारच भयंकर गोष्ट घडली.

मोठें वर्तमान पत्र— अमेरिकेंतील 'न्यूयॉर्क वर्ल्ड' नांवाचें पत्र जगांत अत्यंत मोठें आहे. त्याच्या रोजच्या जाहीरातीच ६७० कालमच्या असतात. आपल्या २९ व्या वाढदिवसा निमित्त हें पत्र एक स्पेशल अंक काढणार असून त्याची बारीक टाइपाची १४० पानें होतील.

अभिनंदनीय विवाह— नागपूरचे प्रसिद्ध न्यायाधीश व सुधारक रा० रा० वामन महादेव कोल्हटकर यांस पुनर्विवाहाच्या स्त्री पासून ज्या अपत्यें झालीं आहेत त्यापैकीं वडील मुलगी कुमारी आवडी इचा विवाह पुण्यास गेल्या सोमवारीं मोठ्या समारंभानें झाला. रा. रा. हरी गणेश बापुरे इंडियन सिव्हील सरव्हंट यांस वर योजिले होते रावश्री बापुरे यांनीं मानसिक धैर्य उत्कृष्ट दाखविलें रावश्री कोल्हटकर यांच्या १७।१८ वर्षांच्या प्रौढ मुलीस वर उत्तम मिळाला. लग्नाचा सोहळा फार टोलेजंग झाला. अक्षतीच्या प्रसंगीं देवालयांचीं द्वारें मुद्दाम बंद केल्या मुळें अक्षत दरवाजावरच ठेविली.

### पृथ्वीच्या उदरांतील जागतें शहर.

आस्ट्रियाच्या ताब्यांत असणाऱ्या पोलंडच्या प्रदेशांत "मीठ खाणीचें शहर" म्हणून एक शहर आहे. हें पृथ्वीच्या उदरांत शेंकडों फूट खोलीवर आहे. यांत सुमारें एक हजार माणसांची वस्ती आहे. या लोकांपैकीं कित्येक लोकांनीं जन्मापासून सूर्यदर्शन केलेलें नाहीं किंवा सूर्यप्रकाशाचें त्यांस दर्शन नाहीं. या लोकांचें एक नाटकगृह आहे, एक पुस्तकालय आहे, सभागृह आहे. परंतु जन्मापासून मरेपर्यंत कृत्रिम उजेडानें सर्व व्यवहार चालवावयाचे! येथील रस्ते चांगले लांब रुंद आहेत, मोठमोठाले चौक आहेत आणि जिकडे तिकडे दिव्यांच्या दिव्यांची व्यवस्था आहे. कित्येक माणसांच्या चार चार पिढ्यांत कोणी सूर्यदर्शन केलेलें नाहीं. सूर्यप्रकाशानें लोक कसे राहतात याची कल्पनाच त्यांस होणें शक्य नाहीं.

### पाण्यांत पाहण्याची दुर्बिण

एक धातूचें अगर लांकडाचें नळकांडें घेऊन त्याच्या एका बाजूस एक साधी कांच आंत पाणी न शिरे अशी बसवावी. ही कांच चांगली जाड व स्वच्छ असली म्हणजे झालें. नंतर जिकडून तोंड खुलें असेल त्या बाजूनें पाण्यांत ही दुर्बिण घालून आंत पहावें. कितीं खोलीपर्यंत तरी अगदीं स्वच्छ दिसतें. यामुळेंच यास पाणदुर्बिण म्हणतात. पाणी हें पारदर्शक नाहीं असें वाटतें, याचें कारण पाण्यावर उठणारे तरंग होत. या तरंगांत त्यांतून येणाऱ्या प्रकाशकिरणांचा अगदीं भंग होतो, आणि त्यामुळें तो प्रकाश वरपर्यंत येत नाहीं. या दुर्बिणीच्या नळकांड्यांत जें पाणी येतें त्यांत कांहीं तरंग उठत नाहींत आणि वरून पाहण्याची कांच असतें तीही अगदीं गुळगुळीत असते यामुळें पाण्यांतला तळचा प्रकाश अगदीं स्वच्छ दिसतो. या नळकांड्याची कांच चांगली रुंद असल्यानें दोन्ही डोळ्यांनीं पाहण्यास सांपडतें नळकांड्याची लांबी ४।५ फूट असावी.

### जशास तसें

दोघां स्नेह्यांचें भांडण झालें. त्यांत अखेरीस कोणी कोणाशीं अतःपर बोलूं नये असें ठरलें. थोडे दिवसांनीं तो राग ओसरून त्यांतून एकास वाटलें कीं, आपण आतां कांहीं तरी विनोद करून दुसऱ्याशीं बोलणें सुरू करावें. असा विचार करून त्यानें एका कागदावर "मी खुशाल आहें." एवढेंच लिहून सही न करतां नादपेड पत्र पाठवून दिलें. त्या गृहस्थानें तें पैसे भरून घेतलें व वाचून पाहिलें, तों तें कोणीं पाठविलें तें समजलें. याबद्दल जशास तसेंच बक्षीस पाहिजे असा विचार करून कांहीं दिवस थांबला व मग एक दिवस त्यानें एक चार पांच शेर वजनाचा धोंडा लहानशा खोक्यांत घालून तो रेल्वेनें एक स्टेशन जाऊन तेथून आपल्या मित्राच्या नांवें रेल्वे पार्सलनें अनोड पाठवून दिला. तो या गृहस्थाकडे येतांच कोणी तरी कांहीं तरी नजर पाठविली आहे, असें समजून हांशील भरून घेतला. आणि पेटी फोडून पहातो, तों आंत मला थोरला धोंडा असून त्या बरोबर एक चिठी होती. तींत लिहिलें होतें "आपण खुशाल आहांत हें कळल्यानें माझ्या छातीवरील केवढा काळजीचा धोंडा उचलला गेला हें आपणास कळवावें, म्हणून हा पाठविला आहे."

**विलक्षण शोध**— हल्लीं अमेरिकेंत कांहीं चोरांनीं एक प्रकारचें विलक्षण रसायन तयार केलें आहे. तें म्याग्नेशियाच्या भुकटींत मिसळून लोखंडावर लावलें असतां ५ मिनिटें तसलें कठीण लोखंड अगदीं मऊ होऊन जातें. यामुळें चोरांना मोठमोठ्या मजबूत तिजोरीच्या पेट्या बिनबोभाट फोडतां येतात. त्याचप्रमाणें दुसरी एक विलक्षण युक्ती चोरांनीं शोधून काढली आहे, ती ही कीं, एका इंडिया रबरच्या नळींतून ऑक्सिहायड्रोजनची ज्वाला कोणत्याही कठीण धातूवर लाविली असतां इतकी उष्णता उत्पन्न होते कीं या योगें ती धातू वितळून जाते. याच रीतीनें कांहीं चोरांनीं थोड्या महिन्यापूर्वीं लंडन मधील एका पोष्ट ऑफिसातील तिजोरीची पेटी फोडली होती.

**आंगठ्या वरुन बुद्धीची परीक्षा**— किसमेट नांवाच्या एका सामुद्रिक शास्त्रज्ञानें असें प्रसिद्ध केलें आहे कीं मनुष्याचें मानसिक दौर्बल्य तो निजला असतां त्याच्या हाताच्या आंगठ्यावरून कळून येतें, ह्यास प्रमाण असें दाखविण्यांत आलें आहे कीं, नुकत्या जन्मलेल्या तान्ह्या मुलांचे आंगठे तीं निजलीं असतां हाताच्या चारी बोटांच्या खालीं वळलेले असतात. परंतु जसजशी त्यांस बुद्धि प्राप्त होते तसतसे त्यांचे आंगठे बोटांच्या बाहेर पडूं लागतात. माकड, वानर वगैरेंची स्थिती याच प्रकारची असते. मनुष्याप्रमाणें या जनावरांस दैविक बुद्धि नसल्यानें त्यांच्या हातांचे आंगठे नेहमी बोटांच्या आंत वळलेले असतात. त्याप्रमाणें बुद्धिहीन वेडगळ वगैरे लोकांचे आंगठे ते निजले असतां कमजास्त प्रमाणानें बोटांच्या आंत वळलेले असतात. परंतु जो कुशाग्रबुद्धीचा मनुष्य असतो त्याचे आंगठे झोपेंत नेहमीं बाहेरील अंगास असतात.

**मत**— अंग्लो इंडियन रिव्ह्यु पत्रानें असें प्रसिद्ध केले आहे कीं, हिंदुस्थानांत व्हाईसरायच्या जागीं राजघराण्यांतील पुरुष असणें व देशी संस्थानिकांचा हौस ऑफ लॉर्ड्स मध्यें प्रवेश होणें या दोन गोष्टी हिंदुस्थानास अत्यंत जरूरीच्या आहेत.

**चोराचें व्याख्यानः**— चोरी करणें सर्वांत उत्तम असें मी म्हणत नाहीं, पण गुलामगिरीपेक्षां चोरीचा मार्ग बरा.

**कोमल अंतःकरणः**— दुःखानें चटकन् घायाळ होतें, हें खरें. पण लागलीच सद्विचारांनीं त्याला आनंद प्राप्त होतो.

**संतोषाचा जोडाः**— संतोषाचा जोडा पायांत घालून जन्मापासून मरेपर्यंत कोणी कडेही भटकलें तरी दुःखाचा कांटा चुकून सुद्धां पायाला बोंचणार नाहीं.

**लोकांच्या पैशानें रेल्वे**— मद्रासपकीं मदुरा, त्रिचनापल्ली, सालेम, किसना कर्नूल आणि कोइंबतूर येथील लोकल बोर्डांनीं रेल्वेच्या कामीं लावण्या करितां एक विशेष कर घेण्याचें ठरविलें आहे. हिंदुस्थान सरकारानें अशी सल्ला दिली आहे कीं, या बोर्डांनीं या कराच्या ग्यारंटीवर कर्ज काढून रेल्वेचें काम करावें याबद्दल सरकारांतून सर्व प्रकारची मदत मिळणार आहे.

**खरे समाज हितेच्छु**— मद्रास इलाख्यांतील बेजवाडा शहरीं नुकतीच एक सामाजिक परिषद झाली त्यावेळीं एक समाजहितेच्छु गृहस्थानें गंतूर येथें एक विधवागृह बांधण्यासाठीं १२ एकर जमीन व २००० रुपये रोख व दुसऱ्या एका गृहस्थानें आपल्या विद्याचे तीन हजार रुपये दिल्याचें समजतें.

**वा रे सूचना**— धोबी लोक कपडे धुण्याकरितां घेऊन जातात ते परत आणून देण्यास फार उशीर करितात व हे कपडे ते वापरतात, तरी या संबंधांत सरकारानें कायदा करावा अशी सूचना मद्रास स्टँडर्ड पत्रांत एका गृहस्थानें केली आहे.

**कारस्थानी लालूच**— अफगाणिस्थानांतील कांहीं भागांत दुष्काळ पडला आहे म्हणून तेथील लोकांना रशिया फुकट अन्न वांटीत आहे अशी एक बातमी प्रसिद्ध झाली आहे. आपल्या भावी प्रजेला युरोपियन राजे अशीच लालूच दाखवीत असतात.

**चमत्कारिक झाड**— बंगाल्यांतील बेशाचक नांवाच्या गांवीं शेख शाकी नांवाच्या इसमाच्या मालकीचें एक खजुरीचें झाड तळ्याचे कांठीं आहे. त्यामध्यें असा विलक्षण धर्म आहे कीं, तें पहाट झाली कीं हळूहळू वांकावयास लागून त्याचीं पानें पाण्यास स्पर्श करी पर्यंत वांकतें; पण पुढें दुपारी ३ वाजले कीं पुनः पहिल्या सारखें ताठ उभें रहावयास लागतें, असें 'मेदिनी बांधव' हें बंगाली पत्र म्हणतें.

**नवीन अनुभव**— ईथर व क्लोरोफार्म ह्या द्रव्यांनीं मनुष्य बेशुद्ध होतो, पण हींच द्रव्यें झाडाचे खोडांत घातलीं असतां त्यांची वाढ वेगानें होऊन त्यांस फळेंफुलें लवकर येतात, असा युरोपांत अनुभव आला आहे.

**नवीन धातू**— अल्युमिनम सारखी युरोपांत 'मिटिओरटे' नांवाची धातू सांपडली असून ती अल्युमिनम पेक्षां जड आहे. तींमध्यें कोणताही पदार्थ वगैरे कळकत नाहीं व त्यांजवर रसायन द्रव्यांचाही परिणाम होत नाहीं इतकें असून त्याची किंमत पितळे इतकीच आहे.

**अंडें वर्षभर टिकतें**— कोंबडीचें अंडें सिलिकेट ऑफ सोडामध्यें बुडवून ठेवलें म्हणजे तें वर्षभर टिकतें आणि नंतर हें अंडें पुनः उबविलें असतां तें फुटून त्यांतून बाहेर येणारें पिलूं इतरांपेक्षा सशक्त व गांजिरवाणें असतें, असें 'लॅसेट' पत्र म्हणतें.

**प्रशंसनीय गोष्ट**— त्रावणकोरचे महाराज दिल्ली दरबाराहून सुखरूप परत आले, त्याचें स्मारक म्हणून नागरकाइल येथें एक टेक्निकल स्कूल स्थापण्यांत आलें, या कामीं महाराजांचें लक्ष विशेष आहे. त्यांनीं ह्या विषयावर नवा शोध— निबंध— लिहिणारास प्रत्येक सालीं १०० ची स्कॉलरशिप ठेविली आहे. तसेंच, असली शाळा कोणी खासगी स्थापन केल्यास, तिच्या खर्चाचा ३/४ भाग सोसण्यास दरबार तयार आहे.

**वारस ठरला**— सांगली संस्थानच्या गादीवर वंशपरंपरेनें ज्यांचा सर्वांहून अधिक हक्क पोंचतो व ज्यांची सांगलीच्या गादीवर स्थापना व्हावी अशी सर्वांची इच्छा, म्हणजे श्रीमंत अप्पा साहेब यांच्या दत्तक नातवाच्या दोन पणतवांपैकीं थोरले श्रीमंत भाऊ साहेब यांची सांगलीचे गादीवर सरकाराकडून योजना करण्यांत आली आहे. व याचा महोत्सवही लवकरच होईल.

**श्रातारपणाचा अनुभव**— शरीर म्हातारें झालें तरी मन म्हातारें होत नाहीं, उपयोगाचीं साधनें नाहींशीं होतात, पण उपभोगाचा लोभ सुटत नाहीं. वय परत्वें आचार विचारांत बदल न केल्यानें म्हातारपण हें फार दुःखदायक वाटतें.

**अवाढव्य स्टेशन**— अमेरिकेंत न्युयार्क मध्यें १० कोटी रुपये खर्चून एक अवाढव्य रेल्वे स्टेशन बांधणार असें म्हणतात. ह्यांत नाटकगृह, वाचनालय, संग्रहालय, सर्कस, हाटेल, नाचावयाचा हॉल, तालिमखाना इत्यादि अनेक ऐष आरामाच्या साधनांचा समावेश व्हावयाचा आहे.

**दिर्घायुषी ब्रह्मचारी**— अमदाबाद येथें सुखानंद भगीरथ नांवाचे एक ब्रह्मचारी नुकतेच स्वर्गवासी झाले. त्यांचें वय ११९ वर्षांचें होतें व त्यांची शरीरसंपत्ती एखाद्या तरुण तालीमबाजा सारखी होती असें म्हणतात.

**चमत्कारिक बर्फ**— पेन्सिलवानियांतील बक्लर गांवीं चमत्कारिक प्रकारचें बर्फ पडलें. आधीं पांढरें शुभ्र बर्फ पडून पुढें तें हळूहळू गुलाबी होत गेलें व शेवटीं त्याचा रंग रक्तासारखा लाल झाला. ह्या तांबड्या बर्फाचा दोन इंच जाडीचा थर पडला होता, असें हिंदूवरून कळतें.

**मोठा हिरा**— सन १८९१ सालीं जागर्सफाँटेन येथील हिऱ्याच्या खाणींत एक मोठा हिरा सांपडला असून त्याचें नाव 'एक्सेल्सिऑर' असें आहे. त्याचा आकार कोंबडीच्या अंड्या एवढा असून त्याचें वजन ९७० कॅरेट म्हणजे कोहिनूरच्या दुप्पट आहे. ह्या हिऱ्यास पैलू पाडण्यासाठीं एक कंपनी स्थापन झाली असून त्या ठाईं मुद्दाम यंत्रें तयार केलीं आहेत व सुरक्षित राहण्याची तर खूपच खबरदारी घेतली आहे!

**सिकंदर नशीब**— थोड्या दिवसांपूर्वीं लिरवन येथील लॉटरींत लॉटरीचीं तिकिटें विकणाऱ्या एका गरीब मुलास दहा हजार पौंडाचें बक्षीस मिळालें. या मुलाच्या ताब्यांत विक्रीकरितां लॉटरीचीं जितकीं तिकिटें ठेवलीं होतीं तीं सर्व न खपल्या बद्दल त्याचा बाप त्यावर संतापून त्यास मार देत होता इतक्यांत त्यास वरील बक्षीस मिळाल्याची बातमी येऊन पोंचली. याचें नांव नशीब.

REGISTERED, N. No. 4

आकोल्यातील लोकांस..................१ ८.
बाहेरगांवीं टपालहाशिलांसह ........ २ ८
वर्गणी आगाऊच दिली पाहिजे.
किरकोळ अंक...........................८२
नोटिशी बद्दल
१० ओळीचे आंत ८० १
दर ओळीस........८१ ०१
दुसरे खेपेस.... ......८१

Mofussil ... ... ... 2 ( with postage
All Subscriptions to be paid in advance.
Single copy ...................... 2 as
Advertisement
below 10 lines ...... 2 Rs
Per line over 10 ......8 as
Repetition Per line ...2 as

# वऱ्हाडसमाचार.

## THE BERAR SAMACHAR

VOL XXXVII AKOLA MONDAY 22 JUNE 1903 NO 24

वर्ष ३७ आकोला सोमवार तारीख २२ माहे जून सन १९०३ इ० अंक २४

### नोटीस

बेशमी चिरंजीव राजश्री त्रिंबक विठ्ठल जोशी राहणार माटरगांव तालुका खामगांव यांस.

खाली सही करणार याजकडून नोटीस देण्यांत येते कीं तुह्मी लहान असतांना तुमच्या तर्फे मुखत्यार ह्मणून मातोश्री रुखमाबाई यांनीं वडिलोपार्जित जिनगीतील माझ्या हिश्याबद्दलचा निकाल करून टाकला आणि तुमचा हिस्सा अलग करून स्वतः जवळ ठेऊन घेतला. मी त्या प्रमाणें माझा वाटा मला मिळाल्या बद्दल फारकतही लिहून नोंदून दिली आहे; आणि त्या फारकतीच्या दिवसा पासून तुमच्या हिश्याची वहिवाट आपले मामा तीर्थस्वरूप रा० रा० गंगाराम रामकृष्ण पटवारी हे करीत आले. हिस्से वाटे झाले त्यावेळीं मातोश्रीच्या वाट्याला ह्मणून त्यांच्या अंगावरील दागदागिना व घानोरे येथील शेत अशी इस्टेट वेगळी ठेवण्यांत आली. मातुश्रींनीं खुद्द तें शेत विकून टाकलें आणि त्याची रक्कम सालचंदीनें घ्यावयाची ठरली होती. पुढें मातुश्री मरण पावल्या नंतर सदर्हू दागदागीना व शेताच्या किंमतीची घेण्याची सालचंदीची रक्कम ही इस्टेट मामांच्या सांगण्यावरून तशीच समाईकींत त्यांचेच पाशीं वेगळी अमानत ह्मणून ठेवण्यात आली. माझ्या मनांत यापुढें ती इस्टेट तशी ठेवणें नाहीं तर ही नोटीस पावल्या तारखेपासून एक महिन्याच्या आंत तुह्मी दिवस मुकर करून मामाच्या सल्यानें मातोश्रीच्या वाट्याच्या जिनगीची वाटणी करून टाकावी आणि माझा हिस्सा मला देण्यात यावा. यापुढें मामांच्याकडे अमानत जिनगी राहूं देण्याची माझी इच्छा नाहीं. मातोश्रीच्या दागदागिन्याची यादी पूर्वीच झालेली आहे ती यादी मामांच्याकडून बोलावून घ्यावी. मी समक्ष मामाकडे गेलों होतों तव्हां त्यांनीं ती गोष्ट दिरंगाईवर टाकली माझ्या नोटिसी प्रमाणें योग्य व्यवस्था वर लिहिलेल्या मुदतींत न होईल तर कोर्ट मार्फत सर दाद खर्चासुद्धां तुह्मा विरुद्ध व मामा विरुद्ध मागण्यात येईल. कळावें ता. १८ जून १९०३ इसवी.

सही
भिकाजी विठ्ठल जोशी
दस्तुर खुद्द.

### नोटीस

नोटीस बेशमी— रावजी वलद माधोजी टाकरे राहणार शेलवाडी तालुके मूर्तिजापूर जिल्हे उमरावती पोस्ट मूर्तिजापूर यांस खालीं सही करणार याजकडून नोटीस देण्यांत येते कीं आज सुमारें १२ महिनें झाले त्यावेळीं माझे हिश्याची अदमासे २३।२४ तिफणची जमीन मला दिली बाकी राहिलेली जमीन व वडिलोपार्जीत इस्टेट टीचा तिसरा हिस्सा व बैल, ढोर, बकऱ्या। ह्मशी व देणें घेण्याचा पैसा वगैरे बद्दलचा सर्व तिसरा हिस्सा आज देतों उद्या देतो ह्मणून चाळविता चाळविता बारा महिने झाले अजून पर्यंत हिस्सा दिला नाहीं तर ही नोटीस पावल्या पासून ८ दिवसांचे आंत माझा हिस्सा मला द्यावा नाहीं तर सरकारी कायद्या प्रमाणें कोर्टांत फिर्याद करून खर्चासुद्धां हिस्सा घेतला जाईल जाईल व नोटिशीचा खर्चासुद्धां सर्व खर्च तुह्मांस द्यावा लागेल कळावें. ता० १६ ६।०३ इ

सही
रामजी वलद माधोजी कुणबी पाटील
तर्फे मुखत्यार रायभान वा रामजी
टाकेर राहणार सेलवाडी
दस्तुर खुद्द.

### नोटीस

बेशमी— शेट जसराज श्रीराम राहणार खामगांव यांसः —

खालीं सही करणार या नोटिशीनें असें कळवितों कीं खामगांव येथील जीन फयाक्टरीचे उत्तरेस जी खुली जागा आहे. त्यापैकीं एक हिस्सा आमचे मालकीचा असून बाकीचे हिस्से आमचेकडे भाड्यानें आहेत. त्याचें भाडे सालोसाल आह्मी तुह्मांस देत आहों. त्या सहा हिश्या पैकीं एक हिस्सा रा० खेतसीदास शिवलाल चांडक राहणार खामगांव यांचे मालकीचा असून त्यांनीं आह्मांस विकला आहे. करितां तुमचा आगर दुसरे कोणाचा सदर्हू इसमाचे हिश्यावर हक्क असेल तर ही नोटीस पावल्या पासून १५ दिवसाचे आंत आपला हक्क आह्मांस शाबीत करून दाखवावा. तसे तुमचे कडून आगर दुसरे कोणाकडून न झाल्यास आह्मी सारखे नंतर आह्मी त्या जागेचे योग्य रीतीनें खरेदीखत सदर्हू इसमापासून करून घेऊन ते पक्कें करून घेऊं. व मग कोणाचा ही हक्क राहणार नाहीं. व तक्रार ऐकिली जाणार नाहीं. ह्मणून ही नोटीस लिहून दिली असे. कळवे. तारीख २० जून १९०३ इ०

सही
मुल्ला हाजी इसुफ आली शेख जाफरजी जिनिंग फ्याक्टरीचे मालक
खामगांव.

### जाहिरात

बेशमी महादेव वलद रामरतन मारवाडी राहणार भोंगार तालुका नारनोळ जिल्हा दिल्ली आणि सर्वत्र लोकांस या लेखानें जाहिर करण्यांत येतें कीं सदर्हू महादेव मारवाडी यानें माझें हातरुण येथील दुकान एक वर्षाच्या करारानें भाड्यानें तारीख १९।६।०२ रोजीं घेतलें. कांहीं दिवस दुकानदारी चालवून सदर्हू महादेव यानें आपलें दिवाळें काढलें आणि माझ्या दुकानांत कांहीं किरकोळ माल सोडून देऊन दुकानाला कुलुप लावून चालता झाला. या गोष्टीला आज ७ महिन्यांचा काळ लोटला. आमचे दुकानचे भाडें येण्याचा संभव नाहीं. दुकानाला कुलूप असल्यामुळें दुकानची खराबी होत चालली आहे या करितां आह्मी असें जाहीर करितों कीं आज पासून १५ दिवसांचे आंत महादेव मारवाडी अगर त्याचा योग्य मुखत्यार यानें आमचें भाडें चुकतें करून आपला माल घेऊन जावा. असें करण्यास चुकल्यास आह्मी पंचासमक्ष कुलूप तोडून दुकान उघडूं आणि दुकानांतील माल नाशिवंत असल्यामुळें जाहीर रीतीनें लिलांव करून विकून टाकूं व भाड्याचे रकमेपेक्षां विक्रीचा पैसा अधीक आल्यास तो अधीक पैसा बिनवारशी ह्मणून तहशिलदार साहेब तालुके बाळापूर यांचे कचेरींत दाखल करून देऊं. कळावें तारीख १९ माहे जून सन १९०३ इ०

सही
शेख महिबूब वलद महमद हुसेन
राहणार हातरुण निशाणी.

### नोटीस

नोटीस बेशमी मोजदारखा वा नतुखा मुसलमान राहणार अडुल तालुके दर्यापूर यास खालीं सही करणार बिलनखा वा महेबूबखा मुसलमान राहणार अडूल तालुके दर्यापूर याजकडून नोटीस देण्यांत येतें कीं आह्मी तुह्मास आमचे येथील दिवाणीचे व फौजदारीचे अगर मुलकीचे काम करण्या बद्दल मुखत्यारपत्र करून दिले आहे अलीकडे माझें कांहींच काम नसल्यामुळें सुमारे साहा महिन्या खालींच तुह्मास सांगितलें कीं तुमचे नोकरीची आह्मास जरूर नाहीं असें सांगून नोकरी वरून दूर केलें परंतु मुखत्यारपत्र हयगईमुळें रद्द केलें नव्हतें सबब या नोटिसीनें कळवितो कीं तुमचे मुखत्यारपत्र रद्द केले आहे तुह्मी आमचे वतीनें कोणते ही काम करूं नये, तुह्मी तुमचे पाशी माझे जे कांहीं कागदपत्र असतील ते देऊन टाकावे कळावे ता. १७।६।१९०३ इ० दस्तुर गंगाधर विष्णु चितळे.

सही
बिलनखा वा मेहबुबखा दस्तुर खुद्द.

### नोटीस

मेशमी— तुकाराम वलद आनंदा बारी राहणार मांजरी हल्लीं वस्ती बारशी टाकळी यांसः—

मी खालीं सही करणार या लेखानें कळवितों कीं माझी बहीण नामे कोंडी ही तुमची गंधर्वाची बायको आहे. ती आज मजपाशीं ६-७ महिने आहे. तुह्मी आपल्या बहिणीच्या घरीं राहतां आहां, पण तेथें तुमच्या बहिणीच्या हाता खालीं राहून संसार करण्यास कोंडी ही नाराज आहे. तुह्मी आपल्या बहिणीचें घर सोडून दुसरें घर करून राहावें व कोंडीला घेऊन जाऊन आनंदानें संसार करावा. असें होत नसल्यास फारकती द्यावी व कोंडीला मोकळे करावें. ही नोटीस पोचल्या पासून १५ दिवसांत तुह्मी निराळे घरदार करून कोंडीला घेऊन गेला नाहींत तर हीच नोटीस फारकती समजली जाईल. मग तुमचा कांहीं एक हक्क राहणार नाहीं. हीच गोष्ट मी पूर्वी ही तुह्मांस कळविली होती पण ती तुह्मी मनावर घेतली नाहीं सबब ही जाहीर नोटीस दिली आहे. दुसरें मी तिला सहा महिनें पोटास घातलें त्याचा खर्च ३६ रुपये झाला तो तुह्मी आणून द्यावा. हे रुपये न दिल्यास सरकारांत दावा करून सर्व खर्चासह रुपये भरून घेतलें जातील. कळावें तारीख १५ माहे जून सन १९०३ इसवी.

सही
किसन वलद दावल बारी राहणार
बारशी टाकळी. दस्तुर
खुद्द.

### नोटीस

बेशमी— मारुती वलद रामजी म्हाले राहणार वाघुळी तालुके व पोस्ट मलकापूर
यांसः—

खालीं सही करणार ईजकडून नोटीस देण्यांत येते कीं मी तुमची लग्नाची बायको असून आज सहा ६ वर्षें झालीं आपण माझी ने आण करीत नाहीं. सबब मी हा काल पावेतो लोकांचें कर्ज काढून उदरनिर्वाह करित आहे. व आजपर्यंत मला सालीना ४० रुपये प्रमाणें २४० रुपये कर्ज झाले ते देऊन मला घेऊन जावे. ही नोटीस पावल्या पासून ८ आठ दिवसांत वर लिहिले प्रमाणें न केल्यास हीच नोटीस फारकत समजून दुसरा घरठाव करीन मग तुमचा नवरेपणाचा हक्क मजवर राहणार नाहीं खर्च व खावटीचे रुपये कोर्ट मार्फत भरून घेण्यांत येतील कळावें तारीख १७ माहे जून सन १९०३ इसवी.

सही
मुक्ती मर्द मारुती झाली रहाणार देवधाबे
निशाणी, हातची बांगडी.
दस्तुर पिरा शिवराव तेली
मौजे देवधाबे.

## नोटीस

रा. रा. नागोजी व० रावजी रा० हातोल पोस्ट महान ता० आकोला यांस—

खालीं सही करणार याजकडून नोटीस देण्यांत येते कीं तुमचा व आमचा असा ठराव झाला कीं तुमच्यां येथील दोन लग्नांत तासे वगैरे वाजवावे व त्याबद्दल तुम्ही आ-म्हास सहा रुपये व शेला पागोटें द्यावे पैकीं तुम्ही तीन रुपये दिले बाकीचे तीन रुपये व शेला पागोटें द्यायचे राहिले, ते मागितले असतां ते न देतां वाटेल ते करा म्हणून म्हणतां हें तुम्हास योग्य नाहीं. तर ही नोटीस पावतांच आठ दिवसांत राहिलेले ३ रुपये नोटीशीचा खर्च २४८ मिळून ५॥८ पाच रुपये चार आणे व शेला पागोटें व-गैरे आणून द्यावे असें न केल्यास कोर्टांत फिर्याद करून सर्व खर्चासहीत रुपये भरून घेतले जातील. कळावें. ता. २०।६।०३.

(सही) शिद्दी बुढन व. शिद्दी पेकू रा-हणार महान निशाणी खुद्द हातची कल्यार.

---

## विक्रीचा जाहिरनामा.

दिवाणी मुक्कदमा नंबर १९४/१९०२

विद्यमान—विश्वनाथ नारायण दांडेकर साहेब बहादूर सिव्हील जडज्य अकोले यांचे कोर्टीत.

वादी.

श्रीराम शालीग्राम दुकान शेगांव, भागीदार (१) बालकिसनदास शिवलाल (२) फत्तेलाल वल्लद शालीग्राम (३) नारायणदास वल्लद सुंदरलाल. अज्ञान पालन करणार फत्तेलाल वल्लद शालीग्राम, (४) मथुरादास वल्लद राऊतमल वादी नंबर १।२।३।४ तर्फे फत्तेलाल शालीग्राम मुखत्यार नारायण त्रिंबक दुकान शेगांव तालुके खामगांव.

चुनीलाल शिवचंदराय दुकान आकोट, मालक जयदेव वल्लद श्रीणीवास राहणार आकोट आणि (२) चिरंजीवलाल वल्लद महादेव अज्ञान राहाणार शेगांव. जगन्नाथ सुरजमल दुकान तेल्हारे मालक श्रीनारायण जीतमल अज्ञान राहणार तेल्हारे, संती मर्द श्रीणीवास राहणार आकोट आंचीबाई मर्द महादेव राहणार शेगांव व फुली मर्द जीतमल राहणार तेल्हारे.

कसबे शेगांव तालुके खामगांव जिल्हे ग्युमोफीसियल कंपनी लिमिटेड यानीं सदरहू वादी, प्रतिवादीचे भागीदारीतील जीन बांधण्याकारितां जी जागा दिली आहे व त्या संबंधानें त्यांचा जो आपसांत लीस [ पटा ] झालेला आहे त्या लीसचा न्युमोफिसीयल कंपनी लिमिटेड शेगांव याचा हक्क आहे तो राहून सदरहू जीनचा जाहीर लीलाव तारीख १३ माहे जुलई सन १९०३ इसवी रोजीं दिवसा १२ वाजतां शेगांव येथें मिस्तर विष्णु कृष्ण करवे सिसिल्हर यांचे मार्फत केला जाईल सबब सर्वत्र लोकांस जाहीर करण्यांत येते कीं ज्यांची सदरहू फ्याक्टरी जीन विकत घेण्याची इच्छा असेल त्यांनीं सदरहू तारखेस दिवसा १२ वाजतां शेगांव मुक्कामी हजर व्हावें व सदरहू जिनचा हराश

मेहेरबान जुडिसियल कमिशनर साहेब बहादूर मुलुकअमानी हैद्राबाद हे कायम करतील. कळावे, ता. १६।६।०३ इ.

V. N. Dandekar
Civil Judge Akola.

---

## वऱ्हाडसमाचार

मिति जेष्ठ वद्य १२ शके १८२५

---

स्थानिक स्वराज्य आणि सरकारी अधिकारी. ह्या विषयावर अलहाबादच्या पायोनिअर पत्रांत नुकताच एक लेख प्रसिद्ध झाला आहे. तो मनन करण्या सारखा आहे. पायोनिअर हें वर्तमानपत्र नेहमीं सरकारच्या बाजूनें असतें असा सार्वजनिक समज आहे, आणि अशा पत्रांतून जेव्हां म्युनिसिपालिट्या आणि डिस्ट्रिक्ट बोर्डांशीं होत असलेल्या सरकारच्या वर्तनावर बरीच कडकशी टीका केलेली दिसून येत आहे तेव्हां सरकारचें ह्या संस्थांशीं असलेलें वर्तन खरोखरच दूषणाई असलें पाहिजे असें मोठ्या कष्टानें म्हणावें लागतें. आमच्या वऱ्हाड प्रांतांत ही पायोनिअर कर्त्याच्या टीकेस पुष्टी आणणारें असें सरकारचें वर्तन अलिकडे अनेक प्रसंगीं घडून आल्याचें दिसून येत आहे. त्या सर्व प्रसंगाची यादी देऊं म्हटलें तर एकंदर तीन चार लेख लिहावे लागतील. ह्यामुळें आमच्या खेपेस त्यां पैकीं ठळक ठळक अशा एक दोन प्रसंगांची आमच्या वाचकांस आठवण करून देण्याचा आमचा विचार आहे. अकोलें येथील म्युनिसिपालिटीच्या हद्दींत असलेल्या इमारतींच्या जागांच्या वार्षिक भाड्याच्या रकमेवर दर शेकडा ७ रुपये प्रमाणें मालका पासून कर घेण्यांत येतो ह्या गोष्टीस आज सरासरी ३।४ वर्षे होऊन गेलीं. तथापि सदहू हद्दींत असलेल्या सरकारी इमारतीवर व जाग्यांवर कोणत्या दरानें कराची आकारणी करण्यांत यावी ह्या संबंधानें अद्याप निर्णय झाला नाहीं ही मोठी आश्चर्याची गोष्ट आहे! ह्या बाबतींत सरकार व म्युनिसिपालिटी ह्यांजमध्यें अद्याप पत्रव्यवहार चालूं आहे. येथील जिनिंग व प्रेसिंग कारखान्यांतील इमारतींच्या भाड्याची आकारणी वजवी पेक्षां जास्त केली होती ह्या मुद्यावर जरी सदहू कारखान्यांच्या चालकांनीं ज्यु० कमिशनर साहेब यांजकडे अपीलें केलीं होतीं त्या मुद्याचा निकाल लवकरच सदहू कारखान्यांच्या चालकांस प्रतिकूल अशा रीतीनें करण्यांत आला. रयतेच्या अपिलांचा निकाल लावण्यांत जर आमचें सरकार इतकें दक्ष व तत्पर असते तर ज्या प्रकरणांत प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष रीतीनें सरकारचा संबंध पोहोंचतो अशा प्रकरणाचा निकाल लावण्यांतच सरकार कडून दिरंगाई कां व्हावी ह्याबद्दल समाधानकारक उत्तर आम्हांस सुचत नाहीं. रयते मधील तंट्याचा निकाल लावण्यांत सरकारची जी तत्परता व सचोटी दिसून येते त्याच तऱ्हेची तत्परता व सचोटी— व किंबहुना तिजपेक्षां कांकणभर जास्ती, सरकारानें स्वतःच्या कामाची निकाल लावण्यांत दर्शविली पाहिजे. परंतु ह्याच्या उलट प्रकार दृष्टोत्पत्तीस आल्यास सरकारचें वजन कमी होण्याचा संभव आहे व सरकारच्या न्यायी दृष्टी संबंधानें लोकांच्या मनांत संशय उत्पन्न होण्याचा संभव आहे. असो. वऱ्हाडांतील धर्मार्थ दवाखान्यांतून रोग्यांच्या औषध पाण्याप्रीत्यर्थ जो खर्च होतो त्यापैकीं बराच भाग अलीकडे सरकार म्युनिसिपालिट्या व डिस्ट्रिक्ट बोर्ड ह्यांवर लादला आहे हें आमच्या वाचकांच्या स्मरणांत असेलच. फौजदारी खटल्यांच्या चौकशी करितां सरकारास दवाखान्यांची जरूरी लागत असून त्यांच्या खर्चाचा बराचसा बोजा स्थानिक संस्थांवर घालणें योग्य होणार नाहीं. बरें ह्या प्रमाणें खर्चाचा बोजा स्थानिक संस्थांवर लादण्यांत आला आहे तरी त्यांच्या उत्पन्नाची एक बाब सरकारानें त्यांच्या संमती वांचून हळून बंद केली आहे. म्युनिसिपल कमेटीच्या हद्दींतील दवाखान्यांतून आज पर्यंत ज्या मध्यम स्थितींतील लोकांना औषधें दिलीं जात असत, त्यांजकडून औषध पाण्याबद्दल किंमत घेण्याची वहिवाट असे. व हें उत्पन्न म्युनिसिपाल्यांनां मिळत असे. परंतु अलिकडे हें उत्पन्न सदहू संस्थानां विचारल्या शिवाय सरकारानें बंद केलें आहे. असें करण्यांत सरकाराचें अंतस्थ हेतु काय असतील कोण जाणे. जों पर्यंत लोकांनां इंग्लिश औषधें घेण्याची संवय लागलेली नाहीं तों पर्यंत त्यानां फुकट औषधे देणें वाजवी होणार आहे; परंतु तसें न करितां प्रारंभीं औषधांबद्दल लोकांकडून पैसे घेऊन, लोकांनां संवय लागल्यावर सदहू वहिवाट बंद करण्यांत येते. असा उलट प्रकार झाल्याचें पाहून आश्चर्य वाटतें आणि ज्या संस्थाना ही वहिवाट चालूं ठेवल्या पासून अंशतः पैशाची मदत होत होती त्यांच्या संमती शिवाय ही वहिवाट बंद करण्या विषयीं सरकारानें केलेला ठराव पाहून तर जास्तच नवल वाटतें. असो. अलिकडे अशाच रीतीनें दुसऱ्या एक बाबतींत एक स्थानिक संस्थेच्या कारभारांत त्या जिल्ह्याचे अधिकारी हात घालीत आहेत असें आमच्या कानावर आलें आहे त्या संबंधानें आमच्या वाचकांस माहिती देऊन व सदहू संस्थेच आपल्या हक्का बद्दल वेळींच जागे होण्या इशारत देऊन ह्या विषयाची तूर्त रजा घेतों. म्युनिसिपल हद्दींत असलेल्या सार्वजनिक रस्त्यांची देखरेख म्युनिसिपालिटीकडे असते; आणि त्यामुळें सदहू रस्त्यावर लग्न कार्यां करितां मांडव उभारण्याकरितां किंवा नवीन इमारत उभारणें असल्यास तिचा माल मसाला टाकण्या करितां, मालकानें परवानगी मागतली असतां म्युनिसिपालिटीला परवानगी देऊन त्याजकडून भाडें वसूल करण्याचा अधिकार असे. परंतु अलिकडे एका जिल्हाधिकाऱ्यानें आपल्या ताब्यांत असलेल्या एका म्युनसिपालिटीस असा हुकुम फर्माविला आहे कीं ह्या पुढें कोणत्याही प्रसंगीं हम रस्त्यावर वरील कामाकारितां जागा देण्यांत येऊं नये. अशा प्रकारचा हुकुम अमलांत आणल्या पासून लोकांचें दोन प्रकारें नुकसान होत आहे. रस्त्यावर रहाणाऱ्या इसमाचीं घरें बंगले- वजा नसल्यामुळें, त्यांनां वरील प्रसंगीं म्युनिसिपालिटीची याचना करणें भाग होतें; परंतु असा तऱ्हेची सवलत ह्या पुढें लोकांस व दिल्या पासून त्यांची फारच गैर सोय होणार आहे. दुसरें नुकसान हुकुम अंमलांत आणल्या पासून होणार आहे तें सदहू संस्थेच्या हक्काचें होय सदहू हुकुम म्युनिसिपालिटीचे चेअरमन ह्यांना त्यांनें सोडला असेल असें म्हणावें तर सदहू म्युनिसिपालिटीच्या इतर सभासदांना धाब्यावर बसवून, मे. चेअरमन साहेब आपलेंच मत स्थापित करतील हें संभवत नाहीं; तेव्हां सदहू हुकुम आसाहेबांनीं जिल्हाधिकारी आणि म्हणूनच सदहू संस्थेचे नियामक ह्या नात्यानें सोडला असला पाहिजे. परंतु असे केल्या पासून लोकांची गैर सोय काय होत ह्या गोष्टीचा व त्याच प्रमाणें आज पर्यंत सदहू संस्था जे हक्क उपभोगीत आहे त्यांचा आपण अवरोध केल्याची महत्वाची जबाबदारी आपल्या शिरावर येऊं पहात आहे ह्या गोष्टींचा आसाहेबांनीं विचार केला नसावा असें आम्हांस वाटतें. परंतु विचारांतीं आसाहेब आपली चूक प्रामल पणें कबूल करतील अशी आम्हांस बळकट आशा असल्यामुळें आम्ही सदहू संस्था व आसाहेब ह्यांचा नाम निर्देश न करितां, आम्ही त्रोटक रीतीनें सूचना करण्या करितांच हा लेख लिहिला आहे. त्या पासून उद्दिष्ट हेतु सिद्धीस जाईल अशी उमेद आहे.

---

## भावी गोष्टी

भावी गोष्टी कळत नाहींत तों पर्यंत मोठी मौज असते. सध्यां आमच्या प्रांतांत सर्वतोमुखीं भावी राज्य कारभाराच्या गोष्टी ऐकूं येतात. भावी व्यवस्था हा एक मुख्य विषय होऊन बसला आहे. अनेकांचे अनेक तर्क चालतात. दररोज निरनिराळ्या ताज्या बातम्या म्हणून प्रसिद्ध होत असतात. सध्यां भावी गोष्टींच्या विचारांत सर्व लोक गर्क आहेत. प्रत्येक मनुष्य मोठ्या उत्कंठेनें कान देऊन उभा आहे. एखादी गोष्ट कोणाच्या तोंडून ऐकावी तिच्या बऱ्या वाईटपणा विषयीं चर्चा करावी यांतच मोठें सौख्य वाटतें. आतां हें खरें कीं वारंवार ज्या बातम्या निघत असतात त्यांचा संबंध सरकारांत चालूं असलेल्या विचारापर्यंत पोंचत असतो. ह्या बातम्या म्हणजे सरकारी विचारांचें दिग्दर्शन होय वऱ्हाड प्रांताची भावी व्यवस्था लवकरच सरकारी ग्याझेटांत प्रसिद्ध होईल असा लोकांचा तर्क आहे.

ही गोष्ट आम्हास निश्चित दिसते कीं या प्रांताचे सहा जिल्हे मोडून त्यांचे चार जिल्हे करण्यांत येतील. पश्चिम वऱ्हाडांतील वाशिम जिल्हा व पूर्व वऱ्हाडांतील इलिचपूर जिल्हा या दोहोंस फांटा मिळेल असा बहुतेक रंग दिसतो. या व्यवस्थेनें खर्चाची पुष्कळशी

कारकसर होईल. वऱ्हाड प्रांत मध्य प्रांताला जोडूनही तो स्वतंत्र वेगळा ठेवावा अशा विषयीं लोकांनीं इंडिया सरकारास पूर्वीच अर्ज केला होता. त्या विनंतीला कितपत मान मिळतो हें पाहण्याकडे सर्वांची दृष्टि लागली आहे. इंडियांतील सर्व इलाख्यांमध्यें क्रांती होईल व निरनिराळे फेरफार करण्यांत येतील तर मध्यप्रांताला अगदींच रजा मिळेल. मराठी भाषा बोलणाऱ्या भागांचा एक महाराष्ट्र म्हणून मुंबई इलाखा बनविला आहे, सिंध वगैरे भाग पंजाबाकडे जाऊन त्या प्रांताची मर्यादा वाढविण्यांत येईल. मुंबई इलाख्याचा पुष्कळसा दक्षिणेकडील भाग मद्रासेकडे देण्यांत येईल. मध्यप्रांतातील मराठी भाषा बोलणारा भाग वऱ्हाड प्रांत सुद्धां मुंबईकडे लागला म्हणजे बाकीच्या मध्य प्रांताची छाटाछाट बंगाला व वायव्येचे संयुक्त प्रांत या दोहोंच्या मध्यें करण्यांत येईल. एवढी मोठी उलाढाल करण्या इतके लार्ड कर्झन साहेब पराक्रमी आहेत तेव्हां त्यांच्या इच्छेला व सोयीला कोणती गोष्ट पसंत पडेल ती खरी. नुसत्या वऱ्हाड प्रांताची व्यवस्था लावण्यांत येणार असली तर पूर्व वऱ्हाड मध्यप्रांताकडे व पश्चिम वऱ्हाड मुंबईकडे देण्यापेक्षां सर्वच प्रांत मध्यप्रांताला जोडण्यांत येईल तर त्यांत लोकांचा विशेष फायदा आहे असा पुष्कळांचा समज आहे.

---

# The Berar Samachar

MONDAY JUNE 22 1903

---

The British rule has made an epoch in the history of India. The highest glory of our government is the stupendous work of unification of India. India was never before one whole nation as it is now. The different nationalities of the Indian continent are being welded into one mighty whole. The harmonizing influences of the English sovereignty brought about such phenomenal union as is one of the greatest marvels in the records of history. We have come to realize the spirit of unification; and we think that the complete achievement of this great ideal is well nigh within the range of practical politics, provided the rulers come forward with a sympathetic and liberal heart to admit the Indian people to the rights and privileges of a British subject. There is not as yet that community of feeling between the two peoples, which will kill all differences of race, creed and colour. India is at present first for the Englishman and then for the Indian. There should be no such invidious priority. The conflict of interests as English or India must at first disappear before the harmony of feelings will join together the English and Indian heart. The privileges of a victorious people are asserted in a manner to trample down the birth rights of the Indian people. The work of unifying the peoples of India is approaching a final completion but the grand ideal stops short when it asks of the Englishman a righteous and noble duty to elevate the Indian to his own level. The unification does not proceed further when the Britisher is to destroy his geographical differences and make India a common home with the Indian people. There is not as yet the dawn of a feeling of a common brotherhood in which both the *Englishman* and the Indian will participate as partners of equal rights. The commensality of being under one common sovereign does not extend further to remove racial and color distinctions. We hope that a golden day will come when we bear in mind the far—reaching effects of the past Delhi Durbar. That Durbar was a stepping stone to further advancement in the path of unification and we hope that we shall, in no distant future, realize the grand hopes that are put forth in the following observation on the Delhi Durbar.

" The growing power of the railway, of the press, and other means of communication, has done much to bring the different parts of India into contract with one another, and to obliterate their divergences; but on no previous occasion have so many of the Chiefs and nobles and representative persons of India of all races and religions had an opportunity of meeting together, not for an hour or a day, but for a period of weeks. Much was done by the friendly exchange of ideas at social gatherings and official functions to break down the barriers of ignorance or distrust which have tended to keep different classes and individuals apart, and have proved a serious obstacle to the cohesion of the body politic. That the Chiefs themselves thoroughly appreciated the opportunities afforded is clearly shown by the remarks of His Highness the Nizam already quoted, and by messages of a similar character which have reached the Viceroy from many other quarters. Nor is it the Chiefs alone who benefited in this way. Advantage was taken of the occasion by our civil and military officers of different Provinces who were assembled for the Durbar, and who are precluded by their duties at ordinary times from meeting, to discuss together many matters of the highest administrative importance, and to compare ideas on points of policy or practice in a way which, within the narrow limits of their own Provinces, would have been impossible. We are confident that there was not an officer present, British or Indian, who did not feel a sense of pride at serving the Government of an Empire so vast and beneficent, or who did not carry away with him the stimulus of an added zeal to give of his best to the service of his Sovereign and country. "

---

We do not want a monument as a memorial to the sacred memory of Victoria the Good. But Lord Curzon is resolved to have one at Calcutta. It will be a buiding parallel to the Tajmahal at Agra. Further discussion is now useless as the government are decided upon building a Victoria Memorial Hall. We propose however that the Government should patronize the Indian art of architecture alone. The Western idea should not be allowed to vulgarize the purity of the Indian art. Let the money that is being spent upon the memorial go to feed the people of India and let the memorial be an epoch of an *Indian* building in the zenith of the British empire. We think that the following remarks about the Taj at Agra will satisfy the government that the Indian memorial will be well worthy of the traditions of the East.

" The Taj has been the subject of numberless critical essays, but many of them have missed the mark entirely because the writers have not been sufficiently convernent with the spirit of Eastern artistic though. All comparisons with the Parthenon, or other classic buildings, are useless. One cannot compare Homer with the Mahabharata, or Kalidas with Euripides. The Parthenon was a temple for Pallas Athene, an exquisite casket to contain the jewel. The Taj is the jewel— the ideal itself. Indian architecture is on much closer affinity to the great conceptions of the Gothic builders, than it is to anything of classic or Renaissence construction. The Gothic cathedral, with its culptered arches and its spires pointing Heavenwards, is a symbol, as most Eastern buildings are symbol. But the Taj stands alone among Eastern buildings for it represents in art the same effort towards individualism, the struggle against the resuraints of ritualism and dogma which Akbar intiated in religion. "

---

## वऱ्हाडवृत्त.

हवामान— मृगाचे दोन पाऊस बरे झाले. हल्लीं हवेंत थंडपणा आला आहे. वारा सोसाट्याचा सुटतो. गेल्या दोन दिवसांत ढग पुष्कळ जमत नाहींत. पावसाकडे लोकांचे डोळे लागले आहेत. रोगराई कांहीं नाहीं. शेतीचीं कामें झपाट्यानें चालू आहेत.

आकोल्याहून डाबकीकडे जातांना वाटेंत ढेगाच्या झोपड्या आहेत व त्याच्या उत्तरेस सडके पासुन दोन चार हातांवर एक विहिर आहे त्या विहिरीस कठडा किंवा सभोंवार दगडांचा उंचवटा असें कांहींच नसल्यामुळें रात्रीं बेरात्रीं दगा होण्याचा फार संभव आहे. आमचे दक्ष [ ! ] म्युनिसिपल अधिकारी इकडे लक्ष देतील काय असें " क्ष " विचारतात.

इलिचपूरचा तोफखाना आज तेथून हालविण्यांत येईल आणि तो पुण्याकडे रवाना होईल. तोफखाना हालल्यामुळें परतवाड्याच्या लोकांस मोठें वैभव गेल्या सारखें वाटतें इतर लष्कराची उचलबांगडी पावसाळा संपल्या नंतर करण्यांत येईल.

आत्महत्या— येथील मि० अन्नुमिया साहू यांच्या घरीं झालेल्या चोरींत ज्यांचा बोडेवाला चोरीच्या वहिमावरून पकडला गेला तो पोलिसांच्या कच्च्या अटकेत असतांना त्यानें विहिरींत उडी मारून जीव दिला. पोलिसांच्या मारामुळें त्यानें जीव दिला असा पोलिसांवरही आरोप घालण्यांत आला पण पूर्ण चौकशीं अंतीं ती गोष्ट तशी नाहीं असें निष्पन्न झाल्याचें समजतें.

हल्लीं अकोल्यास चोऱ्याचे गुन्हे पुष्कळ होतात पण त्यांचा लागावा तसा योग्य पत्ता लागत नाहीं. पोलिसांची शिथीलता फार आहे तथापि या पुढें नीट बंदोबस्त राहील अशी आम्हीं उमेद बाळगतों.

गेल्या सोमवारीं बुलढाणें जिल्ह्यांतील सर्कल इनस्पेक्टरांची डिपार्टमेंटल परीक्षा झाली तेव्हां पांच उमेदवारा पैकीं पांचजणही पसार झाले.

सरकारी वायदा वसूल करण्याचे काम पटवाऱ्यांस असल्या कारणानें येथील मोजणीचे काम शिकविण्याचा वर्ग बंद होता तो गेल्या १० तारखेपासून पुन्हा चालू करण्यांत आला.

श्रीमाणिक प्रभु मासादिक नाटक कंपनीनें परवां रात्रीं शृंगार मंजिरी नाटकाचा प्रयोग करून दाखविला नाटक चांगलें झालें.

टिळक–प्रकरणातील साक्षीदार राजश्री खापर्डे व राजश्री दुर्गे जोशी यांच्या साक्षी आज पासून उमरावतीला घेण्यांत येतील.

येथील लक्ष्मीनारायणाचे देवळांत हरीभक्ती परायण राजश्री कृष्ण शास्त्री पातुरकर बोवा यांच्या कथा चालल्या होत आहेत व आकोल्यातील हरिभक्त मंडळीला ही एक अमोल्य करमणूकच आहे बोवांची भाषाशैली बरी असून श्रोत्यांच्या मनाला गायनाचा चांगला आल्हाद वाटतो.

गेल्या बुधवारीं रात्रीं सुमारें १० वाजतां पश्चिमेकडे एक तारा पाव तास पर्यंत डोलकाच खाल पडत आहेसा दिसला दुश्चिन्ह का सुचिन्ह हें कांहीं सांगतां येत नाहीं तरी अशा तऱ्हेचा तारा पडतांना क्वचितच पाहण्यां येतो हें मात्र खरें.

चक्रवर्ती बादशहा एडवर्ड साहेब यांच्या जन्म दिवसा निमित्त तारीख २६ जून शुक्रवार हा दिवस सार्वजनिक सणाप्रमाणें पाळण्यांत येईल. त्या तारखेला सर्व कचेऱ्या बंद ठेवण्यांत येतील.

मि० रुस्तुमजी आरदेसर चिनाय बी. ए. तहशिलदार, जळगांव यांस २, रे वर्ग माजि० चा अधिकार देण्यांत आला.

गेल्या एप्रील महिन्यांत या प्रांती ९२०३ माणसें जन्मलीं व ८९०३ मरण पावलीं.

---

## आकोला बाजारभाव

| | |
|---|---|
| हुंडी दर्शनी | १००४॥ |
| सोनें २४।≈ | चांदी ६९ |
| जवारी ४९।५० | जवस १०४ |
| गहू ४॥। ५। | ९९ ते १०० |
| बाजरी | ५५ |
| मीठ | ४ रु. मण |
| चणे | ३॥= रु. मण |
| तूप | ७॥।= रु. मण |
| तेल | ५।- रु. मण |
| रुई | ५०।५४ |

---

## वर्तमानसार

**घाणेरडा आरोप**—हैदराबादेंत डेक्कन पोष्टाचे संपादक मि. एम. एन. मित्र यांचेवर एक युरोपियन पोरगी पळवून नेल्याचा आरोप आला आहे सध्यां या आरोपाची चौकशी चालली आहे. जें ऐकावें ते नवीनच. हैदराबादेंत मुली पळवून नेण्याचा कारखानाच आहे काय ?

**योग्य विवाह**—रा० ब० वामनराव कोल्हटकर स्मॉलकाज कोर्ट जज्ज नागपूर यांच्या पौनर्भव मुलीचा विवाह पुण्यास रा० रा० घारपुरे इ. सि. स. यांच्याशी झाला. रा. ब. कोल्हटर हे कर्त्या सुधारकांपैकीं असून त्यांनीं पुण्याच्या पुराणप्रियांच्या गाताकडे लक्ष न देतां आपली बाजू सबळ करण्याचा प्रयत्न केला हें फार स्तुत्य होय. रा. घारपुरे यानींही यावेळीं जें मानसिक धैर्य दाखविलें त्याबद्दल ते स्तुतीस पात्र आहेत. बोल घेवड्या सुधारकानीं वरील कित्ता गिरवावा म्हणजे त्यांच्या मतास मान मिळण्याचे दिवस आतां गेले. हें त्यांनीं पक्के लक्षांत ठेवावें.

**बंद होणार**—एलीचपूर येथील तोफखाना पुढील महिन्यापासून बंद होणार.

**माणसावर कर**— मद्रास इलाख्यांत लोकल बोर्डानें दर माणशी वर्षास एक पैसा कर बसवून लहान लहान रेल्वे काढण्याचा बेत ठरविला. त्याला वरिष्ठ सरकारनें अनुमोदन दिलें व ४ रुपये व्याजानें वरील तारणावर लागेल ती रक्कम देण्याचें ठरविलें ।

**शिफारस**— सिलोन येथील तुरुंगाचे अधिकाऱ्यांनीं रिपोर्टांत असें ध्वनित केलें आहे कीं खुनी लोक फाशीची शिक्षा दिली तरी वचकत नाहींत. राजेश्रींच्या मनांत यापेक्षां कडक कोणती शिक्षा असावी असें आहे?

**नामदार प्रिन्स आफ वेल्स यांचें आगमन**—नामदार प्रिन्स आफ वेल्स आणि प्रिन्सेस ह्यांच्या स्वाऱ्या हिंदुस्थान पाहाण्याकरितां येत्या आक्टोबर नोवेंबर महिन्यांत इकडे न येतां प्रथम अमेरिकेंत जाणार, आणि कदाचित् पुढच्या वर्षी हिंदुस्थानांत येणार अशी बातमी प्रसिद्ध झाली आहे.

लंडन टाईम्सच्या बातमीदारानें रशिया मधील दरबारी अंतस्थ व्यवस्थेवर टीका करण्याची सुरू केल्यामुळें त्यास हांकून लाविलें की ?

**फुकट बी**— अमेरिकेंतील पेरू देशांत उत्पन्न होणाऱ्या कापशीचें बीं मि. टाटा यांनीं आणविलें असून ते शेतकऱ्यांस पेरणीस फुकट वाटणार आहेत असें कळतें. स्तुत्य. कापसाची लागवड करणाऱ्यांनीं अवश्य फायदा घ्यावा.

**प्रवास करणारांनीं ध्यानांत धरावें**- गेल्या रविवारीं आलमट्टी स्टेशन स० म० रेल्वे जवळ गाडी आली त्यावेळीं एक बाई आगगाडींतच बाळंत होऊन धक्यानें ती लागलींच मरण पावली. मूल अद्याप जिवंत आहे. भरलेल्या दिवसांत बायकास आगगाडींतून प्रवास करण्यास लावणें किती धोक्याचें आहे हें ह्यावरून सहज कळतें.

**नवीन आगबोटी**— व्हेनिस पासून कलकत्त्यापर्यंत आगबोटी सुरू करण्याचा इटालीच्या तार व टपाल खात्याच्या प्रधानानें व्हेनिशियन कंपनीशीं ठराव केला आहे यामुळें टपाल वगैरे लवकर रवाना होईल, असें म्हणतात.

**प्लेग**-गेल्या आठवड्यांत ६,०१४ माणसें मेलीं, मागच्या आठवड्यांत ८,६७६ मेलीं होतीं, पैकीं पंजाबांत ४,८७४ मेलीं ! इनाक्युलेशन ज्या भागांत इतक्या नेटानें करण्यांत आलें त्या प्रांतांत ही तऱ्हा ? आणि अखेर आपलीं हत्यारें चालविण्यास व आपल्या अंगच्या कौशल्याचे प्रयोग करून पडाण्यास जे वीर महावीर या पंजाबच्या प्लेग विरुद्ध सरकार लढाईकरितां आणले त्यांस हिरमुसलीं तोंडें करून परत पाठविण्याचा प्रसंग आला तो आलाच.

**योग्य न्याय**—धारवाड जिल्ह्यांत फार दिवस चालू असलेला रा० मुळगुंद मामलेदार यांजवरील लांचाचा खटला संपून मामलेदारांस ६ महिने सक्तमजुरीची कैद व ६०० रुपये दंड व कारकून रा० मनोळी याप ४ महिने सक्तमजुरी व २०० रुपये दंड अशा शिक्षा झाल्या. या शिक्षेवर अपील झालें असून त्याची तारीख १२ नेमिली आहे. जामीन घेण्याची विनंती कोर्टानें मान्य केली नाहीं. लांच खाऊंनीं ध्यानांत धरावें.

**सरकार कंटाळलें**— अमदाबाद येथील श्रीमान घराण्यातील एका अंडर ग्राज्युएटानें बारा वर्षांपूर्वी आपल्या बायकोचा खून केल्यावरून त्याला अंदमान बेटांत काळेपाण्याच्या शिक्षेवर पाठविला होता. तेथून त्यानें आपली मुक्तता करण्याबद्दल मुंबई सरकाराकडे अर्ज करून करून सरकारास कंटाळविलें, तेव्हां शेवटीं ह्या महिन्यांत सरकारानें त्याची मुक्तता केली.

**चमत्कार**—संगमेश्वर तालुक्यांत कोळंबे येथें नदीच्या डोहावर असलेल्या एका आंब्यावर टोळधाड येऊन बसली व त्यांची अतोनात लेंड डोहांत पडली. त्याचा परिणाम असा झाला कीं, त्या डोहांत असलेले शेकडों मासे मरून पडले, व हे मासे ज्या शुद्र माळ्यानीं खाल्ले ती बहुतेक माणसें आजारी पडलीं.

**योग्य बक्षीस**— आपल्या संस्थानांतील लोकसंख्येचा रिपोर्ट उत्तम रीतीनें तयार केल्याबद्दल त्रावणकोरच्या महाराजानीं मि. एन्. सुब्रह्मण्य आयर यास रु. २००० बक्षीस दिलें.

प्रसिद्ध गवई रहिमतखां हे हल्लीं पुण्यास आले असून तेथें त्यांच्या दररोज गाण्याच्या मजलशी चालू आहेत. श्रोत्यांची गर्दी अतोनात होत असते.

ब्रह्मदेशांतील रेल्वेचे असि. इंजिनियर मि. बाथ यानीं गेल्या रविवारीं आपल्या हातानें आपल्या अंगावर पिस्तुल झाडून घेऊन आत्महत्या करून घेतली. असो.

सातारा नजीकच्या प्रांतात टोळधाड इतकी येऊन पडली. आहे कीं जों काय शेतातून लाकडांनी वस्त्र लाव ठेवलें. आहे असा भास होतो. ज्या प्रमाणें शेतांतून व रानमाळांतून ठेकाणें थोड्या थो पसरलेले दिसतात त्या प्रमाणें आकाशाकडे पाहिलें असतां एक सारखा बराच लांब छत जणू काय मंडपाच आच्छादनार्थ बांधला असावा असा प्रकारचा देखावा पडतो.

अजून दुर्दैव सोडीत नाहीं. ब्रह्मदेशांतील एका म्याजिस्ट्रेटपुढें चाललेल्या खटल्यांत मि० पेनेल यानीं एक कैफियत गुजरली होती तींत त्या म्याजिस्ट्रेट विरुद्ध बराच मजकूर होता. या प्रकरणाची चौकशी रंगूनच्या डिस्ट्रिक्ट म्याजिस्ट्रेट साहेबांपुढें चालूं होती. त्यांत म्याजिस्ट्रेट साहेबांस मि. पेनेल यांची वर्तणूक फार दोषार्ह वाटल्यावरून त्यांनीं हें प्रकरण चीफ कोर्टाकडे चौकशीकरितां रुजूं केलें.

**सक्त हुकूम**— निजाम सरकारांनीं आपल्या राज्यांत आपला स्टांप कागद सुरू केला आहे. आजपर्यंत त्यांच्या राज्यांतील जहागिरदारांस आपले स्टांप कागद करण्याची परवानगी होती. परंतु ती आतां रद्द करण्यांत आली आहे. आतां त्यांनीं देखील निजाम सरकारचा स्टांप घेतला पाहिजे असें निजाम साहेबांनीं फर्माविलें आहे.

**पोलिसची लबाडी**-- बहादुरजंग येथें एका धनवान गृहस्थास एका रात्रीं एक चमत्कारिक व भेसूर असा आकार दिसला. तेव्हां त्यानें "कोण आहे." असा प्रश्न केला. त्यावर त्या भव्य पुरुषानें "मी प्लेग आहे. तुला प्लेगची बाधा होऊं नये असें वाटत असेल तर आपली इस्टेट मला अर्पण कर" असें उत्तर दिलें. तें ऐकून त्या भोळ्या गृहस्थानें आपली मालमत्ता त्या आकृतीस दाखविली. पुढें त्या प्लेगरूपी देवतेनें तेथील वीस हजार रुपयांचा ऐवज लांबविला आणि सुखनैव पोबारा केला. पुढें कांहीं वेळानें या कामीं कांहीं लबाडी झाली असा संशय आल्यावरून प्रकरण पोलिसांत गेलें. तेव्हां या लबाडींत एक पोलीस इनस्पेक्टर आणि कित्येक शिपाई आहेत असें निदर्शनास आलें असल्याची बातमी प्रसिद्ध झाली आहे,

**ठराव**— जंगल खात्याच्या आफिसर लोकांच्या विशेष परवानगीवांचून सरकारी जंगलांत सोल्जरांनीं शिकार करूं नये असें अलीकडे सरकारानें ठरविलें आहे.

---


## खरेदी करा !

### रास्कोपची पेटंट व खरी पेटंट वॉचेस

### नकली मालास भुलून पैसे खर्चू नका.

रेल्वेच्या व इतर अवजड कामास हेंच वॉच अत्यंत उपयुक्त आहे. हें वॉच पहिल्या प्रतीचें बिनचूक वेळ दाखविणारें असून इतर वाचेस प्रमाणें यांस नेहमीं रिपेरची जरूर नसून या बद्दल विशेष काळजी व लक्ष पुरविण्याची अवश्यकता नाहीं. म्हणून जंगलांत बाहेर फिरणारे लोकांचें तर हें सोबतीच आहे असें अनुभवास आलें आहे. यानकरितां ज्याला आपली वेळ बरोबर राखण्याची जरूरी आहे अशा लोकांस म्हणजे इंजिनियर, कॉंट्रॅक्टर, ओव्हरसियर, फारेस्ट कान्सरव्हेटर व इतर प्रवासी लोकांस हें वाच घेणें विषयीं आम्ही खात्रीपूर्वक शिफारस करितों. आमची **स्कोपच्या पेटंट वॉचेस** संबंधीं याहून जास्त लिहिण्याची जरूरी नाहीं कारण त्यांच्या गुणांची प्रचीती तींच आपोआप दाखवितात, इतकें लिहिलें असतां बस्स आहे. हीं घड्याळें आपली स्वतःच शिफारस आजपर्यंत करीत आलीं आहेत, करीत आहेत व पुढेंही अशीच करीत राहतील, प्रत्येक वॉच फार काळजी पूर्वक तपासून चालवून तें वेळ बरोबर दाखवितें अशाबद्दल ग्यारंटी देण्यांत येतें, व त्या बद्दलची जोखीमदारी आमचे शिरावर आहे.

**सूचना**:—पुढील नमुना २१ लाईनच्या मोठ्या आकाराच्या वॉचचा आहे.



मोठे मध्यम १६ रु. १७ रु. लहान

**रोल्ड गोल्ड ४ वर्षांच्या ग्यारंटीचें**

१९ लाईन ओपनफेस............४०
१९ ,, हंटिग............५०

**गोल्ड ५ वर्षांच्या ग्यारंटीचें.**

१८ लाईन ओपन फेस फिरत्या झांकणाचें ........१९०
१९ ,, हंटिंग, नकशीचे ............२९०

**मेटलचें तीन वर्ष ग्यारंटीचें.**

रास्कॉप पेटंट २१ लाईन एकस्ट्रा स्ट्रांग १८
१९ ,, सेकंद कांट्यासह............२०
१९ ,, मध्यभागी सेकंद काटा असलेलें ............२२
१९ ,, हाफ हंटिंगचें............२०
१९ ,, हंटिंगचें ............२०
१४ ,, रिस्ट वॉच ............२०

**इनगनमेटल ३ वर्षांच्या ग्यारंटीचे**

१९ लाईन ओपन फेस............२०
१९ ,, हंटिंग............२०
१४ ,, रिस्टवॉच............२०

**सिल्व्हर वाच ४ वर्षांच्या ग्यारंटीचे**

१४ लाईन रिस्ट वॉच ............३०
१४ ,, हंटिंग............३५
१८ व १९ ,, ओपनफेस ............३०
१९ ,, सेकंद कांट्यासह............३२
१९ ,, मध्यमागीं सेकंद कांटा असलेलें ............३५
१९ ,, ओपनफेस सुंदर नकशीचें....३५
१९ ,, हंटिंग ............४९

लेडीज वॉचीस १४. १८, क्यारेट गोल्ड रुपये ६५-२०० पर्यंत.

**सी. हिनीगर आणि कंपनी.**

ओरिजनल जिनीयन रास्कोप पेटंट वॉचेसचे सोल एजंट.

५ हार्नबी रोड, मुंबई.

REGISTERED N. No

वर्गणी आगाऊन दिली पाहिजे.
किरकोळ अंक.................................२
नोटिशी बद्दल
१० ओळीचे आंत रु० १
दर ओळीस..........८१ ८६
दुसरे खेपेस..............८१

advance.
Single copy ...................... 2 as
Advertisement
below 10 lines ...... 2 Rs
Per line over 10 ...... 3 as
Repetition Per line .. 2 as

# वऱ्हाडसमाचार.

THE BERAR SAMACHAR

VOL XXXVII AKOLA MONDAY 29 JUNE 1903 NO 25

वर्ष ३७ आकोला सोमवार तारीख २९ माहे जून सन १९०३ इ० अंक २५

मे. स्यानिटरी कमिशनर साहेब प्रांत वऱ्हाड ह्यांचे कडील पत्र

नंबर १९७ तारीख २८ एप्रील सन १९०३ ह्यांत

## प्लेगसंबंधीं सांगितलेले नियम.

प्रत्येक घर व घरानें आवार स्वच्छ करावें आणि तें सदोदीत तसे ( स्वच्छ ) ठेवावें, सर्व घाण कचरा, गुन्या चिंध्या बाहेर काढून जाळून टाकाव्या. प्रत्येक खोलीस खिडकी ठेवावी व ती अक्षयीं उघडी ठेवावी ह्मणजे ताजी हवा व उजेड ही आंत येतील. पुष्कळ हवा आणि उजेड आहे अशा जागीं प्लेग जंतूंची वाढ होत नाहीं ते जंतू अंधारांत व कोंडल्या हवेच्या ठिकाणीं जोरानें वाढतात. सर्व खोल्यांस चुन्याची सफेती द्यावी प्राण्यापासून उत्पन्न झालेल्या पदार्थांत जंतूंची वाढ जोरानें होते व शेण हा पदार्थ प्राण्या पासून झालेला आहे ह्मणून खोल्या, सायवान आणि आवार ह्यांच्या तळजमिनी सारविण्याच्या कामीं ( शेणाचा ) उपयोग करूं नये. शेणाच्या जागीं पांढऱ्या मातीचा उपयोग करावा.

२ पायखानें व मोऱ्या रोज सफा कराव्या. घर व आवार ह्यांच्या सभोंवतीं ज्या ओलसर जागा असतील त्यांची ओल राहूं देऊं नये.

३ प्लेग आला तर गांवचा बचाव करण्यास मुख्य उपाय ह्मटला ह्मणजे प्लेग केस झाल्या बरोबर ती शेजाऱ्यांनीं व वार्ड मेंबरानें तातडीनें कळवावी. आणि आजारी मनुष्य व त्याशीं संसर्ग असलेल्या सर्व मनुष्यांस काढून अलग ठेवावे, त्याच्या शेजारचीं घरेंहीं खालीं करावीं आणि कृमिनाशक औषधानें पूर्णपणें धुवावीं. अर्धवट उपाय कांहींच उपयोगीं नाहींत त्यांत पैसा मात्र व्यर्थ खर्च होतो. व त्या उपायाची नाशेशी होते. दूषित भाग सोडणें व कृमिनाशक औषधांनें धुणें असेल तर ही योजना पूर्णपणें करावी नाहीं तर मुळींच करूं नये.

आपल्या गांवाचा नाश न होऊं देण्याचा हाच उपाय आहे. ह्याची योजना करणें अथवा त्याची हेळसांड करून आपल्या गांवाचा नाश झालेला पाहणें हे लोकांवर अवलंबून आहे. प्लेग प्रथम सुरू होऊन एखादें घर अगर लहानसा महलाच दूषित झाला असतां तेव्हां मात्र ह्या उपाया पासून फायदा आहे. व ह्या उपायांची योजना पूर्णपणें केल्यानें पुष्कळ शहरें व खेडीं ह्यांचा या भयंकर सांथी पासून बचाव झाला आहे.

४ जेव्हां गांव सर्वस्वीं दूषित होतो तेव्हां तो गांव सोडून बाहेर जाऊन राहण्या खेरीज दुसरा मार्ग नाहीं. मात्र प्लेगच्या देवी टोचणें हा एक उपाय आहे. घरें खालीं केलीं ह्मणजे त्यांतील दारें व खिडक्या आंत हवा आणि उजेड येण्यासाठीं उघडीं राहूं द्यावीं. हवा आणि उजेड हीं सृष्टींतील नैसर्गिक व सर्वांत उत्तम अशीं कृमिनाशक औषधें आहेत. हीं दूषित घरांतील कृमींचा नाश करून तीं शुद्ध करितात.

५ आह्मी लोकांस बजावून सांगतों कीं, मांजर डोळे झाकून दूध पितें त्या प्रमाणें प्लेग केसेस लपवून ठेवून प्लेगची वाढ बंद होईल असा समज बाळगण्यांत अर्थ नाहीं प्लेग केसेस लपवून ठेविल्यानें लोक आपल्या घरच्यांचा जीव धोक्यांत घालून राहणार नाहींत तर आपल्या गांवच्या पुष्कळ लोकांच्या मृत्यूस व गांवच्या व्यापाराच्या नाशास आणि अतोनात नुकसानीस कारण होतील. समजूतदार मनुष्याप्रमाणें लोकांनीं वागावें. मूर्ख, वेडगळ, ह्मातान्या बायकां प्रमाणें अगर पोरां प्रमाणें वागूं नये. गांवाचा बचाव करण्या करितां जे उपाय योजिले जात आहेत त्यांचे विरुद्ध मूर्खपणाच्या कंड्या कांहीं जण उठवितात त्या ऐकूं नये असें लोकांस आमचे सांगणें आहे.

६ दूषित गांव सोडून जे जाऊं इच्छित नाहींत त्यांस आमचे आग्रह पूर्वक सांगणें आहे कीं त्यांनीं प्लेगच्या देवी टोंचून घ्याव्या. कारण देवी टोंचून घेणें हाच काय तो दुसरा उपाय आहे.

*V. M. MAHAJANI*

व्हाइस चेअरमन

मुनिसिपाल कमिटी आकोला.

## नोटीस

बेशमीं दवरतराव बळीराम देशमुख राहणार चांदूर बिस्वा तालुका मलकापूर यांस:—

खालीं सही करणार याजकडून नोटीस देण्यांत येते कीं तुह्मी ५० रुपयांचा कर्ज रोखा २३।७।९९ रोजीं लिहून दिला. तुमचा व माझा करार लिहावयाचा होता कीं रुपये पुढील सालच्या रुतुमान्या बेलीं द्यावे व त्यावर व्याज दुहोत्रा प्रमाणें द्यावे. तुह्मी लबाडीनें शके १८२१ चा करार लिहून व्याज आठ आणे मित्तीचे लिहिलें. अशी दगलबाजी तुह्मी केली आहे. ही गोष्ट मला वकिलाच्या तोंडून कळली. तर तुह्मी माझे रुपये दुहोत्रा व्याजासुद्धां आणून द्यावे. आठ दिवसांत हा निकाल न कराल तर तुह्मा वर दगलबाजीचा कर्जरोखा लिहून मला फसाविल्या बद्दल फौजदारींत फिर्याद करण्यांत येईल. या नोटीशीचा खर्च तुह्मास द्यावा लागेल. कळावें. तारीख २३ जून १९०३ इ०

सही

महमद आश्रफ वल्लद जानमहमद

साहू दुकान चांदूर बिस्वा

## नोटीस

बेशमी ( १ ) धुंदेल्या वल्लद बुंदेल्या ( २ ) शेखलाल वल्लद महमद आजम ( ३ ) हशरुद्दीन वल्लद साबुद्दीन तिघेही राहणार वडनेर तालुका मलकापूर यांस.

खालीं सही करणार याजकडून नोटीस देण्यांत येते कीं सदर्हू हशरुद्दीन यानें ३।३।०२ च्या ताबेगहाणखता अन्वये माझ्या जवळ मौजे पिंपरी येथील सर्व्हे नं. २।४।२६।३०।३२ यांतील आपला हिस्सा वहिवाटीला दिला आहे. मी सर्व्हे नं. २।४।३०।३२ या शेतांतील हिश्शाचा ताबा घेण्यास गेलों असतां गेल्या सालीं तुह्मी धुंदेल्या शेखलाल या दोघानीं ताबा दिला नाहीं व माझ्या उपभोगाला हरकत केली. ह्मणून या लेखानें कळवितों कीं ही नोटीस पोंचल्या तारखे पासून आठ दिवसांच्या आंत सदर्हू चाऱ्ही शेतांतील हिस्से माझ्या ताब्यांत द्यावे. तसें न केल्यास गेल्या सालच्या पिकाबद्दल व या पुढील पिकाबद्दल व ताब्या बद्दल दावा करून या नोटीशीच्या खर्चा सुद्धां सर्व दाद तुह्मावर मिळविण्यांत येईल. कळावें. २३।६।१९०३ इ.

सही

महमद आश्रफ वल्लद जानमहमद

साहू दुकान चांदूर बिस्वा.

## नोटीस

नोटीस बेशमी परशराम वा दावजी धनगर राहणार शिलोडे ता० आकोला हल्ली राहणार मौजे गायगांव तालुके बाळापूर यास.

खाली सही करणार इजकडून नोटीस देण्यांत येते कीं मी तुमची लग्नाची बायको असून तुह्मी मजला ज्ञातीक आल्यावर अजमसें २ वर्षे पर्यंत वागविले व पुढें मजला माझे बापाचे येथें आणून घातले आज पावेतों ५ वर्षे झालीं आहेत. मध्यंतरी माझे आईबापांनीं दोन तीन वेळा तुमचे घरीं आणिले तरी तुह्मी मला वागवीत नाहीं वरून दरसालचा खर्च २५ रुपये प्रमाणें खरची बद्दल रुपये एकशे पंचवीस कर्ज १२५ झाले. आतां कोणी मजला कर्ज वगैरे देत नाहीं. करितां तुह्मी मजला ८ दिवसाचे आंत वरील कर्ज देऊन मजला नांदण्या करितां न्यावें. असे न केल्यास ही जी नोटीस तीच फारकत समजावी. मी कर्ज फेडण्या करितां दुसरा पाटाचा नवरा करीन मजवर तुमचा नवरे पणाचा कांहीं एक हक्क संबंध राहणार नाहीं. तारीख २२।६।१९०३ इसवी.

सही

जानकी मर्द परशराम धनगर राहणार वडद तालुके आकोला हातची खुद्द बांगडी.

## नोटीस

नोटीस किसन वा विठूजी वडतकर जात कुणबी राहणार उमरी तालुके दर्यापूर यास जया मर्द मदनजी गावंडे राहणार उमरी तालुके दर्यापूर इजकडून नोटीस देण्यात येते कीं मौजे मजकूर येथें माझी जमीन वगैरे असून देव घेव ही वसूल करण्या करितां ह्मणून तुह्मास कुलमुखत्यारपत्र करून दिले त्या प्रमाणें तुह्मी माझे कांहींच काम केले नाहीं. व असाम्या कडून काय वसूल केला व कोणाकडेस काय येणें आहे त्या बद्दल हिशोब मुळीच दाखवित नाहीं तरी ही नोटीस पावल्या पासून आठ दिवसात सर्व हिशोब दाखवा शिवाय तुह्मी माझे घरांतील काहीं सामान माझी चून राखी इत्यें मतानीं लांबविले आहे तेही द्यावें व माझे जे तुह्मास मुखत्यारपत्र दिले आहे ते मी रद्द केले आहे तुह्मी माझे कडून पुढें कोणी ही रितींने काम करूं नये कळावे तारीख २३।६।१९०३ इ. दस्तुर गंगाधर विष्णु नितळ

सही

निशाणी जया मर्द मदनजी गावंडे इची.

वऱ्हाडसमाचार

मित्ति आषाढ शुद्ध ५ शके १८२५

## दहशत

( प्लेगाच्या प्रतिबंधाचे उपाय )

ईश्वर कृपेनें हल्लीं सर्वत्र आनंद आहे. सध्या वऱ्हाडांत प्लेग बिलकुल नाहीं ही मोठी सुखाची व समाधानाची गोष्ट आहे पूर्वीं जो प्लेगानें कहर उसळला होता तो चित्रासारखा जेव्हां डोळ्यां पुढें उभा राहतो तेव्हां सध्याच्या आनंदकारक स्थिती चें महत्व चांगलें कळून येतें पण त्याबरोबर मनांत असा धक्का बसतो कीं पुनः ही व्याधी उद्भवेल तर केव्हां कसा व कोणता अनर्थ गुदरेल याचें अनुमान कल्पनेनेंहि करिता येणार नाहीं. इतर प्रांतांतील व विशेषतः मुंबई इलाख्या कडील गेल्या पांच सात वर्षांच्या प्लेगाच्या इतिहासाकडे नजर फेंकिली ह्मणजे प्लेगाचा पुनरुद्भव होईल अशी मोठी दहशत वाटते. प्लेगाची पुनरावृत्ति सरासरीनें सप्टंबरच्या सुमारास होते असा अनुभव आहे. आणि या दृष्टीनें पाहतां जेथें जेथें आजपर्यंत प्लेग झाला तेथें तेथें येत्या सप्टंबरच्या सुमाराला ही दुर्धर व्याधि पुनः उद्भवेल कीं काय याची मोठी चिंता पडली आहे. एक वेळ जेथें प्लेग होतो तेथें तो कांहीं दिवस मावळल्या सारखा असतो तथापि त्याचे बिजाचें समूळ उन्मूलन बहुधा होत नाहीं असें आढळतें. इतक्यावरच ही गोष्ट न संपतां मागील अनुभवावरून असेंही वाटतें कीं प्लेगाचें राज्य उत्तरोत्तर वाढतच आहे. त्यांतले त्यांत प्लेगाचे वाढीमध्यें असा एक प्रकार आढळून येतो कीं जो भाग दूषित होतो त्याला लागून असलेला भाग संसर्गानें किंवा सानिध्यानें दूषित होत जातो. या रीतीनें मुंबईहून निघालेली शृंखला ओढत ओढत प्रांतांत नेत येऊन पोहोंचली ती आतां सर्व प्रांतभर ओढली जाईल अशी मोठी धास्ती पडली आहे.

या भावी आपदेपासून परमेश्वरानेंच तारावें हें खरें तथापि मनुष्यस्वभावाला अनुसरून प्रत्येकानें आपापल्या बुद्धिप्रमाणें जसा सुचेल तसा इलाज करून पाहिलाच पाहिजे, आणि हा इलाज असा आहे कीं सार्वजनिक आरोग्याचे दृष्टीनेंहि आपण शुचिर्भूत राहिलें पाहिजे, आपली वस्ती स्वच्छ व हवाशीर अशा स्थळीं असावी आणि सूर्य किरणें अशा रीतीनें आपण घरांत घेतलीं पाहिजेत कीं त्यांच्या योगानें घरांतील घाण, दमट ओलसरपणा इत्यादिकांचा नाश होत जाईल. प्लेगाचे प्रतिबंधाचे जे इलाज आहेत ते आपल्या इलाख्याचे स्यानिटरी कमिशनर बहादूर यांनीं मुद्दाम लोकांचे माहिती करितां प्रसिद्ध केले आहेत, त्या नियमांचा मराठी तर्जुमा जेव्हां वाचण्यांत येईल तेव्हां त्या नियमाचें मुख्य धोरण असें आढळून येईल कीं स्वच्छ पाणी मोकळी हवा आणि सूर्याचे किरण यांचा उपयोग प्रत्येकानें शरीराला आराम मिळून पुष्टि येईल अशा रीतीनें केला पाहिजे आणि अशा धोरणानें वागण्यांतच प्लेगाचें निवारण आपोआप होतें.

आकोला, बुलढाणा, उमरावती या तीन्ही जिल्ह्याचे अधिकारी लोकांस वरील व्याधिनिवारणाचा उपाय आग्रह पूर्वक कळवीत आहेत आणि आतां पासूनच स्वच्छतेचे व शुद्धतेचे नियम अमलांत आणण्याविषयीं मोठी खटपट चालू आहे. प्लेगाचे प्रतिबंधाचें काम सर्वांचे सारखेंच आहे तेव्हां सरकारच्या व्यवस्थेला लोकमताचें पाठबळ मिळेल इतकेंच नाहीं तर सरकारी प्लेगाचा बंदोबस्त उत्कृष्ट होण्यासाठीं लोक मनोभावानें पुढें सरसावतील असा आह्मांस पक्का भरंवसा आहे.

प्लेग हा रामबाण मृत्युच आहे आणि त्याच्या पुढें कोणताच इलाज चालत नाहीं असा सार्वत्रिक समज आहे. आमचे मतानें प्लेगाची आपदा येऊन बेतल्यावर मनाची समजूत घालण्याला किंवा शांतवन करण्याला हा समज फार चांगला आहे. पण प्लेगा संबंधानें आपण निराश व निरुद्योगी जेव्हां जेव्हां या समजामुळें होतो तेव्हां तेव्हां हा समज लोकांचे मनांतून अगोदर काढून टाकावा असें आह्मांस फार फार वाटतें. आह्मी ह्मणतो कीं प्लेगाचें दूरीकरण मनुष्याचे हातींच आहे. स्वच्छतेचे व शुद्धतेचे संस्कार सदा चालू ठेवावे ह्मणजे प्लेगाची बाधा होत नाहीं. आणि आह्मी तर असें ह्मणतो कीं जेथें जेथें प्लेग होतो तेथें तेथें हे नियम मोडले जातात असें विचारांतीं कळून येईल. एकदां थोडे दिवसां पूर्वीं आमचे मद्रासकर स्नेही आकोल्यास आले होते तेव्हां ते बोलतां बोलतां असें ह्मणाले कीं हल्लींची आमरण चालू असलेली दिनचर्या मोठी चुकीची आहे. शहर गांवची किंवा खेड्याची दिनचर्या पाहतां असें दिसतें कीं ठिकठिकाणीं मलमुत्रोत्सर्गानें घाण करून दिलेली आहे. शेंकडों वर्षे वस्ती एकच ठिकाणीं राहिल्यानें तीं तीच स्थानें राहण्याला अयोग्य झालीं आहेत. लोकसंख्या इतकी वाढली आहे कीं त्यांचे श्वासोच्छ्वासानें मूळची हवा कितीही रम्य व आरोग्यदायक असली तरी ती दूषितच होते. शहरें व खेडीं हीं मलमुत्राचे, दुर्गंधीचे व घाणीचे उत्तरोत्तर खनिजेच बनत चालले आहेत. अशा पर्यायानें मद्रासकर ग्रहस्थ बोलत आहेत इतक्यांत आमचे येथील एका गटारांतील दुर्गंधाचा भपकारा तेथें आला त्या बरोबर ते ह्मणाले कीं संवयीनें तुह्मी येथें राहूं शकतां आणि हींच दूषित द्रव्यें शरीराला किती अपाय कारक होतात याची ही अटकळ बरोबर तुह्मां शहरवासी लोकांना करितां येत नाहीं आह्मांला त्यांच्या या उद्गारांत विशेष तथ्य आहे असें वाटतें. आणि ह्मणूनच प्लेगाला स्थानत्यागा सारखा दुसरा प्रतिबंधक उपाय नाहीं असें आपले अनुभवास पक्कोणीं येऊन चुकलें आहे. आपल्या चालूं दिनचर्येंत जर आपण आपल्या धर्मग्रंथाप्रमाणें फरक करून पाहूं आणि वानप्रस्थाचा प्रसंग विशेषीं आश्रय करूं व दासबोधांत वर्णन केल्या प्रमाणें आपल्या दिनचर्येंत कांहीं प्रकार पुनः आणतां येतील तर खरोखरच आपण प्लेगाचे निवारणाचें साधन हस्तगत करून घेतलें असें आपले आपल्यालाच वाटेल आमचे या ह्मणण्यास आह्मी दुसरें एक प्रत्यंतर देतों तें असें:—

दरसाल आपण श्रावणी करितों तेव्हां त्यांतील नानाविध संस्कारांचा लोप होत होत आचार्यांच्या तोंडीं मंत्र आणि आपल्या हस्तपादादिकामध्यें तंत्र एवढेंच काय ती श्रावणी राहिली आहे. वस्तुतः त्या श्रावणींतील गोमय, मृत्तिका, भस्म इत्यादि स्नानाचा वास्तविक कोणी फायदाच करून घेत नाहींत. दुर्वा डोक्यावर ठेऊन उभें राहणें ह्मणजे रानटी चाल आहे असें कित्येक ह्मणतात पण दुर्वा डोक्यावर ठेऊन उन्हांत तसें उभें रहावें ह्मणजे या प्रयोगाचा किती मोठा फायदा आहे हे प्रचितीनेंच कळण्या सारिखें आहे. या श्रावणींतील प्रयोगाचें डाक्तर कुन्हे यांच्या नवीन वैद्यक पद्धतीशीं साम्य पाहिलें असतां असें दिसतें कीं हल्लीं जे शास्त्राचे शोध ह्मणून बाहेर आले आहेत त्यांचा समावेश आमच्या शुद्ध व पवित्र आचारमार्गांत पूर्वींच्या धर्मग्रंथांनीं करून ठेविला आहे. सारांश कसेंही करून स्वच्छतेचे आणि शुद्धतेचे नियम जितके पाळावे तितके थोडेच आणि जो ते नियम अधिकाधिक पाळील तो तितक्या मानानें प्लेगापासून दूर राहील या विषयीं बिलकूल शंका नको.

---

### वाद्यांचा प्रतिबंध.

हल्लीं आकोल्यास वाद्यें वाजविण्या संबंधानें फार प्रतिबंध झाला आहे आणि हा प्रतिबंध करण्याचें काम ज्या पोलिसांचे हातीं असतें ते ही प्रतिबंधाची गोष्ट विकोपाला नेत आहेत असें आह्माला कळलें. मूळच्या हेतूंचा विपर्यास पायरी पायरीनें कसा होत जातो याचें हें एक उत्कृष्ट उदाहरण आहे. हल्लीं कार्यप्रसंगांतून वाद्यें वाजविण्याची परवानगी घ्यावी लागते आणि ती परवानगी बहुत करून रात्रीचे दहा वाजल्या नंतर दुसरे दिवशीचे उषःकाला पर्यंत सहसा कधीं मिळत नाहीं. अशी परवानगी मागण्याचे नियमामुळें पुष्कळदां धर्मकार्यांतही विघ्नें येऊं लागलीं आहेत. उत्तर रात्रीं वाद्यें न वाजवूं देण्याला मूळचें कारण असें कीं एका ठिकाणच्या कार्यप्रसंगांत उत्तर रात्रीं वाद्य वाजत राहिलीं तर त्यांच्या नादानें शेजाऱ्या पाजाऱ्यांच्या व तो आवाज जेथ पर्यंत जाईल तेथपर्यंतच्या लोकांच्या झोंपेचा मोड होतो. आणि असा हा झोंपेचा मोड होऊं नये ह्मणून कांहीं प्रतिबंध घालण्यांत आला. अर्थातच हा प्रतिबंध कर्णकटु, घनठोपाच्या वाद्या संबंधानें प्रथम करण्यात आला. या बंद करण्याचे वाद्यामध्यें ताशा, ढोल इत्यादि रणवाद्यांचा समावेश करण्यांत येत असे. आमचे आठवणी प्रमाणें हा नियम वीस पंचवीस वर्षां पासून चालू आहे तथापि प्रसंग विशेषीं व सार्वजनिक उत्सवा मधून ही रण वाद्यांची मनाई दूर करण्यांत येत असे. आणि लोकांचा शोक आणि उत्कंठा यांचा हिरमोड न करितां हा नियम पाळण्यांत येत असे. पण अलिकडच्या अधिकाऱ्यांचा कल निराळाच दिसतो. त्यांनीं वाद्यांच्या मनाईची मर्यादा फार वाढविली आणि लोकांवर फार सक्ति व जबरी करण्यांत येत असते. याची व्यक्तिशः उदाहरणें देण्याची आमची इच्छा नाहीं पण हल्लीं मृदु, मंजुळ व कर्णप्रिय अशा वाद्यांनाही अनेक वेळां फांटा द्यावा लागतो. थोडे दिवसांपूर्वीं सरकसच्या खेळांमधील एकदम ब्यांड बंद करण्यांत आला होता. या मनाईनें प्रेक्षकांचा मोठा विरस झाला. ब्यांडाच्या सुस्वर तालाला धरून जनावरें नाचत व बागडत असतात. आणि एकदम वादन आणि वर्तन यांचा जो अपूर्व मिलाफ तीं जनावरें दाखवीत असत तो बंद करण्यांत आला. आह्माला हें कबूल आहे कीं कित्येकांना निद्रा प्रिय असेल आणि ज्यांना आपल्या आवडत्या निद्रेचा भंग होऊं नये असें वाटतें त्यांचा शिष्टाचार असा पाहिजे कीं त्यांनीं लोकवस्ती पासून दूर जाऊन रहावें. प्रातःकाळच्या आरतीच्या आवाजानें झोंप मोडते ह्मणून आरतीच्या वेळची प्रोत्साहक व उद्योगदीपक वाद्यें एकदां बंद करण्यांत आलीं होतीं. प्रातःकाळच्या समयीं आरतीचे वेळचीं वाद्यें मृदु नसतात तथापि त्यांचा तो जयघोष मनुष्यास उद्योगाला प्रवृत्त करितो आणि ती अमृत वेळा निद्रेंत दवडूं नका असें सुचवीत असतो. अशा या उत्तेजक वाद्यावर मनाईची गदा येईल असें कधीं वाटलें नव्हतें परंतु ती गोष्ट प्रत्यक्ष घडल्यामुळें मुळच्या मनाईचा विपरीत अर्थ फार करितात असें कष्टानें ह्मणावें लागतें. अलिकडे कीर्तनांतील व भजनांतील वाद्यें वाजविण्या संबंधानें पोलीस लोक प्रतिबंध करूं लागले आहेत आणि एखादे प्रसंगीं मारामारी होऊन सार्वजनिक शांतता बिघडेल अशाही या मनाईचा भावी परिणाम होईल असा संभव आहे. कीर्तन, भजन आरती वगैरे धार्मिक गोष्टीमध्यें वाद्यांचे प्रतिबंधद्वारा सरकार हात घालील तर त्यापासून सरकारचा कांहीं फायदा न होतां लोकांचीं मनें मात्र फार असंतुष्ट होतील. कीर्तनाच्या प्रसंगीं वीणा, मृदंग, हार्मोनिअम, टाळ, चिपळ्या, करताळ इत्यादि वाद्यांच्या संमेलनानें जो एक विलक्षण लय लागतो आणि परमेश्वराचे ठिकाणीं श्रोता लीन व तल्लीन होऊन जातो तो अपूर्व योग अनुभवा शिवाय कळणारा नाहीं. अर्थात अशा आनंदाला अपरिचित असणाऱ्या निरळ लोकांनीं बाद्यानिमित्त कीर्तनाचा रसभंग करूं नये. गायनाचे प्रसंगींही हीं वाद्यें आवश्यक असतात आणि त्यांच्या मनाईचा अर्थ असा होईल कीं गायन, नर्तनाचे प्रसंग तसेंच कथा, कीर्तनें, पुराणें, भजनें, नाटकें इत्यादि मंगल प्रसंग उत्तर रात्रींस दहा वाजल्या नंतर लोकांनीं करूं नयेत आणि हे तर प्रसंग उत्तर रात्रीच अधिक खुलतात व तसेंच परम आल्हाद देतात. सारांश हल्लीं वाद्यांच्या प्रतिबंधा संबंधानें जी अंमलबजावणी होत असते ती फार कडक, सक्तीची व त्रासाची आहे. आणि अशा या प्रतिबंधाचें वास्तविक कांहीं प्रयोजन नाहीं. हीं वाद्यें कांहीं नियमांनीं बंद करितात किंवा तत्संबंधीं कांहीं कायदा

निर्दिष्ट आहे असे आह्मांस माहीत नाहीं. वाद्यें वाजविण्याची परवानगी घ्यावी असें ही एकादे कायद्यांत लिहिलें असल्याचें आह्मांस माहीत नाहीं. क्यांटोनेमेंट व सिव्हिल स्टेशन यासंबंधीं अव्वल इंग्रजींत कांहीं नियम झाले होते आणि ह्या अन्वयें वाद्यांची मनाई करण्यांत येते असें सांगतात. आमच्या मतें आकोल्या सारख्या म्युनसिपालिटीच्या ठिकाणीं ही वाद्यांची बाब म्युनिसिपालीटीच्या कारभाराची असावी आणि तिजमध्यें सरकारी अधिकाऱ्यांना कांहीं हात घालण्याचें प्रयोजन नाहीं. किंबहुना वाद्यें वाजविण्याचे परवानगी संबंधानें जे अर्ज येतात त्याचें उत्पन्नही म्युनसिपालिटीकडेसच देण्यांत यावें. आह्मांस उमेद आहे कीं मेहेरबान रुस्तुमजी साहेब या बाबतींत अवश्य लक्ष पुरवतील आणि लोकांच्या कुरकुरीला या पुढें स्थळ राहूं देणार नाहींत.

---

वाढ दिवस-- चक्रवर्ती बादशाहा एडवर्ड सरकार हे गादीवर बसल्या पासून गेल्या शुक्रवारीं त्यांच्या वाढदिवसाचा उत्सव प्रथमच करण्यांत आला. सर्व राष्ट्रभर त्या दिवशीं सरकारी कचेऱ्या व इतर सार्वजनिक कारखाने यांस सुट्टी देण्यांत आली होती. वाढ दिवसाचा हा पहिलाच उत्सव असल्यामुळें सर्वत्र नानापरीचे आनंद करण्यांत आले. इंडियन राष्ट्रांतील लोक बादशहाला साक्षात् विष्णूचा अंश आहे असें समजतात आणि त्यांनीं त्या श्रद्धेनें हा वाढ दिवसाचा सण सर्वत्र साजरा केला. राज्यारोहणाच्या प्रसंगीं बादशहा एडवर्ड सरकार यांनीं आपल्या लोकांस जी सनद दिली आहे तिजमध्यें आमच्या लोकांची राजभक्ति मोठ्या प्रेमानें आणि आनंदे द्वारानें कबूल केली आहे. ही वर्णिलेली आमची राजनिष्ठा कोणीकडे आणि हत्याराच्या कायद्यांतील कलमें कोणीकडे ! बादशहाचा राजनिष्ठेची सनद आणि हत्याराच्या कायद्यांतील कलमें हीं दोन्ही परस्पर विरुद्ध आणि विसंवादी आहेत. एक सनद तर खरी असली पाहिजे आणि ती तशी खरी आहे असें आह्मी बादशहाच्या परमपूज्य मातोश्रीच्या तोंडच्या उद्गारावरून खात्रीनें सांगतों त्याअर्थीं आमचें राष्ट्राचे राज्यकर्त्यास विनंती आहे. कां त्यांनीं हत्याराचा कायदा रद्द करावा आणि इंडियन प्रजेला हत्यारें वापरण्याचा खरा हक्क देऊन त्यांस पाणदार, रणशूर, व हिमतबहादर करावें या वाढ दिवसाचे निमित्त असा एखादा महदुपकार करावयाला पाहिजे होता. आह्मी तर असें समजतों कीं सलामीच्या तोफांचा गडगडाट व पलटणीच्या कवायती यांनीं जन्म दिवसाचा उत्सव प्रसिद्ध करण्यापेक्षां लोकांस त्यांचे हक्क देऊन त्यांची मनें संतुष्ट करावीं आणि अशा आनंदित व प्रफुल्लित अंतःकरणापासून प्रजेनीं दिलेलीं आशीर्वचनें राजाला फार मंगलदायक आणि लाभकारक होत असतात, ईश्वर करो आणि भावी वाढदिवसांचे उत्सवांत प्रजेच्या आशीर्वचनांनीं [illegible] दूमदुमून जावो.

[illegible] नेम [illegible] र अर्ज केले [illegible] दोकशीची [illegible] ई सन १९०३

# The Berar Samachar

MONDAY JUNE 29 1903

## JAILS IN BERAR

WE acknowledge with thanks the receipt of the Annual Report on the jails in Berar and Secunderabad for the year 1902. The most important feature in this report is a decrease in the number of convicts—a fact which is to be congratulated upon. Mr. Hare, the officiating Commissioner, takes this to mean that the effects of the last famine are no longer felt by the people in this province. The number of convicts has no doubt decreased owing to two or three reasons viz (1) the last famine has carried away some of them and (2) the prevalence of good wages during the last year, accompained with a bumper crop have fortunately improved the status of a considerable number of persons who would otherwise have swelled the ranks of criminals in ordinary years. So this fact goes to corroborate the contention of the congress party that poverty in India is not due so much to want of food caused by a famine as to want of *money* to buy food.

The average cost of a prisoner's food came to Rs. 31—3—0 per head ranging between Rs. 35/5/0 the figure for the Akola Jail, and Rs. 10—7—3 which is the figure for the Yeotmal Jail. When the scale of rations allowed to each prisoner in the province, has been uniform, the difference in the market prices of the foodstuffs cannot satisfactorily account for the vast difference that is observable in the average cost at the several Jails. The lowest figure in in the province viz Rs. 10—7—3 for Yeotmal is explained as being the cash expenditure exclusive of the price of a large stock of grain which was on hand at the commencement of the year. We are not aware if the same system is followed in preparing statements under other headings of accounts; but we fail to see what use is likely to be derived from comparing the figures which are arrived at in this faulty way. We therefore humbly suggest that the price of the corn on hand at the commencement of the year, should be taken into calculation in arriving at the actual cost of a prisoner's food. The figure this arrived at would represent *actual* facts and not be a nominal figure only. The report shows that it has been found cheaper to buy grain in small quantities from time to time than to buy the whole stock at the harvest. This fact as observed by Mr. Hare himself, is not very creditable to the Jail authorities, because it is contrary to our every day experience in ordinary life and bespeaks want of proper management on the part of Jail authorities. Besides the system of purchasing grain in the local market should, as remarked by Mr. Hare, be discouraged espcially when we are threatened with a serious outbreak of plague next year.

In the charges under the heads of "Hospital", "Clothing and bedding" and "Miscellaneous services and supplies", Akola jail surpasses its sister instituion at Amraoti, as regards the cost per head, though the average number of prisoners at the former place is larger than that at the latter. Akola has maintained this superiority over Amraoti continuously during the last four years. In the year 1902, more than half the expenditure in the whole province under the head of Hospital charges viz Rs. 1156 out of Rs. 1979, was incurred at the Akola Jail, where the cost per head of average sick was Rs. 137—9—11 against Rs. 72/3/4 that incurred at Amraoti. Similarly Akola Jail has spent Rs. 2119 for the "Clothing and bedding" while Amraoti Jail has spent Rs. 677 only. We are therefore glad to see that our experienced Civil Surgeon Dr. Reilly, has been so attentive to the comforts of the criminals under his charge. The last report for the Civil Hospitals and Charitable Dispensaries in Berar, also shows that he is equally attentive to the wants of the Akola Civil Hospital which he has been taking his utmost care to keep well furnished from time to time; and we are glad to see that the higher authorities in the case of both these institutions have been admiring his industry. We have therefore every reason to hope that he will prove still more useful to the free population within the precincts of the Akola Municipality, if the latter body were to avail themselves of his useful services and we to give him a blank card in the matter of improving the sanitary condition of the town. We therefore suggest that our appreciative Municipality here will not grudge to be guided by the wholesome and therefore *dear* advice of Dr. Reilly in the above matter. But at the same time, let us hope that the extraordinary care and attention bestowed upon the prisoners at the Akola Jail, will not induce the inmates in other Jails as also the persons on the border land between virtue and crime, to seek admission in this blessed asylum.

As regards the indigenous industries, Amraoti Jail has its lithographic press which was not able to turn out much work last year, as there was not much damand for the forms during the year. Akola jail on the other hand, has set a good example by undertaking the preparation of Police Uniforms as also of those for village watchmen. Out of the average number of 492.15 prisoners who were to undergo hard labour at the Akola Jail, an average number of 218.39 prisoners was employed on Jail manufactures which have given a net profit of Rs. 4028. If the Government can do so much to encourage local industries among the Jail population in their charge, can they not similarly extend the sphere of this useful work among the free population who will better appreciate the kind efforts of the paternal Government, on their behalf ?

## वऱ्हाडवृत्त.

हवामान— उष्मा विशेष होतो पण पाऊस पडत नाहीं. कपाशीची पेरणी झपाट्यानें चालूं आहे. पाऊस लवकर चांगला पडेल तरच मोठी बहार होईल.

टिळक कमिशनचें काम खान बहादूर अर्देसर दिनसाजी चिनाय स्माल्कॉज जज उमरावती यांच्या समोर या आठवड्यांत चालू झालें. रा. रा. गणेश श्रीकृष्ण खापर्डे यांची साक्ष शनिवार अखेर चालू होती. या साक्षींत औरंगाबाद व पुणें येथें घडलेली साग्र हकीकत सांगण्यांत आली.

## आकोला बाजारभाव

| | |
|---|---|
| हुंडी दर्शनी | १००८≡ |
| सोनें २४।≡ | चांदी ६५ |
| जवारी ४५।५० | जवस १०० |
| गहूं ४।।। ५। | ९५ ते १०० |
| बाजरी | ५५ |
| मीठ | ४ रु. मण |
| चणे | ३।।= रु. मण |
| तूप | ७।।।= रु. मण |
| तेल | ५।- रु. मण |
| रुई | ५०।५४ |

## नोटीस

रा० शंकरलाल पन्नालाल खत्री मापारी राहणार ताजनापेठ आकोले. यांस.

खाली सही करणार याजकडून नोटीस देण्यांत येते कीं तुह्मी आमची मातोश्री रामसखी इजपासून रक्कम रुपये २२५ कर्जाऊ घेतले पैकीं रुपये १२५ व सालीम रकमेचे व्याज आज दीड वर्षे झाले आणून दिले आतां तुमचेकडेस मुदल रुपये १०० व दीड वर्षांचे व्याज दर १ प्रमाणें १८ एकूण रुपये ११८ आज तारखे पर्यंत निघत आहेत. तुमचे घरोब्या करितां हे रुपये हातउसनें दिले असून अद्याप परत केले नाहीं. तुह्मी असा विश्वासघात करण्याचे बुद्धीनें फसवून रुपये घेऊन गेला हे बरोबर नाहीं करितां ही नोटीस पावल्या पासून ८ दिवसाचे आंत सदरहू रुपये आणून देऊन पावती घ्यावी. तसे न केल्यास तुमचेवर दिवाणीत व फौजदारीतही काम चालू करणें आह्मास भाग पडेल सबब या नोटिसीनें तुह्मास आगाऊ कळविले आहे य नोटिसीचा खर्च व कोर्ट खर्चही तुह्मास द्यावा लागेल कळावे. ता. २४।६।१९०३ इसवी.

सही.

रामसखी तर्फे पुत्र जगन्नाथ व भिवराज दस्तुर खुद्द आकोला.

## नोटिसीचे उत्तर.

रा० रा० सखाराम कृष्ण देशपांडे बाळापूरकर. यांस.

नारायण गोपाळराव देशपांडे बाळापूरकर हल्लीं मुक्काम अकोले.

तारीख २४ जून १९०३ इसवी रोजी शुद्धवऱ्हाडांतून दिलेली नोटीस खोटी आहे. कारण मी कुलूप लाविले नाहीं. दरवाजा उघडा आहे अशी खोटी नोटीस देऊन विनाकारण त्रास देणें असल्यास निरुपाय आहे. कुलूप आमचे संमती वाचून लावूं नये कळावे तारीख २८।६।१९०३ इसवी.

सही.

जानराव गोपाळराव देशपांडे दस्तुर हणमतराव गोपाळराव देशपांडे बाळापूर.

## वर्तमानसार

वृन्दावन येथील सरकारी दारूखान्यांत एक कुलपी गोळा ता. १८ रोजीं सकाळीं अकस्मात् फुटून १४ मनुष्यें ठार होऊन २० ना जबर दुखापती झाल्या. सर्व शहर हादरून गेलें व मोंवतालच्या ८ इमारती जमीनदोस्त झाल्या! मरण पावलेल्या लोकांच्या शरीराचे राई एवढे तुकडे होऊन मांचा थर जमिनीवर पडला. उडालेल्या इमारतींचे व प्रेतांचे तुकडे तेम्स नदीचे पलीकडे उडून गेले व हे मांसाचे तुकडे पुढें बकेटांनीं भरून आणावे लागले.

पेटलादच्या गायकवाडी तुरुंगांतून पळून गेलेल्या १६ कैद्यांपैकीं ७ हत्यारबंद दरोडखोरांनीं धंदुकानजीक मेल तांगा लुटून ५००० ची लूट नेली. दुसरे दिवशीं वडवाण, अहमदाबाद, चूडा व व लिंमडी येथील पोलीस चूडा येथें जमले. तेथें संध्याकाळीं ते ७ दरोडेखोर व हे पोलीस शिपाई यांची चकमक झाली. पोलिसांतील ३ लोक ठार होऊन ९ जखमी झाले. दरोडेखोरांतले ४ ठार झाले. २ जखमी होऊन पळून गेले; परंतु एक मात्र पोलिसांनीं पकडला.

हैद्राबाद येथील सुमारे १३० बनियें गेल्याचे मागील रविवारीं मिठाई वगैरे 'देग' देण्यासाठी बोटींतून फुलेली येथें सिंधुनदींत शिरले असतां बोट एकाएकीं उपडी होऊन सर्व लोक पाण्यांत पडले त्यापैकीं किती मेले व किती वाचले, हें समजत नाहीं; पण सुमारें २१३ बुडाले आहेत, असा अंदाज आहे.

लोकांस जंगली तापाचा आजार नेहमीं होतो; म्हणून त्यांचे उपयोगासाठीं ९ ग्रेनची पुडी पोष्टांतून जी आजपर्यंत पैशास मिळत असे ती २ पैला द्यावी, असें सरकारानें ठरविलें आहे.

राजाराम कॉलेजचे प्रि. मि० स्युपी यांनीं असें ठरविलें आहे कीं कोणाही विद्यार्थ्यानें पायांत हिंदु तऱ्हेचें पादत्राण घालून वर्गांत येतां कामा नये, हा हुकूम अमान्य केल्याबद्दल मि० स्युपी यांनीं मॅट्रिक्युलेशन क्लासांतील एका विद्यार्थ्यास क्लासांतून हाकून दिलें व इतरांस एका इंग्रजी पुस्तकांतील बारीक टाईपानें छापलेलीं २० पानें उतरून आणण्याची सजा दिली असून हा हुकूम अमान्य केल्यास वेताच्या मोठ्या छडीनें मार देण्याचीही दहशत घालून ठेविली आहे, असें समजतें!

कोल्हापूर येथील रा. ब. सरसुभे यांजकडील आ. नं. ९२९ ता. २।६।०३ चे हुकूमावरून प्रांत (उत्तरभाग) जा. नं. १४८९ चे शेऱ्यानें ता. ९।६।०३ रोजीं पेठ्यांत आलेले हकुमान्वयें श्रीमत् जगद्गुरु मठ संकेश्वर या नावचे खात्यांतील उत्पन्न जें श्रींचें म्हणूनच करवीर दरबारांतून जप्त करण्यांत आलें होतें, अशा प्रकारच्या कांहीं उत्पन्नावरील जप्ति खुली करण्यांत आली आहे.

बंगलोरकडे एक मालगाडी रुळावरून खालीं घसरून पडल्याचें समजतें. आंत १०० लोक मरण पावले असून ३०० लोक जखमी झाले आहेत. व ते जगण्याची बहुतेक आशा नाहीं, असें बंगाली पत्रावरून समजतें.

गरीबांस अन्नदान—काबुलमध्यें दुष्काळ पडल्यामुळें जे लोक रशियाच्या सरहद्दीवर जात आहेत त्यांना रशियन सरकार अन्नदान करून संतुष्ट करीत आहे

औषधें देणारा पुतळा—हॉलंड मधील पुष्कळ शहरांत ड्रातांच्या डाक्तरांच्या आकारांचीं, यंत्रें उभारली असून, त्यामध्यें एक एक पेनी टाकल्याबरोबर साधारण दुखण्यावरची एक एक त्या पुतळ्याकडून पुडी मिळते.

अधिकमास पाहण्याची रीत:-इंग्रजी सनावरून कोणत्याही वार, तारीख काढण्याच्या जशा अनेक रीती आहेत तशी आपल्या संवत्सरांतुनही अधीकमास काढण्याची एक रित आहे ती अशी:—शालिवहान शकामध्ये १६१ मिळवून त्या बेरजेस १९ नी भागावें. बाकी १ किंवा ९० राहिल्यास श्रावण' १४।१९।१६ किंवा ३४ राहिल्यास ज्येष्ट ४ राहिल्यास चैत्र, ९।१८ रा. भाद्रपद, १२।३१ रा. आषाढ १७।६ रा. आश्विन आणि २६ राहतील तर वैशाखमास अधिक समजावा. बाकीचे सालीं अधिकमास येत नाहीत.

यवतमाळचे एक गृहस्थ वऱ्हाडचा इतिहास लिहित आहेत. व सर्व ठिकाणीं स्थानिक माहिती एका मनुष्यास मिळणें शक्य नसल्यामुळें कित्येक बाबतींत कदाचित् त्यांत कांहीं उणीव राहील, ती राहूं नये व सर्वांच्या माहितीचा फायदा या ग्रंथांस मिळावा म्हणून सर्व ठिकाणच्या माहितगार लोकांस आमची अशी विनंती आहे कीं वऱ्हाडच्या इतिहासाशीं संबंध असणाऱ्या ज्या गोष्टी यांना माहित असतील त्या त्यांनीं 'एडिटर, हरिकिशोर, यवतमाळ' या पत्त्यावर पाठवाव्या म्हणजे त्या ग्रंथकारांस मिळतील. बहुतेक ठिकाणचे देशमख व देशपांडे यांची जुनीं दप्तरें तपासून पाहिली तर पुष्कळ उपयुक्त माहिती मिळेल असा भरंवसा आहे. राजकीय घडामोडी लढाया याच प्रमाणें एखाद्या ठिकाणीं एखादा साधुपुरुष झाला असल्यास त्याचें थोडक्यांत चरित्र, जुन्या इमारती, त्या कोणी व कधीं बांधल्या याबद्दल मिळेल तेवढी हकीकत वगैरे पुष्कळ गोष्टी बद्दल माहिती दिल्यास तिचा फार उपयोग होईल. तरी देशभक्तांनीं या स्तुत्य कार्यास हातभार लावण्याची ही संधि घालवूं नये. शाळा मास्तर देशमुख, देशपांडे व इतर शोधक विद्वान लोक यांनीं जरूर इकडे लक्ष पोंहोंचवावें अशी विनंती आहे.

राजकुमार कालेज शाळा खात्याकडून तपासलीं जात असत व सरसगट बारा टक्के असा न्याय होता. परंतु या संस्था राजकुलोत्पन्न मुलांकरिता स्थापन झाल्या असल्यामुळें यांची सर्व परिक्षा इन्स्पेक्टरांकडून घेण्यांत येऊं नये असें व्हाइसराय साहेबांनीं ठरविलें आहे. या संस्थेकरितां वेगळा इन्स्पेक्टर नेमावा.

दहा रुपये फी घेऊनही मिर्‌गुंग येथील वकील हे आपल्या पक्ष काराच्या तर्फेनें हजर झाले नाहींत म्हणून दक्षिण ब्रह्मदेशांतील मुख्य न्यायाधिशांनीं या वकिलास ३ महिने पर्यंत कोर्टांत न येण्या विषयीं लेखी समन दिली.

ब्रह्मदेशांतील ब्रिटिश अधिकारी तरुण ब्रह्मी स्त्रिया आपल्याजवळ ठेवून त्यांशीं विवाहाव्यतिरिक्त असा संबंध ठेवतात; अशा संबंधापासून इंग्रजी राज्याचे इभ्रतीस कसा धक्का येतो व सरकारी कामास तो मनुष्य नालायख होतो, हें तेथील ले. गव्हर्नरांनीं एका गुप्त सक्युंलरांत प्रसिद्ध करून यापुढें असा संबंध जो कोणी ठेवील त्यांचें कमीशन बंद करून त्याची ताबडतोब बदली केली जाईल, असें फर्माविलें आहे.

कलकत्याकडील एका हिंदु स्त्रीनें साधारण ब्राह्मसमाजाच्या सभासदाचा एक मुलगा दत्तक घेतला तो हिंदु नसल्यामुळें तें दत्तविधान गैरकायदेशीर आहे, म्हणून तें रद्द करण्याबद्दल फिर्याद होऊन ती कलकत्ता हायकोर्टाकडे आली. प्रायश्चित्त देऊन या ब्रह्मी मनुष्याला पुनः पहिल्या जातींत जातां येतें, त्या अर्थीं हें दत्तविधान कायदेशीर आहे. असा ज. सेल यांनीं निकाल दिला.

के० रा. ब. रानड्यांच्या मागें सुधारणेचें तारूं कोणत्या एखाद्या खडकावर आदळून त्याचीं छकलें होतात कीं काय ही एक मोठी भीति वाटत होती परंतु त्यांच्यापेक्षाही जास्त धैर्याची व नेटाचीं माणसें पुढें येऊं लागलीं आहेत ही फार आनंदाची गोष्ट आहे. रा० ब० वामनराव कोल्हटकर यांच्या पौनर्भव मुलीचें लग्न होऊन थोडे दिवस जात नाहींत तोंच दुसरा एक असाच अभिनंदनीय विवाह घडून आला. सोलापूरचे वकील रा. नागपूरकर यांचे मुलाचा या याचे सत्र—जज्ज मि. अत्रे यांच्या मुलीशीं विवाह झाला रा० नागपूरकर हे विलायत, अमेरिका हिंडून आले असून त्यांनीं प्रायश्चित घेतल्याचें कोठेंही ऐकिलें नाहीं असें असून सर्व भिक्षुकांनीं शास्त्रा प्रमाणें लग्नविधी करण्यास हरकत न घेतां उलट आनंदानें मदत दिली ही फारच समाधानकारक गोष्ट आहे. अशा तऱ्हेचे रूढीचें बंड [ धार्मिक नव्हे! ] आमच्या समाजाच्या हेळसांडीतून निघून गेले पाहिजेत म्हणजे अनाडी कल्पनांचा सुकाळ न होतां योग्य दिशेनें योग्य गोष्टी करण्यास अडचण पडणार नाहीं. सभेंत लंब्या लंब्या बाता झोकणाऱ्या सुधारकांनीं अशा गोष्टी ध्यानांत धरण्या सारख्या आहेत.

हिंदुस्थानांतील राजे लोकांनें शिक्षणासाठीं नवीन कालेज उघडण्याचीं आहेत. प्रथमतः अजमीर कॉलेज पहिल्या जुलईला उघडण्याचें असून राजकोट कालेजचे मि० वेडिंगटन यांना प्रिन्सिपाल नेमण्याचें आहे मि० टिपिंग यास मदतगार प्रोफेसर नेमण्याचें आहे.

निजाम सरकारच्या अर्ई फार आजारी आहेत व त्यामुळें निजामांस काम बंद करून त्यांना एकदम हैद्राबादेस यावें लागणार आहे.

ट्रान्सवाल प्रांतांत हल्लीं फारच मोठ्या सोन्याच्या खाणी सापडल्या आहेत

विण कामाच्या शाळा उघडण्या करतां म्हैसूर सरकारनें ठराव केला आहे. आणि मि. हावेल यांनीं विणकामा संबंधीं जो एक निबंध इंग्रजींत लिहिला आहे त्याच्या मराठी भाषांतराच्या प्रती करून चोहोंकडे वाटावयाच्या आहेत. कारण स्तुत्य. इंग्रजी

अमलांत अशा मोठी होतील काय?

मे क्रुगर साहेब हे हल्लीं हॉलंड देशांत प्रवास करीत आहेत. ते ज्या ज्या ठिकाणीं जातात त्या त्या ठिकाणीं त्यांचा मोठा जयजयकार होत आहे.

कलकत्यांस वैशाख शुद्ध १९ चे दिवशीं महाराज प्रताप सिंहाच्या राज्या रोहणोत्सवाचे वेळीं कुमारी सरला देवी घोसल बी. ए. यांनीं फारच सर्वोत्कृष्ठ भाषण केलें. प्रताप सिंहानें मोंगल सैन्याचा कैक वेळा पराभव केला असून त्यांच्या लढाऊ सैन्याच्या तीक्ष्ण तरवारीच्या धारेपासून उत्तम रितीनें बचाव केला असल्यामुळें तो तिकडचा "शिवाजी" च समजला गेला आहे. व त्याच्या आनंदोत्सवांत सर्वांनीं प्रेम दाखवावें हें साहजीकच आहे. प्रत्येक प्रांतांत राष्ट्रीय अशा तऱ्हेचे उत्सव चालू असतात व असणें हें योग्य व न्यायाचें आहे. शिवाजी उत्सवाच्या विरुद्ध वल्गना करणाऱ्या कांहीं आमच्यातल्याच लोकांनीं वरील घोसल बाईचें भाषण अवश्य वाचावें अशी त्यास आमची विनंती आहे म्हणजे राष्ट्रीय उत्सवाची खरी कल्पना त्यांच्या ध्यानांत आल्या वांचून राहणार नाहीं.

श्रीमंत तात्या साहेब यांच्या पश्चात श्री. आबासाहेब यास वारसदार समजून हिंदुस्थान सरकारने सांगलीच्या गादीवर बसविलें या बद्दल सर्वांचें आभार मानण्यासाठीं व नवीन संस्थानिकास प्रेम पूर्वक आदर दाखविण्यासाठीं ता. २०।६।०३ रोजीं सांगलीस मोठी जाहीर सभा भरली होती.

मुंबईची एक पार्शी नाटक मंडळी हल्ली मद्रासेस जावयाची होती. तिच्यासाठीं तयार केलेल्या नाटक मंडपास तारीख ११ रोजीं पहांटेस आग लागून सर्व खाक होऊन गेली!! एकंदर २।३ हजारांचें नुकसान झालें. मद्रासेंतील मंडळी नाटक पाहण्यास अतूर झालेली होती, तिचा या आगीमुळें समुळ आशाभंग झाला;

---

## नोटीस

बेशकी--- मोतीचंद सोनलाल गुजराथी राहणार बाळापूर यास:—

खालीं सही करणार यांजकडून नोटीस देण्यांत येते कीं आमचे तुमचें कर्ज रुपये घेणें होते त्याबद्दल तुम्ही चैत्र वद्य १ संवत १९५९ इसवी रोजीं व्याजसुद्धां नक्की रुपयें ४०० देणें कबूल करून तुम्ही आपल्या हातची यादी आम्हांस करून दिली. हे रुपये नोटीस पावल्या पासून चार दिवसांचे आंत नोटिशीचे खर्चा सुद्धां रुपये देऊन निकाल करावा वर लिहिलेले प्रमाणें निकाल न केल्यास फिर्याद करून या नोटिशीचे खर्चा सुद्धां रुपये वसूल करून घेऊं. कळावें. ता० २२।६।०३ इ०

सही

सही रुपाबाई जोजे पितमलाल दुकान ...पेठ बाळापूर तर्फे मुखत्यार केसोदास ...प्रवीचे वऱ्हाडचे साहू राहणार बाळापूर

...नें नोटीस दस्तुर खुद.